# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४५** **दि. १५/०२/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१५/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत |
| नेरकर सरीता अनंत | सोनवणे अश्विन शांताराम | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | चौधरी मनोज सुरेश | शेख शबानाबी सादीक |
| खान रुक्सानाबी गबलु | भोईटे लताबाई रणजीत | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | पाटील चंद्रशेखर शिवाजी | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | सोनार रंजना विजय |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुंडलिक | खडके सुनिल वामनराव |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | खडके विश्वनाथ सुरेश |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | देशमुख सुन्नाबी राजु |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | पटेल इब्राहिम मुसा |
| चौधरी चेतना किशोर | बरडे नितीन मनोहर | निता मंगलसिंग सोनवणे |
| भंगाळे विष्णु रामदास | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे राखी शामकांत | राणे गायत्री इंद्रजित | **स्विकृत सदस्य** |
| तायडे ज्योती शरद | जोशी अनंत हरिश्चंद्र | कैलास नारायण सोनवणे |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| काळे अमित पांडुरंग | मराठे जितेंद्र भगवान | राजेंद्र नारायण मराठे |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | महेश रतन चौधरी |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील रेखा चुडामण | |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, सहा.संचालक, नगररचनाकार श्री.के.पी.बागुल, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या पाटील प्रतिभा सुधीर २) कोल्हे सिंधु विजय ३) तायडे सुरेखा नितीन ४) शेख सैईदा युसुफ तसेच सन्मा.सदस्य ५)सनकत चेतन गणेश ६) सोनवणे धीरज मुरलीधर ७)पाटील सचिन भिमराव ८)कापसे मयुर चंद्रकांत ९) कोल्हे ललीत विजय यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.९८२ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १. सौ.जयश्री सुनिल महाजन,मा.महापौर<br>२. सौ.दिपमाला मनोज काळे<br>३. श्री.विश्वनाथ सुरेश खडके | आपल्या जळगांव शहरातील रहिवासी माजी नगराध्यक्ष, श्री.लक्ष्मीकांत तुकाराम चौधरी यांच्या आई स्व.श्रीमती मथुराबाई तुकाराम चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | सौ.सिमा सुरेश भोळे | १) पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या मातोश्री कै.हिराबेन मोदी २) माजी नगराध्यक्ष, श्री.लक्ष्मीकांत तुकाराम चौधरी यांच्या आई स्व.श्रीमती मथुराबाई तुकाराम चौधरी ३) श्री.विनोद खडके यांच्या मातोश्री कै.वत्सलाबाई गिरधर खडके ४) श्री.विशाल दगडु पाटील यांचे वडील कै.दगडु हिलाल पाटील ५) श्री.एकनाथ आनंदा सरोदे यांचा मुलगा कै.जितेंद्र एकनाथ सरोदे ६) विदयुत कॉलनी येथील रहिवासी कै.लताबाई दत्तात्रय चौधरी ७) कै.मीनाक्षी सुभाष भोळे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | श्री.विश्वनाथ सुरेश खडके | १) पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या मातोश्री कै.हिराबेन मोदी २) श्री.विशाल दगडू पाटील यांचे वडील कै.दगडू हिलाल पाटील यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | श्री.विष्णू रामदास भंगाळे | १) पोस्टल कॉलनी येथिल रहिवासी हेमंत आर्टचे संचालक हेमंत बोंडे व सिध्द ग्राफिक्सचे चंद्रशेखर बोंडे यांचे वडील स्व.बळिराम सोमा बोंडे २) पांडे चौक येथिल रहिवासी माजी नगराध्यक्ष, श्री.लक्ष्मीकांत तुकाराम चौधरी यांच्या आई स्व.श्रीमती मथुराबाई तुकाराम चौधरी ३) महेश प्रगती मंगल कार्यालया समोरील रहिवासी श्री.श्रीधर भोळे यांच्या पत्नी स्व.मीनाक्षी श्रीधर भोळे ४) पत्रकार कॉलनी येथील रहिवासी अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष भागवत चौधरी यांचे जेष्ठ पुत्र स्व.राजशेखर भागवत चौधरी यांचे दु:खद |
| ५. | श्री.राजेंद्र नारायण मराठे | भारताचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या मातोश्री स्वर्गीय हिराबेन मोदी यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १. सौ.जयश्री सुनिल महाजन,मा.महापौर<br>२. श्री.कुलभुषण विरभान पाटील, मा.उपमहापौर | १) सन्मा.सदस्य श्री.विष्णु रामदास भंगाळे तसेच माजी नगराध्यक्ष श्री.पांडुरंग (बंडुदादा) काळे यांची स्नुषा सौ.वैशाली महाजन (काळे) यांची कवियत्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विदयापिठाच्या पार पडलेल्या पदविधर अधिसभा (सिनेट) निवडणुक २०२३ निवडणुकीत सिनेट सदस्य म्हणुन निवडुन आल्याबद्दल हार्दीक अभिनंदन.<br>२) उपमहापौर कार्यालयातील कर्मचारी श्री.मनोज चंद्रात्रे यांची कन्या कु.नम्रता मनोज चंद्रात्रे हीने सीए परिक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २. | १.सौ.सिमा सुरेश भोळे<br>२.श्री.विश्वनाथ सुरेश खडके | १) महाराष्ट्र राज्याचे नवीन राज्यपाल म्हणून सामाजिक तसेच राजकीय क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव असलेले जेष्ठ व्यक्तिमत्व मा.श्री.रमेशजी बैस यांची नियुक्ती झाल्याबद्दल<br>२) १.सौ.स्वप्नाली महाजन (काळे), २.श्री.अमोल सोनवणे, ३.श्री.दिनेश खरात, ४.श्री.नितीन ठाकूर ५.श्री.अमोल पाटील, ६.श्री.अमोल मराठे, ७.श्री.दिनेश चव्हाण, ८.श्री.सुनिल निकम, ९.श्री.नितीन झाल्टे, १०.श्री.विष्णू भंगाळे हे कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विदयापीठ अधिसभा निवडणूक २०२३ पदवीधर मतदार संघातून निवडून आल्याबद्दल सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३. | सौ.दिपमाला मनोज काळे | सन्मा.सदस्य श्री.विष्णु रामदास भंगाळे तसेच माजी नगराध्यक्ष श्री.पांडुरंग (बंडुदादा) काळे व माजी नगराध्यक्षा सौ.सुधाताई काळे यांच्या स्नुषा सौ.स्वप्नाली महाजन (काळे) यांची कवियत्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विदयापिठाच्या पार पडलेल्या पदविधर अधिसभा (सिनेट) निवडणुक २०२३ निवडणुकीत सिनेट सदस्य म्हणुन निवडुन आल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४. | १.ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा<br>२.श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा<br>३.श्री.कैलास नारायण सोनवणे<br>४.सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण<br>५.सौ.उज्वला मोहन बेंडाळे<br>६.सौ.पार्वताबाई दामु भिल | जळगांव शहर महानगरपालिकेच्या आयुक्त,डॉ.सौ.विदया गायकवाड यांची बदली झाल्याने त्यांनी जो न्यायालयीन लढा दिला व तो जिंकून त्या परत जळगांव शहर महानगरपालिकेच्या आयुक्त पदी नियुक्त झाल्याने आयुक्त,डॉ.सौ.विदया गायकवाड यांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील समाजसेवक यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, एक अभिनंदनाचा प्रस्ताव मांडायचा आहे. खरं तर हे प्रस्ताव लेखी देण्यापेक्षा सभागृहातच मांडण्यात जास्त आनंद आहे. एक महिला नगरसेविका म्हणुन ज्या सभागृहाच्या महापौर महिला आहे. आणि आनंदाची बाब म्हणजे त्या सभागृहाचे आयुक्त सुध्दा एक महिला आहे. त्या आयुक्तांच्याच

अभिनंदनाचा मला प्रस्ताव मांडायचा आहे. गेल्या दोन महिन्यापासुन जी कायदेशीर लढाई आपले आयुक्त महोदया लढल्या. त्याची कायदेशीर बाजु मला म्हणायच्या नाही. योग्य अयोग्य या प्रश्नामध्ये मला अटकायचे नाही. पण एक महिला म्हणुन एका महिला अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबद्दल कायदेशीर मार्गाने लढा देऊन यशस्वी होऊन ते पुन्हा एकदा त्याच्या जागेवर पदार्पन झालेले आहेत. त्यासाठी संपुर्ण सभागृहाकडुन आयुक्तांच मला अभिनंदन करायचे आहे आणि आयुक्त महोदया आपल्या अभिनंदनासोबतच अर्थातच सगळया सदस्यांच्या वतीने आपल्याला पुन्हा एकदा नम्र निवेदन सुध्दा करायच आहे की, जेवढया हिम्मतीने आपण लढल्या, आपला हक्क परत मिळविला, तसेच आम्हा सगळयांची आता टर्म संपायला आलेली आहे. तर आमचे जे रेंगाळलेले कामे आहे ते जेवढया भरारीने आपण जर मार्गी लावले तर आमच्या सगळयांसाठीच खुप आनंदाची बाब ठरणार आहे. अशी अपेक्षा व्यक्त करते तुमच्याकडुन आणि या झाशीच्या राणींचा त्यांच्या लढल्याबद्दल अभिनंदन व्यक्त करते पुन्हा. धन्यवाद.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता शुचितातांईनी जो विषय मांडला, खरी गोष्ट आहे. काहींनी आपण परत येऊ नये असे देव पाणीत ठेवले होते. जसे त्यांनी म्हटले की, सगळयांना पुरुन आपण उरलात. परंतु आमची सभागृहाची जी बेचैनी आहे, ताई शेवटी बोलले की, निवडणुकीचा काळ जवळ आलेला आहे. छोटे छोटे कामे जे मनपा फंडातुन करतील. आणि अनेक वेगळे कामे जे असतील ते आपण तातडीने मार्गी लावावी. अशी या सभागृहाची प्रमाणिकपणे आपल्याला नम्र विनंती करतो. आणि निश्चितपणे आपण ती लावाल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** सभागृहातील सर्व सदस्यांना आपण समान न्याय देणार अशी मी अपेक्षा करतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** खरच आयुक्त मॅडमांना खुप खुप अभिनंदन आणि जशी व्यक्त केलेली अपेक्षा आहे, जेणे करुन पुढच्या याच्यात कामे होणारच आहे पण महापौर महिला आहे आणि आयुक्त महिला आहे आणि सन्मा.सदस्या महिला सदस्यांची ही संख्या जास्त आहे. तर आयुक्त मॅडम आणि महापौरांची जबाबदारी आहे. त्यांनी महिलांकडे जास्त लक्ष देऊन महिलांचे कामे जास्तीत जास्त मार्गी लागले पाहिजे याकडे लक्ष दिले पाहिजे. आणि आजच आनंदाची गोष्ट वाचली पेपरला, मनपामध्ये १५७ पदांचा आकृतीबंध मंजुर झालेला आहे. आणि त्याच्यामध्ये ६५० पदे भरली जाणार आहे. आमचे आमदार महोदय यांनी विधानसभेमध्ये पण प्रश्न मांडलेला होता. आणि त्यांनी वारंवार पाठपुरावा करुन गिरीषभाऊ, गुलाबभाऊ यांचे सहकार्याने आणि मामांनी जे प्रयत्न केले आणि आयुक्त मॅडमांनी जे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना आज यश आलेल आहे असे पेपरात वाचलेनंतर कळले.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई राहुन गेले, आणि सर्वांचे खुप खुप अभिनंदन करते आणि असेच प्रयत्न आपण सातत्याने चालु ठेवावे. आपल्याला विकासासाठी एकत्र यायचे आहे. भांडणे करतच असतो. ते सभागृहापुरते मर्यादित ठेवावे. पण विकास कामांसाठी सगळयांनी एकत्र येऊन जास्तीत जास्त कामे करा. आता शेवटची टर्म राहिली आहे. शेवटचे ४-५ महिने आपल्याला संधी आहे. आपण संधीचे सोने करावे. जो गेलेला काळ आहे जो विसरुन जे येणारा काळ आहे त्यात जास्तीत जास्त कामे कसे मार्गी लागतील. त्यावर आपण लक्ष देऊन कामे लवकरात लवकर करावे असे मांडते. आणि मॅडमांचे आणि सर्वांचे खुप खुप अभिनंदन.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता मॅडम, मिटींगच्या अगोदर मी मॅडमांच्या दालनात होतो. मॅडमांनी सांगितले की, एक महिन्याच्या आत मध्ये मी भरती करु शकते. त्यांना बाकीच्यांनी साथ दिली तर. आणि तसा प्रयत्न चालु आहे. लवकर करा मॅडम म्हणजे तुम्हालाच हॅण्डस भेटतील. आणि बऱ्याच जळगांवकरांना रोजगार पण भेटुन जाईन. दुसरा विषय आपला नेहमी प्रमाणे ७ व्या वेतनाची माहिती द्या.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर मॅडमांच्या परवानगीने बोलते, उपायुक्त उपस्थित आहे, आस्थापना अधिक्षक ही उपस्थित आहे, परंतु या संदर्भात आपण पाठपुरावा करत आहोत. एका महिन्याच्या आत आपण लावण्याचा प्रयत्न करु. सर्वांनाच एका पध्दतीने ७ वा वेतन लागु होईल याची मी ग्वाही देते.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका महिन्याच्या आत, पक्का,

**मा.आयुक्त :-** पक्का, पक्का, एकच मिनीट, मा.महापौर मॅडमचे, सभागृहाचे, मा.गिरीषभाऊ, गुलाबभाऊ आणि राजुमामांचे सर्वांचे खुप खुप आभार, ते माझ्या या लढाईमध्ये सोबत होते. आणि नेहमी प्रमाणे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एक गाडीचे दोन चाक आहेत. आपल्याला सोबत मिळुन काम करायचे आहे. तुमची जी राहिलेली शेवटचे ४-५ महिने आहे. त्यात जास्तीत जास्त विकासाचे कामे करु . त्यामुळे मी आवाहन करेल

लोकांना फेब्रुवारी सुरु आहे. जास्तीत जास्त टॅक्स भरण्यासाठी लोकांना इनकरेज करावे. कारण जे.एम.सी. फंडाचे कामे आपले याच्यातुनच होणार आहे. शासनाचा जो निधी आहे तो परत जाणार नाही. यासाठी प्रशासन सर्वकडुन प्रयत्न करेल. आणि सर्वांनी ज्या शुभेच्छा दिल्या त्यासाठी सर्वांचे आभार. थँक यु.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आज दिव्य मराठीमध्ये रस्त्यांबाबतीत विचारण्यात आलेले आहे. शहरात २५ पेक्षा अधिक रस्ते, ३९ रस्ते, कोणी केले, आयुक्त आलेले आहे येथे आता, ठराविक ५ कामे केलेले आहे. परंतु काम करत असतांना एक चाणक्य निती असते. महोदया हे ४२ कोटीचे कामांमध्ये हे भारतीय जनता पार्टीच्या वेळेमध्ये ४ वर्षापुर्वी मंजुर झालेली आपली ही याच्यावर नजर आहे, ४ वर्षापुर्वी हे अडकुण पडलेला होता. त्या कामांची यादी वाचली त्या वेळेची. आपण तर वाचलेली असेल, आपण ही वाचलेली आहेत. सगळयांनी वाचली असेल. कोणते कोणते कामे कसे करण्यात आलेली आहेत. परंतु मी सांगितले चाणक्य निती, जळगांव शहराचे जे आवक होते. ते करण्याचा आपण प्रयत्न केला. त्या कामामधुन त्या वेळेला असे असे कामे टाकले होते. वॉल फिनिशिंग अमुक टमुक, कंपाऊंड भिंत, हे कामे टाकण्यात आली होती. नंतर आमची सरकार आली. शिवसेनेची सत्ता आली. हे पैसे परत गेले, परत आम्ही पाठपुरावा केला. परत ते पैसे आले. परत आमची सत्ता गेली, परत ते पैसे जमा झाले. अर्धवट कामे झालेली आहे. परंतु अजुन पालकमंत्री म्हणा, आम्ही म्हणा, नितीनभाऊंनी म्हणा विनंती केली, ते पैसे आज आपल्याला परत आलेले आहे. आजच्याच पेपरात आलेले आहे की, आजच ते पैसे आपण बी.एम.सी.कडे वर्ग केलेले आहे. मग याचे अर्थ होते हेच,श्रेय कोणी पण घेव, पण आज जळगांव शहराला रस्त्यांची आवश्यकता आहे. ॲड.शुचिताताई आहे , त्यांनाही माहिती आहे. म्हणजे भाऊंनी ज्या वेळेला त्यांनी हाईकोर्टात केस टाकलेली होती. आणि आम्ही दोघी बसलेलो होतो. भाऊंना सांगितले, आज आपल्याला जळगांवकरांसाठी रस्ते आणि ओनली रस्त्यांची आवश्यकता आहे. आपण वाटाघाटी करुन त्याच्या बद्दल कामे फक्त रस्त्यांचे टाकले, ठेकेदार कोण आहे आम्हाला काही घेणे देणे नाही. तुच काम कर तुच आम्हाला जळगांवची रस्ते बनवुन दे. ही आपण विनंती केली. त्याच वेळी, ॲड.शुचितातांईशी, भाऊंशी सांगितले की, त्याच्याशी बोला, त्यानी हायकोर्टात केस टाकलेली आहे, त्यांना सांगा की, ती केस तुम्ही मागे घ्या. जे ठेकेदार आहे त्यांच्याशी वाटाघाटी करुन त्यांना हे देऊ. म्हणजे आज कसे आहे कोणीही त्याचे श्रेय घेणार. निघुन गेलेले आहे. पण अभिनंदन करतो नितीनभाऊंचा, त्यांचे संकल्पनेने मला, मी मांडलेल्या विषयाला त्यांनी मान दिला, आज जळगांव शहराचे जेवढे रस्त्यांचे कामे झालेले आहे. म्हणजे एकुण जे रस्ते आहे. ४२ कोटीचे. ती संकल्पना फक्त आणि फक्त नितीनभाऊंची आहे. बाकी किरकोळ आहे, कुलभुषणभाऊंनी ५ कोटी वेगळे आणलेले आहे, कैलास आप्पांनी वेगळे आणलेले आहे ती गोष्ट वेगळी आहे. परंतु १०० कोटीतुन ४२ कोटीची जी कामे चालु आहे, शुचितताई म्हणतील, त्यावेळेला आपण मिटींग केली गिरीषभाऊं बरोबर, एक मागे घेतली आणि एक अजुन, आम्हाला नितीनभाऊंचे अभिनंदन करावे असे वाटते की, त्यांनी जळगांव शहरातील मुलभुत सुविधा मधील जे एक आहे ते म्हणजे रस्ते, त्या बाबतीत त्यांनी हे धोरणात्मक निर्णय घेतला आणि आमच्याही शब्दाला त्यांनी मान दिला त्याबद्दलही मी त्यांचा अभिनंदन करतो, महापौरांचे ही अभिनंदन करतो, त्यांच्या कार्यकाळात जळगांवचा जो चेहरा मोहरा आहे धुळगांव म्हणुन आपण जळगांवकडे वाटचाल करतो आहे. त्यांचेही अभिनंदन.

**श्री.कैलास सोनवणे :-** गिरीषभाऊंचे ही अभिनंदन,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तेच मांडत आहे, गिरीषभाऊ, गुलाबभाऊ त्यांचे ही अभिनंदन, खरोखर त्यांनी सुंदर जळगांवसाठी, स्वच्छ जळगांवसाठी त्यांनी मेहनत घेतली, जळगांव शहरासाठी जे सुरेशदादांचा स्वप्न होता ते सादर करणेसाठी हाथभार लावावे त्यांचेही अभिनंदन.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई, ईबाभाई.

**श्री.विश्वनाथ खडके :-** म्हाडा कॉलनी म्हणुन १५०० लोकसंखेची वस्ती आहे. त्याला लागुनच एम.आय.डी.सी.च्या काही केमिकल कंपनीज आहे. तीन ते चार दिवसापासुन केमिकल कंपनी मधुन स्मार्ट फार्मा नावाची कंपनी आहे. रोज रात्री तिकडुन बिषारी गॅस किंवा केमिकलयुक्त पाण्याचा निचरा करत आहे. म्हाडा कॉलनी पासुन त्यांच्या घरापर्यंत पुर्ण त्याचा पसरत आहे नालीतुन ते वास, चार पाच दिवस झाले लोकांना तिकडे सर्दी, खोकला, ताप, चक्कर येऊन पडत आहे, सुनिलभाऊ आणि मी तिकडे रात्री १२.०० वाजता तेथे गेलो होतो. तिकडे जाऊन आल्यानंतर आम्ही त्या लोकांचे सांत्वन केले. तेथे केमिकल कंपनीला जाऊन तिथला तो पाईप बंद केला. तिकडच्या कंट्रोल बोर्डच्या ठिकाणी पण मी गेलो होतो. त्यांना रितसर

निवेदन दिले. फक्त आपल्याला एक विनंती आहे की, प्रशासनाच्या मार्फत आपण त्यांना एक नोटीस काढावी आणि नागरीकांची गैरसोई होणार नाही याची काळजी घ्यावी. थँक यु.

**श्री.सुनिल खडके :-** आयुक्त मॅडम, काल रात्री ११.३०-१२.०० वाजता आम्हाला नागरीकांचा फोन आला म्हाडा कॉलनीतुन आणि एम.आय.डी.सी.तुन जी गटर आहे नाला आहे. तो म्हाडा कॉलनीला लागुन आयोध्या नगर मध्ये तो नाला जातो. तर रात्री ११.३० - १२.०० वाजता नागरीकांचा फोन आला की, तुम्ही आताच्या आता येथे या. कारण लहान मुलांना तर अॅडमिट केलेले होते त्यांनी, मोठे लोक सुध्दा कफ, जे म्हातारे लोकं जे होते त्यांना सुध्दा दम लागलेला होता.आणि श्वास घ्यायला खुप त्रास होत होता. आणि जे मोठे होते दुसरे, लहान मुले त्यांना डोळयांना चुळचुळ होणे,सर्दीचा त्रास तिथल्या तेथे होत होता म्हणजे इतका तिव्र त्रास होत होता की, मी सांगु शकत नाही.आम्हाला ही सर्दी झाली. तेथे गेलो आम्ही, कंपनी मध्ये गेलो. काय नाव आहे त्या कंपनीचे. स्मार्ट फार्मासिटीकल. तर त्या कंपनीचा जो मालक आहे त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. तर तो काय म्हणाला की आम्ही आणि मागे पण आम्ही हा विषय महासभेत मांडलेला होता २०२० ला.आणि आपण त्यावेळेला आयुक्तांना कार्यवाहीचा आश्वासन दिलेले होते. तर काही कार्यवाही त्यांच्यावर झाली नाही. ते म्हणता त्याचे हाथ खुप मोठे आहे. नागरीकांना आपले त्रास होईल आणि नागरीक आपले सहन करतील याच्यापेक्षा त्याचे हाथ मोठे आहे का ? आपण काय कार्यवाही करु शकतो याच्यावर हे तुम्ही बघा. आणि कार्यवाही त्याच्यावर झालीच पाहिजे अन्यथा नागरीक म्हणत आहे की, आम्ही येथे येऊ महापालिकेत उपोषणाला वगैरे काय ? पण ती वेळ येऊ नये. आणि जी आहे ती परिस्थिती आपण हाताळली पाहिजे. एक वेळा आपण तेथे विजीट जर दिली तर बरे होईल. नागरीकांच्या समस्या आहे त्या. आणि दुसरी गोष्ट आमच्या वार्ड नंबर १७ चे जे इंजिनिअर आहे. ते इंजिनिअर काल पासुन फिट आहे. काल पासुन दारुच्या नशेत फिट होऊन पडलेले आहे. आमचे एकही काम त्यांना करायला वेळ नाही.रंधे कसे काम करायचे आम्ही सांगा तुम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** कसे फिट.

**श्री.सुनिल खडके :-** फिट म्हणजे एकदम बेहोश आहे. दारु पिऊन नशेत फिट झालेले आहे ते. आता पण पिलेले आहे, आता ही तेथे पिऊन पडलेले आहे ते ऑफिसला त्यांच्या बरोबर एक कर्मचारी आहे तो ही पिऊन पडलेला आहे. तर ते कार्यवाही करा आम्हाला चांगला इंजिनिअर द्या. एका वेळी आम्ही तोंडी सांगितले होते तुम्हाला की, ताई दुसरा इंजिनिअर द्या आम्हाला. महापौरताईंना ही सांगितले होते. येथे बोलण्याची आम्हाला काही आवश्यकता नाही कोणाची बदनामी करायची. पण ती वेळ त्यांनी आणली. कृपया आम्हाला इंजिनिअर द्या दुसरा. एवढी विनंती आहे.

**श्री.विश्वनाथ खडके :-** जे म्हाडा कॉलनीचा परिसर आहे ना ते प्रभाग क्र.१८ मध्ये इनक्ल्युड केलेले आहे. तेथील जे रहिवास आहे ते आमच्या वार्डाचे आहे वार्ड क्र.१७ चे त्यामुळे होत काय ते लोकं आम्हाला फोन करतात.इकडचे लोक सांगतात की, ते वार्ड क्र.१८ मध्ये इनक्ल्युड झाला आहे. तर याची दखल घेऊन अॅज अरली अॅज पॅसिबल ते वार्ड क्र.१७ मध्ये इनक्ल्युड करा प्लिज. मागे पण दिवाळींच्या वेळीस बाविस्कर साहेबांना सांगितले होते. काहीच झालेले नाही.आयुक्त मॅडम फक्त एकदा आपण आश्वासन द्या.

**मा.आयुक्त :-** चेक करते.

**श्री.विश्वनाथ खडके :-** १८ मधुन १७ मध्ये इनक्ल्युड करा. जगवाणी नगरचा भाग आणि म्हाडा कॉलनी परिसर.

**श्री.नितीन बरडे :-** महापौरताई माझ्या प्रभाग क्र.१२ मध्ये रस्त्यांचे कामे होऊन राहिले आहे, रस्त्यांचे कामे होऊन राहिले आहे. त्या बद्दल आम्ही सर्व प्रथम कैलास आप्पांचे खुप आभार मानणार आहे. त्या वेळेस कैलास आप्पा आणि भारती वहिनी महापौर होत्या. कैलास आप्पांनी आमचे प्रस्ताव घेतले नसते.तर आज ते कामे झाले नसते. त्या बद्दल कैलास आप्पांचे अभिनंदन, आभार.

**श्री.कैलास सोनवणे :-** मागे पण मांडले आहे आता घडीघडी का मांडत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम काव्यरत्नावली चौक ते गाडगेबाबा चौक आज पेपरात वाचले आपण १५ दिवसात रस्ते पुर्ण करा. काव्यरत्नावली चौक ते महाबळ म्हणजे माझे घरापर्यंत पाईपलाईनीचे कामे पुर्ण झालेले आहे. माझ्या घरापासुन ते गाडगेबाबा चौकापर्यंत पाईपलाईनचे अजुन कामे झाले नाही. पाणी कनेक्शनचे झाले नाही.नळ जोडण्या झाल्या नाही. मोठी पाईप लाईन जोडणी झाली नाही. १५ दिवसात कसे काय होणार.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ, काल संबंधीत अधिकाऱ्याशी बोललो या संदर्भात, नळ कनेक्शन एन.ओ.सी.च्या संदर्भामध्ये, पी.डब्ल्यु.डी.च्या साहेबांशी पण बोललो,त्यांनी सांगितले आम्हाला एन.ओ.सी.मिळाली नाही आणि आपले नेमाडे साहेब म्हणतात की, एन.ओ.सी.दिलेली आहे. म्हणजे काय, हे

बघा, आता ईबाभाईंनी ज्या पध्दतीने मांडले, १०० कोटी आले, परत कामे बदलले, त्यात परत कामे आले.याच्यापुर्वी पण असेच झाले आहे. ज्या वेळेला १०० कोटी रुपये महापालिकेला उपलब्ध झाले. त्यावेळेला वरिष्ठांचा दोष नव्हता. नगरसेवकांचा पण दोष नव्हता. हे इंजिनिअरचे काम होते. त्या ठिकाणचे काय आऊटपुट आहे, काय इनपुट आहे. काय करायचे आहे आपल्याला, त्या ठिकाणी प्रत्येक, आता यांनी सांगितले, ईबाभाईंनी वॉल कंपाऊंडचे कामे टाकले हे टाकले. ईबाभाई त्यावेळेची परिस्थिती सांगतो. त्या वेळेला अमृतचे कामे सुरु होते. जळगांव शहरामध्ये आणि नुकतेच भुयारी गटारच्या कामांना सुरुवात झाली होती. आर्धा शहर त्याच्यामध्ये खोदला जाणार होता म्हणुन ऐकुन घ्या एक मिनीट, तुम्ही बोलत होते मी डिस्टर्ब केले का ? त्या वेळेला हे १०० कोटीचा विन उपयोग व्हावा त्यासाठी काही रस्त्यांचे, काही गटारींचे काही वॉल कंपाऊंडचे कामे त्याच्यामध्ये घेतले होते. कालंतराने ज्यावेळेला महापालिकेची सत्ता बदलली. सरासरी या गोष्टीला दोन वर्ष झाले. त्यावेळेला अमृतचे भुयारी गटारचे कामे जवळ जवळ आटोपले गेले होते.त्या वेळेला परत नितीनभाऊ असतील, जेष्ठ जे असतील वगैरे यांनी बसुन परत हे ठरविले की, यांनी बसुन परत ठरविले की, आपण गटारी, वॉल कंपाऊंडचे कामे कॅन्सल करुन रस्त्यांचे कामे करु. त्या वेळेपासुन रस्त्यांच्या कामांसाठी तो निधी येऊन पडला.त्याचा कोर्ट मॅटर झाले सगळे झाले. या सगळया मॅटर मध्ये आपण ३८ कोटी मध्ये आपण रस्त्यांचे कामांची सुरुवात केली. आपण मोहाडी रस्त्याच्या कामाची सुरुवात केली. आपण मोहाडी रस्त्याची पाहणी केली. आपण तात्काळ कामांचे आदेश पण केले. कामाची सुरुवात झाल्यानंतर इंजिनिअर लोकांना तेव्हा जाग येते की, आपली पाईपलाईन टाकायची बाकी आहे. येथे नळ कनेक्शन जोडायचे बाकी आहे. मग हे झोपा झोडतात का ? यांना आठ आठ वेळा फोन लाऊन यांना कळत नाही का ? आपली जबाबदारी काय आहे. निधी परत जाणार नागरीकांचे शिव्या आम्ही खाणार. किती वेळा सहन करायचे. आपण सांगतो कर्मचारी नाही, अधिकारी नाही, मग तेच तेच रडत बसायचे का ? नेमाडे साहेब म्हणतात की, एन.ओ.सी.दिलेली आहे, या समोर येऊन सांगा की, एन.ओ.सी. दिलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** चार महिने झाले त्या रस्त्यांमागे लागलेलो आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** त्या रस्त्याबद्दलच आम्ही आलो होते तुमच्या कॅबिनला निवेदन द्यायला.

**श्री.नितीन बरडे :-** पाणी कनेक्शनचे कामे पुर्ण करा म्हणुन पाईपलाईन जोडणी पुर्ण करा म्हणुन समता नगर पाईपलाईन जोडणी टाकीची अजुन बाकी आहे. अधिकाऱ्यांमुळे जर कामे थांबत असतील तर काय करायचे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** एन.ओ.सी. देऊन झालेली आहे आणि महाबळ चौकापासुन ते गाडगेबाबा चौकाच्या पुढची, ती समता नगरची पाईपलाईन बाकी असल्यामुळे त्याला आपण एन.ओ.सी.दिलेली नाही अजुन आणि गाडगेबाबा चौकात समता नगरच्या पाईपलाईनचा काम या दोन दिवसात चालु होणार आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** पण नळ कनेक्शनचे जे काम, आपण जी पेपरात बातमी दिलेली आहे. महापौरताई आपल्या निदर्शनास आणुन देतो. १५ दिवसात आपल्याला हे कामे पुर्ण करायचे आहे. असे वृत्तपत्रात छापुन आलेले आहे ही माहिती अधिकृत आहे की, अनाधिकृत आहे. म्हणजे यांनी सांगितले आता समता नगरच्या पाईपलाईनच काम सुरु होत आहे. अहो पाईपलाईनच काम सुरु होईल संपे पर्यंत महिना घालवुन टाकतील. कुठले कामे होतील सांगा बरं. परत दोन तीन महिन्यानंतर पावसाळयाला सामोरे जायचे आहे. आम्ही तेच करायचे का ? म्हणजे नागरीकांमध्ये तर रोष आमच्या बद्दल आहे ना. नागरीकांमध्ये काय रोष यांच्या बद्दल आहे का? अधिकाऱ्यांबद्दल आहे का? कर्मचाऱ्यांबद्दल आहे का ? फोन उचलायला तयार होत नाही, वार्ड मध्ये नागरीकांच्या मिटींग असतात, बोलवितो, यायला तयार होत नाही. कारणे सांगतात. आयुक्तांकडे मिटींग आहे, महापौरांकडे मिटींग आहे. तुम्ही २४ तास मिटींग घेतात का या अधिकाऱ्यांच्या. आता विचारा त्यांना समता नगर ते गाडगेबाबा चौकातील पाईपलाईन किती दिवसात करणार.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** दोन दिवसात जोडणी चालु करणार.

**श्री.नितीन बरडे :-** कनेक्शन बाकी आहे लोकांचे ते लवकरात लवकर करा. कारण १५ दिवसांचा अल्टीमेटम मॅडमांनी दिला आहे. तुम्हाला ४ महिने झाले सांगत आहे मी या रस्त्याचे पाणी कनेक्शन पुर्ण करा. आता वेळ शेवटची येऊन गेली.

**सौ.ज्योती चव्हाण :-** साहेब आदर्श नगरच ही काही काम बाकी आहे ते ही पुर्ण करा.

**श्री.प्रशांत नाईक :-** आमचे वार्डाचे झाले का साहेब, कस्तुरी हॉटेल ते नमस्कार मॉल पर्यंत.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आपण आयुक्त मॅडमांना सोबत घेऊन, आता अर्धवट अर्धवट एन.ओ.सी.मिळत आहे. आपण यांच्यासोबत एक बैठक करुन आता यांच्या कडील रस्त्याची अर्धी मिळाली आमच्या कडची अर्धी मिळाली. काम पुर्ण व्हायला पाहिजे. म्हणजे तुकडे तुकडयांमध्ये कामे करणार का आपण ? त्या लोकांना बोलवा ना अमृतच्या लोकांना बोलवा. ड्रेनेजच्या लोकांना बोलवा ना. काय पेंडींग काम असेल तर एक रस्ता तर पुर्ण करा.याला आर्धा करायचा त्याला आर्धा करायच. कसे काय कामे होतील.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** ताई माझा विषय असा आहे, एस.एम.आय.टी.कॉलेज जवळचा, किती वेळा फोन केलेला आहे साहेबांना.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** सुरु होईल ते काम पण,

**सौ.प्रतिभा देशमुख :-** पण किती दिवसात होईल

**मा.महापौर :-** एक मिनीट यावर आता आयुक्त मॅडम बोलत आहे. बसुन घ्या सगळयांनी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कनेक्शन बाकी आहे नळांचे अजुन ताई ते बिल्कुल लक्ष देत नाही.

**मा.महापौर :-** यावर मा.आयुक्त मॅडम सविस्तर उत्तर देत आहे.

**सरिता नेरकर :-** कधीच नाही, संजय पाटील नेहमी आजारी असतात. जास्त जर सांगितले तर सांगता की, मला त्रास देऊ नका. मला अटॅक येऊन जाईल.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** साहेब नेमाडे साहेब

**मा.महापौर :-** सगळयांनी प्लिज खाली बसुन घ्यायचे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृतवाले यंत्रणा देत नाही, इंजिनिअर लक्ष देत नाही. सगळं सत्यानाश चालु आहे तेथे.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.सभागृह, मा.मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखाली पुर्ण अमृत योजनांची महाराष्ट्रात बैठक झालेली आहे. त्यामध्ये एम.जी.पी.ला प्रतिनिधी म्हणुन सल्लागार समिती म्हणुन उपस्थित ठेवलेले होते. त्याअनुषंगाने त्या ज्या काही सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने आपली सोमवारी बैठक झालेली आहे. त्या बैठकीमध्ये आम्ही जे निर्णय घेतले की, आपण ३१ मार्च पर्यंत ती योजना कमप्लिट करणार आपण दिलेले आहे. जेथे जेथे आता डिले का  झाला.तर जो डी.आय.पाईपचा आपला उशिराने निर्णय झालेला होता. म्हणुन ई.एस.आर. टु कनेक्टीव्हीटी आपला खुप दिवसाचा कालावधी गेला,एप्रिल, मे, जुन मध्ये निकाली लागला, मग ते डिस्ट्रीब्युशन करणे, पाईपलाईनचा प्रोडक्शन करणे सुरु  झाले. मिनव्हाईल काय झाले जो पर्यंत हा निर्णय होत नव्हता ना, वाढीव जी व्यवस्था होती तेथे डिस्ट्रीब्युशनच्या पाईप टाकले गेले. त्यामुळे आपला जो शिल्लक निधी होता तो डिस्ट्रब्युशन मध्ये वापरला गेला, आजही आपल्या रेकॉर्डला आपण डी.पी.आर.१ मध्ये ६८००० कनेक्शन दिलेले आहे तर ६८००० कनेक्शन आपले   झालेले आहे. आपण वाढीव प्रोसेस करत आहे आजही. त्यामुळे अमृतची जी सेंट्रल बैठक झाली स्टेट कमिटीची, त्यांनी आता सांगितले की, आता वाढीव करू नका. जो काही वाढीव तुमचा भाग असेल, तो आपण अमृत २.० मध्ये कव्हर करु या. आता अमृत १.० मध्ये मेन डिझाईन मध्ये जे काही झालेले होते. ते आधी कमप्लिट करा आणि यु.सी.द्या. त्या अनुषंगाने मी बैठक घेतलेली आहे. प्रत्येक इंजिनिअर निहाय जसे आता संजय पाटीलांचा विषय सांगितला, समता नगरचा विषय सांगितला, या प्रत्येक ठिकाणी आपल्याला कुठे कुठे एक्सपर्टची घ्यायची गरज आहे. त्याच आपण प्लॅनींग केलेले आहे. २८ फेब्रुवारी पर्यंत फिजीकल वर्क, टेस्टींग आणि फ्लशींग कमप्लिट करण्याच आम्ही नियोजन केलेल आहे. तर त्या हिशोबाने आपले नियोजन कमप्लिट होईल अशी आशा करु या. आता दुसरे याच्याशी रिलेटेड जे रस्ते आहे. ज्यांचे कनेक्शन लागलेले आहे. जे आपल्या रेकॉर्डला कनेक्शन आहे. जेव्हा गिरगांवकर साहेब होते तेव्हा त्यांनी अपार्टमेंटच्या कनेक्शनचे एक सोल्युशन काढले होते. मुख्य पाईपलाईनला दुसरे पाईपलाईन कनेक्ट करायचे आणि तेथुन कनेक्शन द्यायचे. ते मला वाटते ५ हजार अपार्टमेंटची कनेक्शन झालेली आहे. अजुन २ ते ३ हजार कनेक्शन बाकी आहे. त्याची क्वॉन्टीटी आपण अमृतला दिलेली आहे. ती क्वॉन्टीटी घेऊन आपले अमृतचे कनेक्शन होतील. परंतु कनेक्शनमुळे आपले डिस्ट्रीब्युशनचे काम थांबणार नाही. कनेक्शन ही चालणारी प्रोसेस आहे. म्हणुन आपण मेन डिस्ट्रीब्युशनकडे फोकस करु  या. आणि मेन आपली पाईपलाईन कमप्लिट करण्यावर भर देऊ या. आता राहिला प्रश्न रस्त्यांचा, जेथे जेथे रस्ते, तुमचा जो आरोप आहे तो बरोबर आहे. रस्ता बनतो आणि खोदला जातो. पण जेव्हा फ्लशींग करतो आणि टेस्टींग करतो ना. जेथे क्रॉस कनेक्शन किंवा टी तेथे प्रेशर येतो आणि ते फुटतात.ही प्रेशर टेस्ट होणे खुप आवश्यक आहे. कारण की ती झाली नाही तर ते आपल्या लक्षात येणार नाही. माझी विनंती आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मॅडम एक मिनीट, हे प्रेशरमुळे ते फाटत असेल आणि रस्त्याचा खोदकाम कराव लागत असेल, ते क्लियर करण्याची जबाबदारी कोणाची आहे. नविन रस्ते झालेले आहे समजा,

**मा.आयुक्त :-** आपण यात एक डिसिजन घेऊ या. कारण की, जेथे समजा रस्ता झालेला आहे कारण की, खोदकाम झाल्यानंतर ते काम महापालिका करते की, अमृत करतो तर ते रिपेअर कोणी करावा. तर यासाठी आपल्याला जे.एम.सी. फंडातुनच काही तरी करावा लागेल. त्या हिशोबाने आपण नियोजन करु.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपण ८ महिने ९ महिने जे रस्ते बनविले, त्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती किती महिन्यासाठी किती वर्षासाठी त्या ठेकेदाराकडे आहे. जे काही असेल ते.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता:-** ५ वर्षाची असते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ५ वर्षाची. तुम्ही शहरामध्ये आता महापौरताईंना पण विनंती आहे. आपण काँक्रीटीकरणाच्या ईच्छादेवीच्या ठिकाणी, डी-मार्ट असे बरेच ठिकाणी पाहणी केली. आपण सिंधी कॉलनी पासुन ते सिव्हील पर्यंतच्या रस्त्यावर जा. येथुन पांडे चौकापासुन स्वातंत्र चौकापर्यंत जा. हे झाल्यानंतर उपकॉलन्यांमध्ये जे रस्ते झालेले आहे. त्याचा एक दौरा करा. आम्हाला सांगा त्याची, म्हणजे आज तुम्ही बघा, कंजरवाड्याच्या समोर इतका मोठा खड्डा पडलेला आहे. आता झालेला रस्ता आहे. मग कोण लक्ष देणार त्याच्याकडे. आता पावसाळा सुरु होईल.आता जे माझ्या प्रभागामध्ये रस्ते झालेले आहे. मागे व्हिजीट करतांना मी आपल्याला दाखविले. त्यावेळेला आपण सांगितले की, ठेकेदाराला या संदर्भात कार्यवाही करु. आमच्या प्रभागामध्ये जेवढेही डांबरीकरणाचे रस्ते झालेले आहे. त्याला ६ महिने वर्षभर पण कालावधी झालेला नाही. त्याला पण खड्डे पडलेले आहे. मग काय करायचे या ठिकाणी. परत नागरीकांचा रोष आम्ही आंगावर घ्यायचे का ? आपली तत्परता आपली काळजी नाही का की, आपले इंजिनिअर, इंजिनिअर स्पॉटवर जायला तयार होत नाही. ठिक आहे, पी.डब्ल्यु.डी.चा विषय जरी असला, पण आपल काम नाही का ? त्यांच्या हाथाखालील माणसाला पाठविता, त्याला काय कळतं त्याच्यातले, ही जबाबदारी नाही का महापालिकेची. आणि ज्या वेळेला महापौरताई आपल्याला पण एक विनंती आहे. आता पर्यंत आपण नागरीकांकडुन आपण सगळया प्रकारचे कर वसुल करतो. हे कर वसुल करतांना आता पर्यंत जे पण कामे झाले विशेष निधी १०० कोटी, ५० कोटी, २०० कोटी, ६० कोटी, पालकमंत्री किंवा त्यावेळेचे जे जे मंत्री असतील. त्यांचे माध्यमातुन तो उपक्रम झालेला आहे. जळगांवकरांकडुन आपण स्थानिक कर वसुल करुन घेतो. हे जळगांव महापालिकेची काही जबाबदारी नाही का महापौरताई की, आपल्या जे ६ मिटर मधील रस्ते आहे. घेता येत नाही, घेता येणार नाही. ते आपण का घेत नाही, कॉलनी परिसरचे. कॉलनींमध्ये विकास कामे आपल्याला सुचता, पण ते काम का सुचत नाही आपल्याला. ईबाभाईंने आयत्या पिठावर रेगोटा मारण्याचा प्रयत्न केला, आपले महापौर, आपले सदस्य आपल्या सगळे त्या ठिकाणी, त्यांना सांगा ना, आपण जर स्थानिक लेव्हलवर जर निधी उपलब्ध करुन दिली तर.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मी महासभेत मुद्दा मांडला होता ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मग आपलेच महापौर आहे ना, आपण ज्या पध्दतीने कवकवा करुन सांगितले की, जेष्ठ सदस्यांनी असे केले तसे केले, तर जळगांव महापालिकेची जबाबदारी नाही का ? ६ मिटरच्या आत रस्ते घ्यायची. महापौरताई आपण विशेष निधी...

**मा.महापौर :-** मला सांगा प्रत्येक शासकीय निधी जो वापरला जातो त्यामध्ये मनपा फंड सुध्दा असतो. ३०%-३३% मनपा फंड पण असतो. ते जॉईंट असतो त्याच प्रमाणे, सन्मा.नगरसेवक ज्या वेळेला कामे प्रस्तावीत करतात, त्यावेळेला मनपाचा सुध्दा जॉईंट

**श्री.जितेंद्र मराठे :-** फक्त आपल्याकडे मोजके असे विशेष पदाधिकाऱ्यांचे आणि विशेष सदस्यांचे प्रभागातील रस्ते मनपा फंडात घेतले जातात. त्यांना विशेष निधीची गरजच पडत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला या ठिकाणी बोलायचे आहे. आता कांचन नगरचे रस्ते, मला असे माहित पडले प्रशासनामार्फत त्याला विरोध करत आहे, १० कोटीचा जो निधी आला आहे. आणि त्याला मनपा फंड जोडणीसाठी विरोध होत आहे. त्या ठिकाणचे बरेच काम बाकी आहे. मी तुम्हाला भेटणार आहे त्या संदर्भात. तेथील नगरसेवक आणि मी, तर त्याला मनपा फंड जोडुन द्या मॅडम प्लिज सांगतो. ३ कोटीचा निधी आहे त्यासोबत मनपा फंड जोडुन द्या आम्हाला. आता बोलले ना, महापौरताई बोलले ना. आलेल्या निधीला मनपा फंड पण जोडतो. आमचा कांचननगर जळगांवाच्या बाहेर आहे का ? त्याला कोणीही वाली नाही का ? प्रशासन त्याठिकाणी विरोध करत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई जे निधी आहे ते निधी तर आहे, पण तुमच्या स्तरावर सुध्दा तुम्ही निधी उपलब्ध केला पाहिजे ना. आता पर्यंत आपण सगळया बाबतीमध्ये ओरडत राहिलो. ईबाभाई सांगता आमच्या जेष्ठ सदस्यांनी, भाजपाच्या जेष्ठ सदस्यांनी हे काम केले, तुम्ही पण तुमचा काही तरी कार्य दाखवा ना. तुम्ही आयत्या आलेल्या निधीवर फेऱ्या मारुन दाखविले तर त्याला अर्थ नाही.

**श्री.अनंत जोशी** :- जितुभाऊ एक मिनीट, एक मिनीट,

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट ऐकुन घ्या. मी उत्तर देतो, तुम्हाला माहित नसेल तर, मनपा फंडातुन जवळपास ५० कोटी रुपयाचे कामे व्हायचे बाकी आहे. जळगांव शहराचे मनपा फंडाचे किमान ३०-४० कोटीचे रस्त्यांचे विकास कामे झाले त्याची माहिती आहे का तुम्हाला,

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ, विशेषचे सांगत आहे.

**मा.उपमहापौर :-** ऐका ना, तुम्ही ऐकुन घेण्याची परिस्थितीत रहा, मी काय सांगत आहे ते ऐका पहिले. तुमचे बोलणे झाले ना ऐकुन घ्या पहिले. प्रशासनाने असे नाही केले की, तो वार्ड कैलास आप्पांचा आहे की, तो वार्ड राजेंद्र घुगे पाटीलांचा  आहे, शुचितातार्ईंचा आहे की, महापौरांचा आहे की, कोणाचा आहे, असे त्यांनी कधीच नाही बघितले,दोन मिनीट ऐका तुम्ही,

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझ्या प्रभागामध्ये एक रुपयाचे मनपा फंडाचे काम दाखवुन द्या. मनपा फंडाचे स्वतंत्र मनपा फंडाचे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** उपमहापौर साहेब, ऐकुन घ्या.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही समजुन घ्या, हा जो  मनपा फंडातील निधी असतो तो विशेष निधी सोबत जोडला जातो. मनपा फंडातुनच पैसे द्यायचे आहे ना. आपण विशेष निधी सोबत असतील, नगरोत्थान निधी सोबत असतील, किंवा शासन स्तरावरुन जो काही निधी उपलब्ध झाला, त्याच्या सोबत आपण मनपा फंडातला जो निधी जोडला, मनपा फंडातला निधी म्हणता नाही येणार का त्याला, तर मनपा फंडातलाच म्हणता येईल ना. आपण जर बघितले असेल,

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपल स्वत:चे काम मनपा फंडातुन आहे ना. आपण स्वत: मनपा फंडात ६८ लाखाचा रस्ता केलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** ६८ लाख मनपा फंडातुन नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो, तुम्ही ठराव पहा ना मागचे.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**मा.उपमहापौर :-** मनपा फंडातुन संपुर्ण शहरामध्ये किमान ४० ते ५० कोटी रुपयाचे कामे झालेले आहे.

**मा.महापौर :-** एक एकाने बोला शांतता ठेवुन बोला, आणि परवानगी घेऊन बोला. प्लिज खाली बसा. परवानगी घेऊन बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई मुद्दा हा आहे, सभागृहाच्या कामकाजात प्रश्न उत्तराचा तास आहे का ? आणि सन्मा.सदस्यांचा प्रश्न अजेंडयावर होता का ? आपण विनाकारण सदस्यांना इतक्या वेळ चर्चेची परवानगी देता. मग हा सभागृहाला चुकीचा पायंडा पडत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ हे अजेंडयाच्या पलीकडचे आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे सगळे अजेंडयाच्या पलीकडचे आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तुमच्या सदस्यांनी मांडले तर चालते भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो, कोणीही मांडो. आमच्या सदस्यानी मांडो की, तुमच्या सदस्यानी मांडो. सभागृहाचा कामकाज सभागृहाच्या नियमानुसार व्हायला पाहिजे. मला सांगा १२.१५ वाजुन गेलेले आहे. सभागृहाच कामकाज ११.०० वाजता सुरु  झाले पाहिजे होते. १२.१५ वाजेपर्यंत प्रश्न उत्तराचा जो तास आहे त्याच्यातला आलेला एक ही प्रश्नाचे उत्तर त्यात आलेल नाही. आणि अवांतरच सगळे प्रश्न उपस्थित केले जात आहे. मग हीच चर्चा चालत राहील. मुळ प्रश्नाला तर हातच लावला जाणार नाही. सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालवावे. महापौरताई ही आपणास विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांनी सुरुवात केली, मग तुम्ही बोलायला पाहिजे होते ना ईबाभाईंना, तुम्ही ईबाभाईंना बोलायला पाहिजे होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा पण हे चुकीचे आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग तुम्ही सांगायला पाहीजे ना, चुकीचे तर नाही व्हायला पाहिजे ना. मागच्या मागे हात लावायचा होता ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी त्याच विषयावर सांगत आहे, अश्या पध्दतीने जर सभागृहाच कामकाज चालल ना, तर मुळ प्रश्नांनाच हात लावला जाणार नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आता समस्यांच्या संदर्भात आता आचार संहिता आहे त्याच्यामुळे महासभा निघत नव्हती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ, तुमच्या सगळया समस्या आहे, तुम्ही विनाकारण बोलत आहात अश्यातला भाग नाही. परंतु मला सांगा, एक विषय, एका विषयाला धरुन दुसरा विषय, अवांतर चर्चेमध्ये आहे. आता प्रत्येक सदस्याला त्याच्या समस्या मांडण्याची ईच्छा होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला वाटते सभेच्या कामकाजाला सुरुवात करा. मला फोन येत आहे, सासरवाडीला जायचे आहे. माझ्या मुलाच्या शालकाची हळद आहे. उद्या लग्न आहे.

**मा.महापौर :-** आप्पा खाली बसा, तुम्ही पण खाली बसुन घ्या. प्रश्न उत्तराचा तास सुरु होत आहे. आणि प्रश्न उत्तरांना सुरुवात होणार आहे. बाकी कोणी बोलणार नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** महापौरताई, मला बोलायचे आहे, महत्वाचा विषय आहे. मला बोलायचेच आहे. मला परवानगी द्यावीच लागेल तुम्हाला. परवानगी द्यावीच लागेल.

**मा.महापौर :-** परवानगी आर्धा तास मिळणार नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** चंदु अण्णा नगरचा विषय आहे. आपल्या कचरा गाडया जातात. तीन महिन्यापासुन टेन्डर काढलेल आहे.आम्ही कितीदा तुम्हाला तेथे बोलविले, मी सगळया कचरा गाड्या बंद करेल. लोकांना घेऊन आंदोलन करेल. तुम्ही टेन्डर काढा मनपा फंडाच ते काम कोणी घेत नाही. जबाबदारी कोण घेईल बिलाची, आम्ही ठेकेदार आणतो, तुम्ही बिलाची जबाबदारी घ्या. सहा महिने आठ महिन्यात त्याला बिल काढुन देऊ. कोण जबाबदारी घेईल. कोण जबाबदारी घेणार याची. सगळयात मुख्य रस्ता आहे. सगळया जळगांव शहराचा कचरा तेथुन जातो. आम्ही तुम्हाला वारंवार बोलतो, वर्षभरापासुन मागे लागलो आहे. चंदु आण्णा नगर पासुन ते कचरा फॅक्टरी पर्यंत रस्ता केला पाहिजे. सगळयात मुख्य रस्ता आहे तो. आम्ही बोलायचे नाही का आम्ही बसुन राहयचे का ? सगळयात महत्वाचा रस्ता आहे तो. आम्ही चारही नगरसेवक सोबत येऊ. आंदोलन करु. गाडी एकही जाऊ देणार नाही. रितसर कार्यवाही करा आमच्यावर.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मागच्या वेळेस पण हा रोड घेतला त्यावेळेसपण शुध्द हवा घेतला मग त्या परिसरातील नागरीकांना शुध्द हवा नकोय का तो रस्ता का घेतला जात नाही.

**मा.महापौर :-** चला आता प्रश्न उत्तराच्या तासाला सुरुवात करण्यात येत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ताई, भाऊ एकच मिनीट, आपण सांगतात भाऊ, आम्ही आपल्या जेष्ठतेचा सन्मान करतो. आपण सांगितलेल्या प्रत्येक गोष्ट मानाने सन्मानाने ऐकुन घेतो. भाऊ तुम्ही आता, आप्पा असे नाही ना, तुमचे बोलणे चालु द्यायचे आणि आम्ही बोलायचे नाही का ? ईबाभाईंचा विषय आहे ना आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्तांच्या दालनात जाऊन चर्चा करायला पाहिजे आपण या सगळया गोष्टी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ १२.३० चा टाईम तुम्ही दाखवता आहे. याच्यापुर्वीच्या महासभा तुमच्या ६.०० वाजेपर्यंत चालल्या आहे. अवांतर चर्चेमध्येच. आणि वेळेवर महासभा सुरु झाली तर आम्हाला पण चांगले वाटेल की, लवकर आलेले आहे आपण. वेळेवर आपण त्या ठिकाणावर उपस्थित झाले आपण आणि लवकर महासभा सुरु झाली.

**मा.महापौर :-** सगळयांचे समाधान झाले असेल तर काही आवश्यकता नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** काही आवश्यकता नाही. त्याला ७-७ ८-८ महिने होऊन गेलेले आहे. मी टाकलेला प्रश्न आहे मलाच आठवत नाही की, तो आहे कोणता. त्यामुळे याची काही आवश्यकता नाही. अजेंडयावरचे विषय घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृतचा विषय आहे  हुडकोच्या संदर्भात जे कनेक्शन द्यायचे आहे त्याबद्दल काय निर्णय घेतला तुम्ही. हुडको वार्ड क्र.४,२,१, आमच्या प्रभागामध्ये हुडको आहे. त्याचे अमृतचे कनेक्शन कोणत्या आधारे देणार तुम्ही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मॅडमांनी आयुक्त पदाचा परत कार्यभार स्विकारला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. तसेच मनपा मध्ये जो १५७ पदाचा आकृतीबंध मंजुर झाला आहे. आणि ते मंजुर करतांना ज्या आयुक्त मॅडम, महापौर मॅडम, आपल्या जळगांव शहराचे आमदार, पालकमंत्री, यांनी जे काही त्याचा पाठपुरावा केला, त्यात

आपल्याला यश आले त्यांच्या सर्वांचे अभिनंदनाचा ठराव पारित करण्याची सभागृहाला विनंती करते. तसेच मला आयुक्त मॅडमांना एक विचारायचे आहे. जर आकृतीबंध मंजुर झाला तर महापालिकेचा कामकाज कश्या पध्दतीने होणार. हे तुम्ही आम्हाला सांगितले पाहिजे. दुसरा असा विषय होता. म्हणजे ज्या कर्मचारी अधिकारी ज्यांना पदोन्नती मिळाली नाही. त्यांना पुढे पदोन्नती कशी द्याल तुम्ही. या बद्दलही तुम्ही मला थोडे मार्गदर्शन करा. तसेच ज्यांना ७ वा वेतन आयोग लागला नाही. ज्यांच्या काही त्रुट्या बाकी आहेत.त्या लवकरात लवकर आपण पुर्ण कराव्या.ही आपल्यावर एक जबाबदारी मोठी आहे. ती लवकर करावी. महापौर मॅडम एक दुसरा विषय जितेंद्रभाऊंनी या ठिकाणी जे काही मांडले ते एकदम बरोबर होते. मनपा निधी हा फक्त ठराविक वार्डातच मिळतो. मला सांगा, सगळया याद्या तुमच्याकडे असेल की, कोणत्या वार्डात किती निधी गेला. तो जरी आता येथे दाखविला तर समजेल तुम्हाला की, किती वार्डात किती निधी गेलेला आहे. फक्त मनपा निधी. हा दुजाभाव होत आहे. ठराविक पदाधिकारीच याचा फायदा घेत आहे. बाकीच्या नगरसेवकांना त्याचा निधी मिळत नाही. याची नोंद आपण घ्यायची. आणि तसे रेकॉर्ड आता मिळाले तर मागवा आणि सभागृहात सादर करा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट तुम्ही बोलले बसा, त्या दिपमालाताईने कमीतकमी सभा सुरु झाली तेव्हा पासुन हात वर केलेला आहे.

**मा.महापौर :-** खरंच मला आवाज आले नाही. बोला.

**सौ.दिपमाला काळे :-** मला एकच विषय मांडायचा आहे मा.महापौरताई आयुक्त मॅडम, आयुक्त मॅडमांनी जसे सांगितले होते की, टॅक्स कमप्लेन्टसाठी तुम्ही आम्हाला मदत कराल.एक तोही प्रॉब्लेम आहे की, जे तुम्ही सर्व्हे केला होता. त्या सर्व्हेवर काही नागरीकांना ऑब्जेक्शन होते. ते ऑब्जेक्शन त्यांनी घेतले होते पण ते बिले तसेच्या तसेच त्यांना पाठविले गेले. त्यावर हरकत नाही घेतली किंवा ते सॉल्व नाही झाले. तसेच त्यांना बिले रिपीट झालेले आहे. तर नागरीकांना हाच एक प्रॉब्लेम आहे की, ते टॅक्स भरायचे कसे. कारण आमचे जे क्लॉजेस होते ते पुर्ण झालेले नाही. परत तेच बिले रिपीट केलेले आहे. तर नागरीकांना तेच प्रॉब्लेम आहे की, ते भरायचे कसे काय ? ते बिले सुधरवुन त्यांना ते परत करा. पुन्हा तेच बिले पाठवु नका. एक रिकवेस्ट आहे आयुक्त मॅडम आणि महापौरताई.

**मा.महापौर :-** आता बस, फक्त ताईंनी विचारलेल्या प्रश्नांच आयुक्त मॅडम उत्तर देतील.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आमचेही काही प्रश्न आहे ते सभागृहापुढे मांडायचे आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** एकसाथ द्या उत्तर तुम्ही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझा विषय वेगळा आहे, तुमचा विषय वेगळा आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ताई, लोकांच्या रोजीरोटीच्या प्रश्ना व्यतिरिक्त तुमचा प्रश्न महत्वाचा नाही. आज आमच्या पोटापाण्याचा विषय आहे. त्याच्यापेक्षा मोठा तुमचा प्रश्न आहे का मी विचारतो तुम्हाला. महापौर महोदया, या सभागृहामध्ये आपण दोन विषय घेतले होते. कैलास आप्पा आपण स्वत: म्हटले होते. जो पर्यंत ट्रान्सपोर्ट नगरची जागा आणि भंगार बाजारची जागा आपण दोघी मिळवुन काही तरी करु. काही तरी नियोजन करु. बरोबर आहे. परंतु भंगार बाजाराची जागा बद्दल एवढा तत्परता का ? आयुक्तांनी आम्हाला बोलविले आम्ही आयुक्तांकडे गेले. आपण आम्हाला सांगितले की, त्यांच्यावरती स्टे आलेले आहे. बरोबर आहे. आम्ही मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेब आहे त्यांचेकडे व्हिप दाखल केलेली आहे. ते तुमच्या पर्यंत आलेले तुम्ही मांडले काय मांडले माहित नाही. एवढे करुन सुध्दा आम्हाला सांगितले की, तुमच्याकडे काहीच पुरावा नाही. आपणच आम्हाला जागा प्रोवाईड करुन दिलेली आहे. आम्ही स्थलांतरीत आहोत नॉट फोर अतिक्रमण. सर्व प्रथम पत्रकार महोदय आपल्याला विनंती करतो. आम्हाला अतिक्रमीत म्हणु नका. ठरावाच्या कॉप्या तुम्ही वाचा. ही बी.जे.मार्केटची जागा आमची तेथे दुकाने होती. ते ट्रान्सफर करुन शासनाने आम्हाला विनंती केलेली आहे. आम्ही शासनाला विनंती केलेली नाही. शासनाने आम्हाला सांगितले की, तुमची जागा महाग्या मोलाची आहे. त्याच्या बद्दल आम्ही जागा देतो. आम्ही सुरेशदादांच्या स्वप्नाला साकार करण्यासाठी आम्ही होकार भरले, आणि गेंदालाल मिल मध्ये घरे घेतले. आणि दुकान भंगार बाजारात कोणी जात नव्हता तिथे. ३० वर्षापुर्वी, स्मशानभुमी होती. तेथे मेलेले जनावर टाकायचे. आता ती जागा काही लॅन्डमाफियांच्या दिमागामध्ये बसलेली आहे. महोदया आज आपण सांगतात की, माझ्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहे. कोण दबाव टाकत आहे हे आपण सभागृहात सांगायला पाहिजे. परंतु आपल्या निदर्शनास आणुन देतो. आपण सांगितले होते ट्रान्सपोर्ट नगरच्या जागेवरती कोर्टाचा स्टे आहे. मॅडम मी नंतर माहिती घेतली. कोणताही स्टे त्या जागेवरती

आज नाही. जर त्या जागेवरती स्टे नाही, आम्ही मुख्यमंत्र्यांकडे, नगरविकासमंत्र्यांकडे बाजु मांडलेली आहे. आम्ही शासनावरती भरोसा करतो आहे. आम्हाला धमक्या देऊन आम्हाला तेथुन काढण्याचा, एकटा तेथे ईबा पटेल नाही. तेथे कमीत कमी १००० लोकं पोट भरतात.त्याच्या उदरनिर्वाहचा प्रश्न निर्माण होणार आहे. जसे आज लोकं मामुली कामासाठी येथे मोर्चा घेऊन येत आहे. आम्ही पण आमचे मुल बाळांना घेऊन तेथे उपोषणाला बसु का? आमचा विचार कोण करणार आहे. पुर्वी ही ३० वर्षा पहिले आम्ही शासनाच्या निर्देशाशी सहमत होऊन तेथे स्थलांतरीत केले. आज तुम्ही आम्हाला, ठिक आहे ना. शासनाच्या कमी जास्त मध्ये, शासन एक पाऊल पुढे करेल तर आम्ही १० पाऊल पुढे करु. परंतु आमच्याशी दुजाभाव करु नये. किती जागा आपल्या मोकळया पडलेल्या आहे.

**मा.महापौर :-** ईबा भाई.

**श्री.ईब्राहिम पटेल** :- सानेगुरुजीची जागा तशी पडलेली आहे, जुनी नगरपालिकेची जागा तशी पडलेली आहे. ख्वॉजा नगरीची जागा आपल्याला २० वर्ष ३० वर्ष झाले. तशीच्या तशी पडलेली आहे. लोकांना जंगलात सोडुन आले, ती जागा तशीच पडलेली आहे. काय उपयोग झाला तेथे, भंगार बाजाराची जागा तुम्ही काढणार आहे काय उपयोगात घेणार आहे.

**मा.महापौर :-** आपल्या सगळया भावना मॅडमांनी ऐकले आहे. ते त्याचे उत्तर देत आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जर पुढे काही कायदेशीर काही झाले, होईल त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील हे सांगतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई अशी धमकी देऊ नका. धमकी दिली आता, हे धमकी दिली तुम्ही. पुढे काही झाले तर कोण जबाबदार, ही धमकी दिली आता. तुम्हाला धमकी द्यायची आहे का ? धमकी द्यायची आहे का ? बसा तुम्ही आता महापौरांनी मला बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर सांगतील तेव्हा बोला,

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो, मला बोलण्याची परवानगी दिली आहे ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ते ऑर्डर देतील मला.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई तुम्ही आंगात आणु नका जास्त, नितीनभाऊ सांगा.

**मा.महापौर :-** प्लिज शांतता घ्या. बसा खाली.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर मुझे ऑर्डर देंगे ना. ५००-१००० लोगो का प्रश्न है आप्पा. मी प्रशासनाशी लढत आहे आप्पा.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**मा.महापौर :-** बसा खाली.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आम्हाला जागेच्या बदलेत जागा द्या. एखादी झोपडी तुम्ही काढु शकत नाही. आम्हाला तुम्ही सांगत आहे ८ दिवसात जागा खाली करा. निलंबीत करा, निलंबनासाठी तयार आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** निलंबन करुन टाका, त्यांना १००० लोकांचे पडले आहे आम्ही ४ लाख लोकांचे सांगत आहे.

**मा.महापौर :-** खाली बसा सगळे, तुमच्या प्रश्नाच उत्तर आयुक्त मॅडम देत आहे ईबाभाई खाली बसा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया, आज अजेंड्यावरचे विषयच घेऊ नका. आज प्रत्येक सदस्याच्या मनातल्या ज्या भावना आहे ना संध्याकाळ पर्यंत चालु द्या असच.बोलु द्या सगळयांना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ईबाभाई, आयुक्त सांगत आहे तुम्हाला उत्तर देत आहे ते तुम्ही थांबा ना.

**मा.**महापौर :- तुम्ही बसा खाली सगळे, खाली बसा.

**श्री.कैलास सोनवणे :-** दोनच मिनीट ताई. भंगार बाजाराचा जो विषय आहे ना. म्हणजे तो मुस्लीम समाजाशी रिलेटेड आहे, समजा १००% च मुस्लीम आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नाही ९०% आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ९०% मुस्लीम आहे. ५०% ईबाभाईच्या दुकानी आहेत. ईबाभाई काय करता, या सभागृहामध्ये मुस्लीम समाजाचे प्रतिनिधी रुखसानाताई आहे. रियाजभाई आहे. ईबाभाईची बहिण म्हणजे आमची सिस्टर आहे. आणखी आहे. परंतु ईबाभाई काय करतात. दर वेळेस भंगार बाजाराचा विषय आला की, असे काही आंगात आणतात. आता काही गरज नव्हती एवढा हे करण्याची. मी तुम्हाला पुर्ण हे विषय रितसर सांगतो. मी तेव्हा नगरसेवक पण नव्हतो मला माहिती आहे. हे ८५-८६ ची गोष्ट आहे. मी शाळेत जायचो

तिथुन भंगार बाजारातुन, मला माहित पडले भंगार बाजार उचलले आहे. मी लहान होतो आणि त्या वेळेस गफ्फारभाई, करीमभाई या लोकांनी आश्वासन देऊन मदत, काही तरी बोलुन त्याला मार्ग काढुन सुरेशदादा त्या लोकांनी तो तेथुन भंगार बाजार उचलुन त्या ठिकाणी ठेवला,आणि या ठिकाणी व्यापारी संकुल उभारला. इकडेही त्यांना रोजगार भेटलं तिकडेही दुकाने भेटल्या, जे काही असेल. त्यातला जो काही डिटेल असेल ईबाभाईंनी बराच काही सांगितलं, हा जो काही विषय असेल. हा संपुर्ण विषय रितसर आणि नियमाने आहे. याच्यामध्ये कोणत्याही सदस्याने अकांड तांडव करण्याची काही गरज नाही. आणि आपल्या सभागृहात लोकांची दिशाभुल करण्याची काहीही गरज नाही. तुम्ही म्हणत आहात ना गरीब लोकांचा विषय आहे मान्य. मी तर सांगतो ती जागा तुम्ही विकत घेऊन टाका, पण त्या वेळेला गरीब लोकांना विसरु नका. तुम्ही घेऊन टाका ती जागा लिलावात संपुर्ण पण तेव्हा गरीबांना विसरु नका. करणार का तसं ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** करु ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** पाहु ना. आणि रितसर तुम्ही प्रक्रियेला सामोरे जा ना. तुम्ही प्रत्येक वेळेला हाच ईशु का करतात. दर वेळेला हाच ईशु का करतात तुम्ही आमचा भंगार बाजार आमचा भंगार.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मी कधी बोललो, एकाच वेळी बोललो आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोलले आहे मागच्या, अरे सौ.भारती सोनवणे महापौर होत्या तेव्हा बोलले आहे तुम्ही. समाजामध्ये विष पेरतात तुम्ही की, आम्ही मुसलमान आहे म्हणुन आपल्याला अशी वागणुक. पुर्ण जळगांव मधील हे व्यापारी कोण आहे. सेंट्रल फुले मार्केटचे व्यापारी कोण आहे. सेंट्रल फुले मार्केटचे व्यापारी कोण आहे मला सांगा. बी.जे. मार्केटचे कोण आहे, भोईटे मार्केटचे गाळे सिल झाले ते कोण आहे. असा भेदभाव प्रशासनासमोर नाही. प्रशासन नियमाने चालतो आणि प्रशासनाने नियमाने चालावे. ईबाभाई मेरी बात सुन लो. कायद्याने जर त्या मुळ गाळे धारकांना प्रायरिटी देता आली तर त्यांना प्रायरिटी द्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विष मी नाही टाकला आहे आप्पा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अरे ते काय सांगत आहे. ते तर ऐका पहिले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** वो क्या बोल रहे ये तो सुन लो.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तुम्ही काढत आहे भंगार बाजाराचा विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे खरं आहे ते बोलतो. जे करतो ते कबुल करतो. दोन मिनीट एकत पण नाही काय माणुस आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जर खोटं असेल तर त्याला विरोध करु ना आम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** भारती सोनवणे महापौर असतांना

**श्री.ईब्राहिम पटेल :-** कोणत्या जळगांव शहराच्या व्यापाऱ्याला त्रास आहे. फक्त जाणुन बुजुन या लॅण्ड माफियांनी केलेले आहे हे. कोणता त्रास आहे. रस्त्यावरचे पहिले अतिक्रमण काढा. पेट पर जब आती ना आप्पा तो कोई किससे डरता नही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, सौ.भारती सोनवणे महापौर असतांना प्रशासनाने हा विषय दिलेला होता. तो विषय पेन्डींग होता. आणि आम्ही त्यावेळेस सगळे विषय मार्गी लावले. कोणाशीच भेदभाव केले नाही. प्रस्ताव प्रशासनाचा होता आणि तो आम्ही मिटींगच्या पटलावर ठेवला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हे खोटे बोलत आहात तुम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय खोटं बोलत आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** रिकॉर्डींग मागवा सभागृहात.

**मा.महापौर :-** चला बसुन जा सगळे खाली.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा प्रशासनाने आणलेला कायदेशीर प्रस्ताव होता. त्याच्यानंतर माझ्याकडे नितीनभाऊ, ईबाभाई, गफ्फारभाई हे आलेले होते.

**मा.महापौर :-** एक मिनीट थांबवते, कोणीही रेकॉर्डींग करायची नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** परवानगीचा पास आहे का विचारा पहिले.

**मा.उपमहापौर :-** कोण आहे तो जो अशीन त्याच्यावर कार्यवाही करा.

**मा.महापौर :-** रेकॉर्डींग करायची नाही. सभागृहाच्या कामकाजाची.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यावेळेस प्रशासनाचा प्रस्ताव आला होता. डांगे साहेब त्यावेळेला आयुक्त होते त्यांनी पाठवला होता तो प्रस्ताव. सभागृहाने मान्य केला. त्याच्या अगोदर गफ्फारभाई, नितीनभाऊ, ईबाभाई आणि आणखी तीन चार जण माझ्याकडे आले होते.

**मा.महापौर :-** आप्पा तुम्ही बोला.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यावेळेस यांनी विनंती केली, तर मी यांना काय बोललो. तुम्हाला असे वाटत असेल की, आमच बहुमत आहे. तर आम्ही तटस्थ राहतो. शिवसेनेच्या नगरसेवकांनी तुमच्या बाजुने हा विषय नामंजुर करुन टाका. त्यांनी तसे काही त्या वेळेस बोलले नाही. त्याच्यानंतर तुम्ही महापौर झाले. तुमचा बहुमत होत, तेव्हाही ईबाभाईंना बोलविले आहे मिटींगला की, तुम्हाला वाटत असेल की, आमचा विषय खोटा होता तुम्ही मुस्लीम असल्यामुळे आम्ही तुम्हाला हे करतो आहे. आता तुमच्यात हिम्मत असेल तर तुम्ही तो विषय ठेवा. आणि नामंजुर करा. हे मी बोललो. मग का नाही केले.ईबाभाई अभी मेरेको बोलने दो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा विषय तसा नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तसाच आहे विषय. त्याच्यानंतर ताई माझे म्हणणे काय आहे. आता तुम्ही ताब्यात घेऊन लिलाव प्रक्रिया करणार ना. जे मुळ गाळे धारक असतील. त्यांना तुमच्या नियमाप्रमाणे काही प्रायरिटी देता येत असेल.कायद्याने तर प्रायरिटी द्या आणि तुमची कायदेशीर प्रक्रिया तुम्ही पार पाडा. हेच सांगतो आहे. पण ते ऐकण्याच्या स्थितीतच नाही.

**मा.महापौर :-** बसुन घ्या आता सगळे.

**नगरसचिव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४४ अन्वये प्रश्न उत्तर. कलम ४४ अन्वये प्रश्न उत्तर.

**मा.महापौर :-** एक मिनीट आयुक्त मॅडम बोलतील आणि नंतर विषयांना सुरुवात होईल.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर आणि मा.सभागृह, मॅडमांनी तीन प्रश्न विचारले होते. आकृतीबंधाच काय झाल. बिंदुनामावलीनुसार तपासणी होईल. झालेल्या रिक्त पदांचा आपल्या खर्चानुसार आपण ते पदे भरु यात. दुसरा विषय होता. ज्यांना पदोन्नती नाही मिळाली त्यांचे काय ? तर लेखापरिक्षणाचा विषय आपला अंतिम टपप्यात आहे. शासनाकडुन त्याची मान्यता आल्यावर त्यावर निर्णय घेतला जाईल. आपले रिक्रुटमेंट रूल्स भरती नियम ते ही अंतिम टपप्यात आहे. तर ते मंजुरी आल्यावर प्रमोशन आणि याचा निर्णय घेता येईल. ७ व्या वेतन आयोगाचा. आणि तिसरा आहे अनुकंप तोही आपला शासन स्तरावर आहे. रिक्रुटमेंट रूल्स, लेखापरिक्षणचा रिपोर्ट आणि अनुकंपाचा रिपोर्ट आणि अनुकंप हे सगळे पाईपलाईन मध्ये आहे. हे १५ दिवस १ महिन्यामध्ये याचे उत्तर आले की, आपले हे कामे सुरु होतील. आणि आकृतीबंधाचा जसे मी आपल्याला ऑफिसमध्ये सांगितले, आकृतीबंध मंजुर होऊन आला की, आपण पोस्ट तपासु आणि मग रिक्त पदांची भरती करु. सरळसेवा पदांची. मॅडमांनी जे विचारले, टॅक्सचे रिव्हीजन झालेले आहे. टॅक्समध्ये ज्या ज्या वर्षी जे जे दर होते आपण तेच ठेवलेले आहे. दर आपण तेच ठेवलेले आहे. आपण फक्त जे कन्स्ट्रक्शन बदल झालेले होते. कन्स्ट्रक्शन बदलाला फक्त वाढीव दर लागलेला आहे. आणि जेथे कन्स्ट्रक्शन बदलाचे ऑब्जेक्शन होते. ते तपासणी करुन करेक्शन केले. परंतु ज्या लोकांना असे वाटते की, माझ्या मनाप्रमाणे झाले पाहिजे. ते लोकांमध्ये अजुन संभ्रम आहे की, आमच्या हरकती इन्टरटेन नाही झाल्यात. पण तसे नाही झालेले आहे मॅडम.

**सौ.दिपमाला काळे :-** नागरीकांचे म्हणणे काय आहे की, आम्ही हरकती दिल्या होत्या पण आम्हाला पहिले जे बिले आले होते तेच बिले आलेले आहे. त्याच समाधानकारक त्यांना उत्तर मिळत नाही. ते टॅक्स भरायला रेडी आहे पण आम्ही जे ऑब्जेक्शन घेतले होते त्याचे फरफेक्ट उत्तर तुमच्याकडुन मिळत नाही. तुम्ही त्यांना उत्तर द्या.

**मा.आयुक्त :-** तुम्ही एकदा भेटायला या ऑफिसला. किती ऑब्जेक्शन आलेले आहे, किती करेक्शन केले मी तुम्हाला दाखवते.

**सौ.ज्योती चव्हाण :-** एक प्रश्नाच उत्तर राहिलेल आहे. पुर्ण १ ते १९ वार्डात मनपा निधी कोणाला किती दिला ही यादी प्रत्येक नगरसेवकाला द्यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** जेव्हा आपण लेखापरिक्षणाची कार्यवाही करु तेव्हा एकच खुलासा हवा आहे की, ज्यांचे ऑडीट ऑब्जेक्शन निघालेले होते. ज्या कर्मचाऱ्यांवर लेखापरिक्षणातले आक्षेप आहे. त्यांना सुध्दा हे लागु करणार की काय याचा फक्त खुलासा करुन द्या.

**मा.आयुक्त :-** दोन ते तीन दिवस अगोदर चर्चा झाली होती आप्पा जी मागणी करत होते की, ज्या कर्मचाऱ्याच्या समोर शेरा नाही. ऑब्जेक्शन मध्ये नाव आहे परंतु शेरा नाही. असे लोकांना ७ वा वेतन आयोग लागु करा. परंतु आम्ही जेव्हा शासनाकडुन मार्गदर्शन मागविले. तर कॉमन जे आक्षेप आहे त्यामध्ये ते कन्सीडर होतात. म्हणुन लेखापरिक्षणाचा आपले सभागृहाने जो ठराव दिलेला होता तो शासनाला पाठविलेला होता. २२ सप्टेंबरच्या पत्रानुसार कार्यवाही करा आणि सभागृहाने निर्णय घेतला की ईथेच थांबा की कार्यवाही नका करू आणि म्हणुन आपण याचा पाठपुराव केलेला होता तो आता अंतिम टपप्यात आहे. १५ ते २० दिवसात आपल्याकडे त्याचा निर्णय येईल. आणि मग आपण ते ७ वा वेतन आयोग लागु करु.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** तो निर्णय पॉझिटीव्ह आल्यावर सगळयांना ७ वा वेतन आयोग लागु करा.

**मा.आयुक्त :-** पॉझिटीव्ह, आणि ते याच बेसीसवर लावु की, सुप्रिम कोर्टाचे निर्णय आणि ते २५ ते ३० वर्षापासुन येथे काम करत आहे. आणि त्याच पदावर करत आहे जी त्यांची शैक्षणिक अर्हता आहे. या अटींवरच आपण ७ वा वेतन आयोग लावु या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई एकच आयुक्त महोदयांना विचारायचे आहे. सतरा मजलीत होतेय भंगारचे गोदाम. भंगार साठवण्याचे, हे याच्यात कितपर्यंत तथ्य आहे. या विषयावर प्रशासनाने एकदा खुलासा करावा. कारण आता सद्या स्थितीमध्ये अगदी खरं सांगितले तर ही बातमी हा एक मुद्दा झाला. जी आपण जप्त करुन आणतो अतिक्रमणाच्या कार्यवाहीच्या अंडर जे जप्त करुन आणतो. ते सामान सगळ आपण सतरा मजली खाली टाकतो. आणि तेथे हे जे उभारल जात आहे. तर याच्यामध्ये कितपर्यंत तथ्य आहे या बातमी मध्ये खरंच प्रशासन हे करत आहे का ? याबद्दल सगळयात पहिले सर्व सदस्यांना माहिती द्यावी. कारण खरं सांगायचे तर स्वच्छ शहर सुंदर शहर आणि हिरवेगार शहर, बातमी मध्ये सुध्दा लिहलेले आहे. जे सुरेशदादांच सुध्दा स्वप्न होत, ते स्वप्न पुर्णत्वास नेण्यामध्ये यशस्वी तर झालो नाही. जी अखिल महाराष्ट्रामध्ये सन्मानाची बाब म्हटले जाते. महापालिकेची जी प्रशासकीय वास्तु जी सतरा मजली आहे. त्या सतरा मजलीचा आता हे खरोखर असा विद्रुपीकरण होणार आहे का ? आणि असे काही निर्णय घेत असतांना कोणत्या सन्मा.सदस्यांना विश्वासात घेतले आहे. कोणाच्या परवानगीने हे सर्व सुरु आहे. या वास्तुमध्ये जर असे इतके महत्वाचे निर्णय होत असतील. तर आम्हाला किमान कल्पना दिली गेली पाहिजे. आम्हाला सरळ वर्तमान पत्रातुन वाचायला मिळत आहे.खरंतर ही खुप दुखाची बाब आहे. जेष्ठ सदस्य नितीनभाऊ येथे आहे सभागृहात. नितीनभाऊ हे सभागृह जेव्हा उभे झाले, त्यावेळेला सुध्दा आपण या सभागृहाचे सदस्य होते. आज या सभागृहाची सुध्दा काय अवस्था आहे. मला कोणत्याही सदस्यानी सांगावे कोणाचा बाक हा बसणे योग्य स्थिती मध्ये आहे. कोणाच्याच योग्य स्थितीत बसणे सारखे बाक नाही आज. म्हणजे याठिकाणी स्पिच करण्यासाठी जेव्हा आम्ही उभे राहतो. त्यावेळेला सुध्दा अतिशय कनजस्टेड अवस्थेत आम्हाला उभे राहवे लागते. बऱ्याच वेळेला या बेंचच्या बाजुला येऊन बोलाव लागत किंवा राष्ट्रगीतासाठी आम्ही निट उभे राहु शकत नाही. सगळयांची काय अवस्था आहे. आपण जेव्हा लिफ्ट मधुन खालुन वर जातो. त्यावेळेला जे काही दृश्य दिसते. किती कचरा साठलेला आहे प्रत्येक फ्लोअरवर, इतके मुद्दे आहे ताई बोलण्यासारखे, मला वाईट वाटत आहे की, आपला अजुन अजेंडा सुरु झालेला नाही. पण हा फार महत्वाचा मुद्दा आहे. आपल्या सभागृहाच्या बाहेरच्या बाजुला बघा. किती वाईट स्थितीत वायरी उघडया पडलेल्या आहे. उद्या जर काही येथे अपघात झाला. याला जबाबदार कोण राहणार. एक महिला नगरसेविका म्हणुन, एक महिला महापौर एक महिला आयुक्त त्यामुळे आपल्यावरची जबाबदारी ही जास्त महत्वाची आहे. कारण सुरक्षेची आपण कायम काळजी घेत असतो. जेव्हा आपण कुटुंबाची सुरक्षा करतो, जेव्हा आपण शहराची जबाबदारी घेतो त्यावेळेला या सगळयांची जबाबदारी आपल्यावर आहे. अगदी म्हणजे मला पाढा वाचता येईल इतके मुद्दे आहे या सर्वांच्यामध्ये वेळ खुप जाईल म्हणुन मी वेळ घेणार नाही. पण आयुक्त महोदया मला आपल्याकडुन या गोष्टीचा खुलासा हवा आहे. आणि संपुर्ण सभागृहाच्या वतीने महापौरताई आणि आयुक्त महोदया मी तुम्हाला विनंती करते की, या सभागृहाच्या नुतनीकरणाच काम आपण ताबडतोब हाती घ्या. कदाचित आमच्यापैकी काही पुढच्या टर्ममध्ये नसतील नगरसेवक, काही रिपीट होतील. पण जे कोणी लोकप्रतिनिधी या सभागृहात येणार आहे. ते सभागृहात खरोखर त्या लोकप्रतिनिधींनी येऊन बसावे. वावरावे, वापरावे अश्या योग्यतेचे असले पाहिजे ही काळजी घ्या. याचे आधी उत्तर द्यावे.

**मा.महापौर :-** मी परवानगी दिलेली नाही. ताई अजुन बोलत आहे त्यांचे संपलेले नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, मी हा जो प्रश्न विचारलेला आहे की, प्रशासकीय इमारती मागे भंगारचे गोडाऊन होत आहे. महापौरताई हे सुध्दा अनेक वेळी सांगितलेले होते की, जप्त केलेले सामान येथे आणु नका. त्यासाठी आपल्या पर्यायी जागा महापालिकेच्या जागांचा विचार करा. अनेक जागा ह्या सुचविण्यात आलेल्या होत्या. अनेक वेळा प्रशासनाने काय उत्तर दिलेल आहे आपल्याला की, सुरक्षेचा मुद्दा येतो. आपण दुसरे कुठे तरी जर ते सामान ठेवले, मला सांगा ही प्रशासकीय इमारत अगदी सुरक्षीत आहे का ? अगदी मागच्या महासभेचे उदाहरण देते मी. वॉशरुम युज करण्यासाठी मा.महापौरांचे दालन, सिमाताई भोळे आमच्या मामी जेव्हा महापौर होत्या. त्या अॅन्टीचेंबरच दालन वापरण्यासाठी मी आणि दिपमालाताई गेलो होतो. २५ ते ३० दांडगट मुले तेथे बसलेले होते. काय सुरक्षा आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोणाने ते भंगार आपण येथे ठेवणार असाल. तर ही प्रशासकीय इमारत कोणत्याही दृष्टीने सुरक्षीत नाही. आजच्या घडीला कोणी सतरा मजलीवरुन कोणी आत्महत्या जरी केली ना. तरी सुध्दा ते आपण थांबवु शकणार नाही. अनेक ठिकाणी अनेक मजल्यांवर जी परिस्थिती आहे महापौरताई, काहीतरी जर अनुचित प्रकार घडला. अगदी कोणी कोणाच प्रेत जरी आणुन टाकलेले असेल तर दुर्गंधी सुटेपर्यंत आपल्या कोणाला पुर्व कल्पना सुध्दा येणार नाही. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, प्रशासकीय इमारत आहे आपली महापालिकेची, कुठे आहे सी.सी.टि.व्ही. कॅमेरे. सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना आपल्याकडे नाही. उद्या जर आग लागलेली आहे इमारतीला तर आपण एकझीटसाठी जे जिने केलेले असतात. आहेत का ते ? वापरण्याची स्थितीत आहे का ? बांधकाम करतांना तर बांधले आहेत. आता चला वर. चलावे आणि दाखवावे की, येथुन आपण पळुन जाऊ शकतो इमिजेटली. वापरण्यायोग्य स्थितीत ते नाही. अत्यंत अडचणीचे ते ठिकाण करुन ठेवलेले आहे.

**मा.महापौर :-** सभागृहाच्या दुरुस्तीचा ठराव झालेला आहे आणि पत्र पण दिलेले आहे सभागृह दुरुस्तीचे. सभागृह दुरुस्तीचे तुम्ही लवकरात लवकर करावे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** एक मिनीट, त्याच उत्तर आयुक्त मॅडम देत आहे. एक मिनीट मी परवानगी कोणालाच दिलेली नाही. आयुक्त मॅडम उत्तर देत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** महापौरताई, मला परवानगी पाहिजे. महत्वाचा विषय आहे महापौरताई.

**श्री.प्रशांत नाईक :-** लंचचा टाईम झाला आता २.०० चा.

**श्री.मनोज चौधरी :-** नितीनभाऊ, महत्वाचा विषय आहे, मला परवानगी पाहिजे मॅडम मला. मॅडम महत्वाचा विषय आहे खुप महत्वाचा विषय आहे. खोटेनगर स्टॉप पासुन, मी परवानगी मागत आहे आपल्याला,

**मा.महापौर :-** त्यांनी विचारलेल्या प्रश्नांच उत्तर तर देऊ द्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, महापौरताई.

**श्री.मनोज चौधरी :-** एक दोन मिनीट मला विषय मांडु द्या मी परवानगी मागतो आहे आपल्याला.

**मा.महापौर :-** तुम्हाला परवानगी नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम मला परवानगी द्यावी लागेल, महत्वाचा विषय आहे. लोकांचा जिव जात आहे. अक्षरशा २२-२२ वर्षाचे मुले खोटे नगर स्टॉप पासुन ते आकाशवाणी चौका पर्यंत किती ॲक्सीडंट झाले आहे तुम्ही चेक करा. तेथील लाईट का चालु होत नाही आता पर्यंत, का काम सुरु होत नाही. काय राजकारण आहे याच्यात, मला खुलासा द्यायचा आजच्या आज. बिल्कुल मान्य करणार नाही मी. ज्या आई-वडीलांचा २२ वर्षाचा मुलगा वारतो ना. त्याच्या घरी जाऊन विचारा, त्यांची परिस्थिती काय आहे. परवानगी देत नाही. का परवानगी देत नाही. का परवानगी देत नाही मॅडम.

**मा.महापौर :-** मी परवानगी देते ना, पण आयुक्त मॅडमांना त्यांच उत्तर तर देऊ द्या.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ पुर्ण स्ट्रिट लाईटचे काम झालेले आहे. का चालु होत नाही स्ट्रीट लाईट.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हायवेच्या स्ट्रिट लाईटचे असे करा, १६ तारखेला मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेब येत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ, ते काम ६ महिने, वर्षभरापासुन चालु आहे भाऊ. किती लोकांचा जिव गेला खोटे नगर स्टॉपपासुन आकाशवाणी पर्यंत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शिंदे साहेबांच्या हस्ते त्याच्या उदघाटनाचा नियोजन मला वाटत सुरु आहे. आणि १६ तारखेला मला वाटते त्याचे उदघाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** सगळयांना परवानगी देत आहे, मला परवानगी का देत नाही. मी सांगितले की, महत्वाचा विषय आहे.

**मा.महापौर :-** मी तुम्हाला परवानगी देते पण त्यांना उत्तर देऊ द्या.

**श्री.मनोज चौधरी :-** अहो, सगळयांचा ऐकुन घेत आहात माझे पण म्हणणे ऐकुन घेतले तर काय फरक पडणार. आणि महत्वाचा विषय आहे ना कुलभुषणभाऊ. लोकांचे जिव गेले आहे ना. कमीतकमी ५० लोकं वारले आहे तेथे मागच्या ६ महिन्यात. काल ३४ वर्षाची महिला वारली, त्यांचा मुलगा फक्त १२ वर्षाचा आहे. का वारला तो तेथे जाऊन बघा.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे. तुम्ही शांतता ठेवा, पहिले ज्या सन्मा.सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर देऊ द्या आणि मग नंतरचा दुसरा प्रश्न विचारा. एक मिनीट फक्त ते ताईंनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्याच उत्तर देऊ द्या. नंतर महापौर तुम्हाला परवानगी देतील.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, शुचिताताई जे बोलले मला त्याच संदर्भात बोलायचे आहे. आता अजेंडयावर वाचले की, शुध्द हवा, सर्वप्रथम महापालिकेमध्ये जे आहे. तेथे शुध्द हवा आणणे गरजेचे आहे. प्रत्येक माळयावर जा. प्रत्येक माळयावर गेल्यानंतर इतकी दुर्गंधी असते. वारंवार मी ज्या ज्या डिपार्टमेंटला गेलेली आहे तेथे प्रत्येक वेळी म्हटलेली आहे.स्वच्छता करायला येत नाही का येत नाही का ? हो येतात पण इतकी दुर्गंधी असते. त्याच्याकडे पण लक्ष दिले पाहिजे. आपण इतरांचे बघु पण आपल्या घरातच अंधार असेल मला असे वाटते. आपण दुसरीकडे करायला जाणार आहे. पण महापालिकेमध्ये जे कर्मचारी असतात. त्यांचे आरोग्य पण चांगले राहणे हे गरजेचे आहे. त्यामुळे जो काही प्रॉब्लेम असेल, काही तरी ड्रेनेजचा प्रॉब्लम सांगतात ते. ती लवकरात लवकर दुरूस्ती करुन द्यावी. एवढेच सांगायचे आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ, विरोधीपक्ष नेते नसल्यामुळे चालु आहे किती खंत सभा,

**सरिता नेरकर :-** महापौर मॅडम, महापौर मॅडम,

**मा.महापौर :-** जितेंद्रभाऊ विषयाशी संबंधीत बोला. बोला ताई.

**सरिता नेरकर :-** आता तुम्ही सांगितले की, परवानगी देत नाही. पण जे विनापरवानगीने उभे राहुन जातात. तेव्हा तुम्ही म्हणत नाही की, परवानगी नाही तुम्ही खाली बसा.

**मा.महापौर :-** ताई पुढच्या इतिवृत्तात पाहुन घेजा, मी कितीदा बोलेली आहे.

**सरिता नेरकर :-** विनापरवानगीने खुपकाही बोलले जाते मॅडम.

**मा.महापौर :-** परवानगी घेऊन बोला हे माझे वाक्य नेहमीच आहे.

**सरिता नेरकर :-** त्यावेळेस मला हे वाईट वाटले की, सन्मा.सदस्या मी बोलत असतांना त्यावेळेस मला खुप काही बोलण्यात आले त्यावेळेस सुध्दा तुम्ही हे बोलले नाही की, अश्या पध्दतीने भाषा बोलु नका.मला हे वाईट वाटले, घरी जाऊन मला कसे तरी वाटले. तुमचेही काम होते की, अशी भाषा नाही करायला पाहिजे. माझा ही अपमान झाला या सभागृहात. तेव्हा तुम्ही बोलले नाही. आता तुम्ही म्हणत आहे परवानगी नाही खाली बसा. तेव्हा तुमचेही काम होते एक महिला म्हणुन की, अशी भाषा नका बोलु. कोणीही असो. अशी भाषा नका बोलु हे तुमचे काम होते मॅडम. मला ही वाईट वाटले आहे ते.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**सरिता नेरकर :-** आज जसे सांगितले परवानगी देत नाही खाली बसा. त्यावेळेस ही सांगायला पाहिजे होते. अशी भाषा बोलु नका एका महिलेशी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज मी म्हणतो एकमेकांच्या मनातल्या भावनांचा वाटा होऊ द्या. मी म्हणतो सगळयांच्या भावना मोकळया होतील. आणि त्यानंतर सगळे सन्मा.सदस्य आग्रह करतील की, ताई आता अजेंडयाच्या विषयाला सुरूवात करा. आज तुम्ही सुध्दा संपुर्ण मिटींग इनजॉय करा. थोड ही मानसिक ताण घेऊ नका आणि काहीही चिंता करु नका.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** बरोबर बोलत आहात, पाच वेळा मी हात उंच केला, एक एक व्यक्ती ४-४ ५-५ वेळा बोलत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि ढेकळे साहेबांना आर्ध्या तासाचा वेळ द्या. माझे बोलणे संपल्यावर ढेकळे साहेबांना आर्ध्या तासाचे वेळ द्या. आणि मन मोकळे सगळयांना बोलु द्या.

**मा.उपमहापौर :-** ते कसे आहे, एखाद्या सन्मा.सदस्याने प्रश्न विचारला, त्याला प्रशासनाकडुन समाधानकारक उत्तर नाही मिळाले तर दुसऱ्या सन्मा.सदस्यानी प्रश्न उपस्थित केल्यानंतर भाऊ ती चर्चा चालतच राहणार आहे

ना. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा उत्तर तर देऊ द्या प्रशासनाला, मग दुसऱ्या सदस्यानी प्रश्न विचारला पाहिजे ना.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया, उपमहापौर महोदय मी एक विषय असा बोलतो की, तो संपुर्ण शहराचा आणि जिल्ह्याचा लक्ष लागलेला आहे असा तो विषय आहे. ईच्छादेवी चौक ते डी-मार्ट रस्ता. तो खरोखरच त्या ठिकाणी अतिक्रमण आहे का ? आता जे चालु आहे पेपरबाजी त्याला थांबवा, तेथे अतिक्रमण आहे. मला याचा खुलासा जर केला तर बरं होईल. इतका त्रासदायक विषय आहे की, तो वर्षानुवर्ष चालत आलेला आहे की, त्या ठिकाणी चालता येत नाही. आता सर्व शहराचे रस्ते सुरळीत चालु आहे. आणि त्या ठिकाणी काम होत आहे असे बातम्या मी ऐकतो.पण हा रस्ता थांबला आहे त्याचा कारण खरोखर अतिक्रमण आहे का ? जर असेल तर आता पर्यंत का काढल नाही. हा माझा प्रश्न आहे.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सभागृह शुचितातांईनी जो प्रश्न मांडला, अतिक्रमण विभाग जेव्हा कार्यवाही करतो आणि ज्या ज्या वस्तु उचलुन आणतो आपली खालची जी पार्कींग आहे तेथे जमा होतो. मग आपण ते लिलाव करुन स्वच्छ करुन घेतले होते. ७ वा मजला आपला पुर्ण भरलेला आहे अतिक्रमणच्या साहित्याने आणि त्या अनुषंगाने आम्ही जागा बघत होतो की, कुठे ठेवता येते ते, मग आम्ही गिरणा टाकीच्या तिकडे पण जागा बघितली, पण तेथे अंडरग्राऊंड पाईपलाईन आहे तर ते तेथे करणे शक्य नाही. त्या अनुषंगाने इथल्याइथेच कार्यवाही होते. सर्व कमर्शियल एरिया आपल्या बिल्डींगच्या बाजुलाच आहे म्हणुन साहित्य येथेच ठेवावे. त्या उद्देशाने बिल्डींगच्या मागच्या बाजुला एक शेड करावे असे मी सजेस्ट केले होते. जर आपल्याला त्या शेडला ऑब्जेक्शन आहे तर इतर ठिकाणी जागा बदलुन आपण निर्णय घेऊ. दुसरे आपले जे म्हणणे आहे पुर्ण इमारतीचे, तर आपल्या इमारतीचे ऑडीट करुन आपल्या सभागृहाचे देखील ऑडीट करुन आपला ठराव ही झालेला आहे रिपेअर करण्याचा. परंतु मी मे मध्ये चार्ज घेतला आणि नोव्हेंबर पर्यंत होते. त्यावेळेस आपला टॅक्स जास्त जमा होत नव्हता. आणि त्यानंतर काय झाले त्यामुळे एक आपला जे काही एक्सपेंडीचर आहे जो १५ व्या वित्त आयोगातुन खर्च व्हायचा तो आज आपला जे.एम.सी.फंडातुन खर्च होत आहे. म्हणुन ते जे.एम.सी.फंडावर ताण येतो. म्हणुन आपण काय केले होते. जसे जसे प्राधान्याने नगरिकांच्या तक्रारी आल्या तुमच्या मागण्या आल्या जे.एम.सी.फंडातुन ते काम करावी. तो निर्णय झाला. असे माझ्या डोक्यात प्लॅनींग होते. प्रशासनाकडुन मी तुम्हाला सांगुन ठेवते की, इस्टीमेट करणे, आर्किटेक्ट कडुन डिझाईन करुन घेणे, हे कामे नक्की होतील हे मी आपणास आश्वासीत करते, आपली बिल्डींग आपण अपडेट करुन घेऊ यात.

**मा.महापौर :-** मनोजभाऊंच्या प्रश्नाचे उत्तर द्या.

**मा.आयुक्त :-** प्रश्नच नाही कळाला मला.

**श्री.मनोज चौधरी :-** खोटेनगर स्टॉप पासुन आकाशवाणी चौकापर्यंत जे लाईटची लाईन गेलेली आहे त्याचे काम सुरु का होत नाही. ते गेल्या ६ महिन्या पासुन ते काम सुरु होत नाही. तेथे कमीतकमी ५० लोकांचा जिव गेलेला आहे. ते करा तुम्ही.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** राष्ट्रीय महामार्गावरती खोटेनगर पासुन ते कालंका माता मंदिरापर्यंत साधारणता पऊणे आठ कि.मी.पर्यंत आपला स्ट्रीट लाईटचा प्रस्ताव आहे. आपण त्याला मुदत दिलेली आहे. ती मुदत ३१ मार्च २०२३ पर्यंत आहे. मक्तेदारामार्फत ७०% काम कंम्पलीट झालेल आहे. आपण खोटेनगर पासुन ते आकाशवाणी पर्यंतचा विषय जर म्हटलात तर त्या ओवर ब्रिजवर आपल्या ब्रॅकेट वगैरे केबल वगैरेच काम झालेल आहे. त्याच्यावरती पोल उभारणीच काम अजुन पेन्डींग आहे. मक्तेदारानी त्या कामाला सुरुवात केलेली आहे. आजच्या तारखेला आपल्या आकाशवाणी चौकापासुन ते कालंकामाता मंदिरापर्यंत सर्व लाईटांची ट्रायल पण आपली घेण्यात आलेली आहे. ज्या वेळेला आपल्याकडे नियंत्रण येईल तेव्हा आपण ते चालु करु शकतो.

**श्री.मनोज चौधरी :-** ते का चालु करत नाही साहेब ते. त्याची काय अडचण आहे.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** त्याच्यामध्ये अडचण अशी होती. आपल्या जे काही पुर्ण स्ट्रीट लाईटचे केबलींग वगैरे झाले होते. आकाशवाणी चौकापासुन ते कालंका पर्यंतचे. तर त्याच्या मध्ये महावितरण कंपनीकडुन विज पुरवठयाचा विषय होता. तो मागच्या आठवडयात आपण ते १००% मार्गी लावुन आपण त्याचा सप्लाय घेऊन ट्रायल पण झालेली आहे. आता फक्त आपल्याला आकाशवाणी चौकापासुन ते कालंकामाता पर्यंतचे लाईट आपण चालु करु शकतो.

**श्री.मनोज चौधरी :-** मग सुरु करा ना.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, या साहेबांना मी चार दिवसापुर्वी ही फोन लावला होता. त्यांनी सांगितले की,तो बरोबर काम करत नाही. साहेब बरोबर आहे तुम्ही असे सांगितले ना मला. सांगा सांगा.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** त्यांना आपण मुदत दिली होती. तरी आता त्यांनी काम सुरु केलेल आहे. आपण त्यांना सांगितले होते की, ३१ मार्च २०२३ पर्यंत तुम्हाला मुदत आहे. त्या कामाच्या मुदतीच्या आत तुम्हाला काम पुर्ण करणे गरजेचे आहे. त्यानंतर त्यांनी काम चालु केलेल आहे. आणि ३१ मार्च २०२३ च्या पुर्वी खोटेनगर पासुन ते आकाशवाणी पर्यंत जे टप्प्या टप्प्याने काम पेन्डींग आहे. आज आपण आकाशवाणी चौकापासुन ते शिव कॉलनीपर्यंत

**श्री.मनोज चौधरी :-** शिव कॉलनी पासुन.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** मागचा ओवर ब्रिज बाकी आहे. शिव कॉलनी पर्यंत पोल झालेले आहे आपले. फक्त ओवर ब्रिजवरचे पोल बाकी आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** टोटल काम कितीचे होते ते.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** टोटल काम पऊने तीन कोटीचे होते ते.

**श्री.मनोज चौधरी :-** किती टक्के काम झाले त्याचे.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** त्याचे ५० ते ६० टक्के काम कमप्लीट झाले आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** किती बिल दिले आहे आपण त्याला.

**एस.एस.पाटील,विद्युत विभाग प्रमुख :-** आपण त्याचे फक्त १ कोटी २६ लाखाच रनींग बिल तयार केलेले आहे पहिले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तो काम करत आहे का ते सांगा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, काम सुरु आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** यांचे उत्तर आहे ८ दिवसापुर्वी, त्याला पैसे दिल्यावर काम पुर्ण करेल.

**मा.महापौर :-** करायची का आता विषयांना सुरुवात.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे प्रश्नाचे उत्तर बाकी आहे.

**मा.महापौर :-** हो तुमच्या प्रश्नाचे उत्तर बाकी आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** ईच्छादेवी चौक ते डी-मार्ट तेथे अतिक्रमण आहे का ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** आयुक्त महोदया, आपण व्हिजीट केलेली आहे ना तेथे.

**मा.आयुक्त :-** त्या दिवशी सी.एम. साहेबांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने मी काही गेली नव्हती आणि तेथे आंदोलन होते. मी त्या आंदोलनात काही गेले नाही पण नंतर आमची बैठक झाली. नंतर मी तेथे गेले नव्हते. मग टी.पी.सेक्शनला बोलवुन सांगितले होते की, ॲक्च्युअल आपण मोजमाप घ्या. डी.पी. पहा. त्यानंतर मला रिपोर्ट करा. आता या अनुषंगाने मोजमापाला सोमवारी गेले होते.

**श्री.के.पी. बागुल, सहा.संचालक,नगररचना विभाग :-** तो जो रस्ता आहे त्याची रूंदी कमी आहे त्यामुळे आपण त्यानंतर आपण हे करून घेवु आणि मग आपण करणार आहे ते आणि तो जो पुर्ण भाग आहे तिथला डिमार्ट जवळचा तर त्यामुळे तिथ असे अतिक्रमण सुध्दा आहे जास्त प्रमाणात आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** डी-मार्टचे जे कंपाऊंड आहे. ते अधिकृत आहे की बेकायदेशीर आहे अतिक्रमण आहे.

**श्री.के.पी. बागुल, सहा.संचालक,नगररचना विभाग :-** त्याची मोजणी चालु आहे. मोजणी झाल्यानंतर मी सांगतो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मी प्रत्यक्ष आपल्या टी.पी.च्या लोकांसोबत ज्या वेळेला सुरुवात झाली मी होतो. त्यांना मीच प्रश्न विचारले की, हा रस्ता ईच्छादेवी पासुन मोठा आहे आणि पुढे जाऊन तो नॅरो झाला आहे. त्याच कारण काय ? किंवा तो रस्ता आहे तो असाच आहे. अतिक्रमण वगैरे नाही. त्यांनी असे त्या वेळेला सांगितले. हा जसा पुढे गेला तसा तो नॅरो झाला,असे आपले लोकांचे म्हणणे होते. तर मग किती वर्षापासुन ते होत नाही.आणि आपण त्याचा निर्णय घेत नाही. सांगा त्याला अतिक्रमण नाही. सुरु करा. किंवा मग असेल तर तुम्हाला कोणी थांबविले होते. मला खात्री झाली. आपल्या लोकांनी हे नेमाडे वगैरे सगळे लोकं होते. टी.पी.वाले जे होते त्यांनी ही मला या ठिकाणी सांगितले होते की, पुढचा भाग हा नॅरो होत गेलेला आहे. आणि हा असे प्रमाणेच प्रमाणित आहे. आता सांगा तुम्ही का थांबले ते.

**श्री.के.पी. बागुल, सहा.संचालक,नगररचना विभाग :-** लवकरात लवकर करू आपण

**श्री.सदाशिव ढेकळे :-** कधी करणार ते. किती वर्षापासुन ते पेन्डींग आहे असे नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मॅडम सर्वात आधी हा रस्ता महापालिकेचा की, बी अॅण्ड सी चा. याच्यामध्ये बरेच वर्ष निघुन गेले. आणि जळगांव शहरातला सर्वात खराब रस्ता ईच्छादेवी पासुन ते डी-मार्ट पर्यंत झालेला होता. नागरीक अक्षरशा पायी सुध्दा चालु शकत नव्हते. मा.आमदार साहेबांनी जसे सरकार राज्यात आले. त्या रस्त्यासाठी पाठपुरावा सुरु केला. आणि फक्त निधीच आणले नाही वर्कऑर्डर काम सगळे सुरु झाले. आणि काम सुरु झाल्यानंतर तेथे अतिक्रमण आहे नाही आहे. हे कोणाचे काम आहे आमदार साहेबांचे आहे का ? त्यांनी खात्री करायला पाहिजे का रोड कुठे कमी भरतो कुठे जास्त भरतो. आणि त्यांना टार्गेट केले जाते. आपण पेपरला वाचले असेल सर्वांनी. म्हणजे श्रेय दुसरे घेतात आणि त्रुटी वगैरे निघाली तर आमदारांना टार्गेट करण्याचे काम केले जाते. महापालिकेचे काम आहे त्यांनी मोजमाप केले पाहिजे. काम सुरु व्हायच्या आधी का नाही झाले हे. प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते आणि मग आपण जागे होतो.त्यातले लवकरात लवकर काय असेल मोजमाप झाले पाहिजे. आणि ते प्रश्न मार्गी लागले पाहिजे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** किती दिवसात होईल बघा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** किती दिवसात होईल बघा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आणि परत हातगाडयांचे अतिक्रमण आहे. त्याच्यावर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे. रस्ता कमी असेल आणि त्यात जर अतिक्रमण होत असेल. चौकाचा एरिया आहे रहदारीचा एरिया आहे. तेथील अतिक्रमण सुध्दा हटविले गेले पाहिजे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** किती दिवसात याचे मोजमाप होईल.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाला उत्तर देऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला याच्या संदर्भातली माहिती याच्यासाठी आहे की, ज्या वेळेला मी महापौर असतांना त्या चौकातील ओपन स्पेस आपण विकसीत करण्याच्या जैन उद्योग समुहाच्या माध्यमातुन निर्णय घतलेला होता. आणि जैन उद्योग समुहाच्या माध्यमातुन तेथील ओपनस्पेस आपण विकसीत सुध्दा केलेली आहे. जी आज खराब अवस्थेत आहे. जेथे आज फर्निचरवाले बसतात. त्या वेळेला याची मोजणी केली होती. प्राथमिक दृष्टया मला ही असे वाटत होते की, डी-मार्टची कंपाऊंड वॉल जी आहे ती रस्त्यामध्ये आहे का ? आणि त्या वेळेला पुर्ण टाऊन प्लॉनींग डिपार्टमेंटच्या माध्यमातुन त्यांची पुर्ण प्रॉपर्टी मोजुन आपण ती खात्री केली की, त्यांची मिळकत त्यांच्या जागेमध्ये आहे. तो रस्ता अॅडजेस्टींग आहे. पुढे ईच्छादेवीपासुन तो रस्ता २१ मिटर भरतो. डी.पी.मध्ये तो २४ मिटर दर्शविलेला आहे. बाबासाहेबांचा जो पुतळा आहे त्या पुतळयापासुन तो पुढे १८ मिटर आहे. पुन्हा चौकामध्ये तो २४ मिटर आहे. वेगवेगळया ठिकाणी त्याची रुंदी जी आहे ती कमी जास्ती आहे. परंतु ह्या डी-मार्टच्या येथे मी स्वत: खात्री केलेली आहे. पुन्हा जर नगररचना विभागाने डी-मार्टची प्रॉपर्टी मोजली तर त्यांची प्रॉपर्टी त्यांच्या जागेत योग्य असेल तर नॅचरली तो रस्ता दोषपुर्ण आहे. तो अॅडजेस्टींग रस्ता ज्या मापामध्ये आहे त्या मापामध्ये बनतो आहे. म्हणुन तेथे डी-मार्टच्या भिंतीचे प्राथमिक दृष्टया अतिक्रमण नाही. याची मला आज तरी खात्री आहे अजुन ते काम थांबविण्यामध्ये कुठलाच अर्थ नाही. काम ते सुरु राहिले पाहिजे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सगळे नागरीकांपर्यंत याचा खुलासा झाला पाहिजे, वर्तमान पत्रात आपण ते दिले पाहिजे.

**सौ.पार्वताबाई भिल :-** महापौरताई, उपमहापौर, मा.आयुक्त मॅडम पुन्हा खुर्चीवर बसले म्हणुन त्यांचे अभिनंदन करते. पण मॅडमांनी मला वादा केलेला आहे हरिविठ्ठल मध्ये व्हिजीट द्यासाठी. तर मॅडम मला सांगा कोणत्या तारखेला व्हिजीट देणार आहे. वाघ नगर पासुन ते पुलापर्यंत रोड इतका खराब झालेला आहे. वारंवार मी तक्रार करत आहे. त्या रोडची कशी अवस्था आहे काय आहे. ती मला माहित आहे. आता पण नागरीकांचे फोन येत आहे. कमीतकमी ५०० ते ६०० नागरीक येथे यायला म्हणत आहे. तर मला सांगा त्या रस्त्याचे डांबरीकरणचे काय होणार आहे आणि कधी होणार आहे. साहेबांनी तर ते पाहिले आहे द्या उत्तर द्या मला.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** ताईंचा जो मुळ प्रश्न आहे, ते जो मेन रस्ता आहे, हरिविठ्ठल स्टॉपपासुन तर रामानंदच्या घाटापर्यंत, तर तो रस्त्यावर काव्यरत्नावली पासुन ते रामानंद घाटापर्यंत त्या रस्त्याचे काम झालेले आहे. कारण त्या रस्त्याची एन.ओ.सी. पाणी पुरवठाने दिलेली नाही. काही पाणी पुरवठयाचे काम बाकी आहे. ते काम जर झाले त्यानंतर आपण जर एन.ओ.सी. दिली ना. तर तो ४२ कोटी मधीलच रस्ता आहे. हा अखंड रस्ता आहे. काव्यरत्नावली चौक ते गिरणा टाकीचा पोर्शन.

**सौ.पार्वताबाई भिल :-** आता काय करायच आम्ही की होणार नाही तो रस्ता मग आम्ही काय करायचे सांगा.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्या रस्त्याबाबत ताईंची मागणी अशी होती की, डिपार्टमेंटने त्या रस्त्याची दुरुस्ती करुन दिली पाहिजे. परंतु त्या रस्त्याची जेव्हा जाऊन पाहणी केली. त्याची इतकी दुरावस्था झाली आहे. जी आपली दुरुस्तीची गाडी आहे. त्या गाडीने दुरुस्तीच्या पलीकडची त्या रस्त्याची अवस्था आहे.

**सौ.पार्वताबाई भिल :-** लोकं शिव्या देतात. नागरीक शिव्या देतात.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्या जागी दुरुस्तीच्या पलीकडची परिस्थिती आहे. तर तो रस्ता दुरुस्त नाही होणार असे मी त्या दिवशी ताईंना सांगितले होते. तो रस्ता वेगळया निधी मध्ये टाकुन तो करता येईल.

**सौ.पार्वताबाई भिल :-** मला तर सांगितले की, होणार आहे तो.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** मी त्या दिवशी तेथील इंजिनिअरला ही सोबत आणले होते. त्याचे इस्टीमेट काढुन घेण्यात आलेल आहे.

**सौ.पार्वताबाई भिल :-** तेथे कमीतकमी एक एक दिड दिड फुट खड्डे आहे कसे चालतील लोकं.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मनपा फंड सगळयांना मिळत नाही. मोजक्याच वार्डात मिळतो.

**मा.महापौर :-** ठिक आहे. तुम्ही लवकरात लवकर त्याचे मार्ग काढा, तो ४२ कोटीमध्ये आहे तो रोड.

**सौ.पार्वताबाई भिल :-** मी एकच प्रतिनिधी सापडली त्यांले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** यांची व्यथा जी आहे ना ती खरी आहे. या ताईंची वैथा जी आहे ना ती खरी आहे. काय आहे बाकीचे नगरसेवक हाय प्रोफाईल आहे ही एकटीच बाई सापडते त्यांना.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला एकच प्रश्नाचे उत्तर हवे आहे की, ईच्छादेवी ते डी-मार्ट हा रस्ता किती मिटरचा होणार आहे. रस्ता एकदम खराब होता, आमदार साहेबांचे अभिनंदन आहे की, त्यांनी १० लाख रुपये दिले आणि तो काम सुरु झालेल आहे. पण आता मुद्दा असा निर्माण झाला तेथे की, वेगवेगळया पक्षाचे वेगवेगळे लोकं येत आहे तेथे. कोणी सांगत की, तेथे अतिक्रमण आहे, कोणी सांगतात की, ते अतिक्रमण काढा.कुणी म्हणतात की, अतिक्रमण काढु नका. वेगवेगळे लोकं तेथे येत आहे. प्रशासनाने एक निर्णय घ्यायचा आहे तेथे. आणि सर्वांना आम्हाला कळवायचे आहे. त्यांच्याशी माझे बोलणे झाले, त्यांचे म्हणणे आहे की, पत्र द्या महापालिकेकडुन की, किती मिटरचा रस्ता आपल्याला पाहिजे आहेत.तुम्ही सांगाल तेवढया मिटरचा रस्ता होईल. कारण आता जो काम चालु आहे त्या ठिकाणी जळगांव शहरात सर्वात एक नंबरच काम तेथे चालु आहे. कारण तुम्ही तेथे जाऊन बघा एक नंबर क्वॉलीटीच काम सुरु आहे. पण लोकं तेथे जाऊन प्रत्येक राजकीय पक्षाचे लोकं तेथे जाऊन पोळया भाजत आहे तेथे. प्रत्येक जाऊन वेगवेगळे लोकांची दिशाभुल करत आहे. कोणी सांगतो किती मिटरचा कोणी सांगतो किती मिटरचा. वेगवेगळे माप येत आहे तेथे. तर तेथे काही तरी निर्णय घ्यायचे आहे. महापौरताई काही तरी निर्णय घ्या आपल्या वार्डातला आहे.

**मा.महापौर :-** तेथे मोजमाप सांगितले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** याच्या वार्डात कामे होतात त्याच्या वार्डात कामे होतात. तुम्हाला एक विनंती आहे. प्रत्येक सभासदाच्या प्रभागात मनपा फंडातुन एक एक कोटी रुपये मंजुर करुन टाका. आमचे सहा महिने इलेक्टशनला बाकी आहे. मॅडम तुम्ही एक लक्षात घ्या. प्रत्येक प्रभागात एक एक कोटीचे कामे द्या.विषय काय होईल तुम्हाला सांगतो मी.तुम्ही आज जरी मंजुर केले तर २ वर्षापर्यंत बिलेच येणार नाही तुमच्या पर्यंत कारण का कारण कामे आता मंजुर होतील.इस्टीमेट मंजुर करता करता टेन्डर निघता निघता सहा महिने होऊन जातील. आमचे वर्कऑर्डर पुढच्या वर्षीच कामे चालु होतील. त्यामुळे निर्णय घ्या. एक एक कोटी प्रत्येक प्रभागाला देऊन टाका मॅडम. महापौरताई, उपमहापौर साहेब, १९ कोटीचे होतील फक्त मनपा फंडातुन देऊन टाका. महापौर ताई, ठराव करा महापौरताई, आमदार देत आहेत आपल्याला, पालकमंत्री देत आहे. तुम्ही पण काही तरी द्या. तुमचे दोघांचे नाव राहील बोर्डावर. असे काम करा. जाता जाता असे काम करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया,

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ, माझे बोलणे होऊ द्या असे नका करा. समाधानकारक याचे उत्तर द्या.

**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ ऐका ना त्या रोडाच पुन्हा मोजमाप करायच आहे आणि त्या ठिकाणी जर अतिक्रमण असेल तर ते काढुन टाका. आपल्याला ते काम थांबवायच नाहीये आणि

**श्री.विष्णु भंगाळे :-** आणि प्रत्येक नगरसेवकाला महापौरांच्या माध्यमातुन मनपा निधीच्या माध्यमातुन एक एक कोटी निधी द्या अस आवाहन केलेल आहे. त्याला आपण उत्तर द्याव अशी आमची ईच्छा आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** मॅडम सांगा तुम्ही, होत असेल तर पाठपुरावा करा. थांबा एक मिनीट राजुभाऊ, महापौर उत्तर देत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरताई माझी एक विनंती आहे की डिमार्ट पासुन ते ईच्छादेवी पर्यंत जे डमी हे आहेत त्यांचे पण अतिक्रमण काढले पाहीजे.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजु भाऊ ते झाले बोलणे ते करणार आहे. उत्तर देऊ द्या. महापौरताई उत्तर देत आहे.महापौरांना उत्तर देऊ द्या. थांबा ना, उत्तर तर घेऊ द्या. द्या महापौरताई उत्तर द्या.

**मा.महापौर :-** प्रशासनाने पुर्ण नियोजन करुन सर्व सन्मा.सदस्यांना एक एक कोटीचा विकासासाठी, प्रभागासाठी प्रभाग निहाय देण्याची कार्यवाही करावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** एका वेळेला एकच जण बोला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई मी आधी आपले अभिनंदन करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता बस झाले ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आज असे ठरले आहे की, अजुन काही नगरसेवकांना जर काही विचारायचे असेल तर आणखी ते विचारता येईल. असेच ठरले आहे आपले. आजची महासभा ४- ५ वाजेपर्यंत जरी चालली तर चालेल असेच ठरले ना आपले. महापौर महोदया, मागे एक जे.सी.बी.च्या बाबतीत एक विषय उचललेला होता की, आपला मनपाचा जे.सी.बी. मागील सहा महिन्यापासुन बंद आहे. आयुक्त महोदया, याच्यावरती मला मागच्या दोन तीन महासभेपासुन आश्वासन दिलेले होते की, एका महिन्याच्या आत ते किंवा दुसऱ्या दिवशी म्हणजे दोन महासभेच्या आधी असे आश्वासन दिलेले होते की, दुसऱ्या दिवशी ते जे.सी.बी. चालु होणार आहे. परंतु त्याच्यातले एकच जे.सी.बी. चालु झाले. दुसरे जे.सी.बी. चालु का नाही झाले. त्याच्यासाठी मोठया प्रमाणात जर निधीची तरतुद केलेली होती. निधी जर वर्ग करण्यात आलेला होता. तर का म्हणुन ते चालु करण्यात आलेल नाही. तसेच काही प्रभागांमध्ये मागील वेळेसारखे विचारण्यात आले.पाईपलाईनचे कामे जे आज अपार्टमेंट आहे. तसेच एक अपार्टमेंट जुने आमच्या घराकडे बंडुदादांच्या घराजवळ आहे. याला सुध्दा आज पर्यंत आपण कनेक्शन दिलेले नाही. मागील काळात आपल्याशी असेल पाणी पुरवठयाशी असेल मी बोललेलो आहे. त्यांना पर्सनली नळ कनेक्शन आजपर्यंत दिलेले नाही. आणि तिसरी गोष्ट अशी महापौर महोदया, आपण जळगांव शहरामध्ये बी.ॲण्ड सी च्या माध्यमातुन जरी रोड करत असले.आणि रोडांचे कामे होत असेल. तर नगरसेवकांना विश्वासात घेतले गेले पाहिजे. कारण तेथील समस्या असतील त्यांचे निवारण करण्याच्या दृष्टीने. ज्या काही असेल कोणाशी आम्ही बोलावे. कारण की, आम्ही त्यावेळेस आपल्या महापालिकेच्या सिटी इंजिनिअरशी बोललो. आणि त्यावेळेस आपल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी बोललो. तर ते डायरेक्टली हात हे बी ॲण्ड सीकडे दाखवितात.मग ते सोनवणे साहेब असतील त्यांच्या हाताखालील दुसरे इंजिनिअर असतील.त्यांच्याशी ज्या वेळेस बोललो आहे. तर आपल्या सभागृहाच्या याच्याने मागील काळामध्ये जे बी ॲण्ड सीच्या माध्यमातुन कामे ही होत असतील. परंतु आपल्या नगरसेवकांच्या कानी ते टाकले गेले पाहिजे. अशी आपल्याला एक सुचना आहे. आणि मला जे.सी.बी.च्या बाबतीतली माहिती आता सभागृहाने द्यावी. आणि त्या अपार्टमेंटला आपण पाणी कधीपर्यंत आता आमच्या वार्डातील काही रोड सुरु झालेले आहे आणि होत आहे. त्याअनुषंगाने तेथेही त्या अपार्टमेंटला नळ कनेक्शन देणे गरजेचे आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** एक विषय आहे की, आता डेव्हलपमेंट एरियामध्ये जसे पिंप्राळा, मेहरुण या परिसरामध्ये शासनाने आपले मा.आमदारांनी १० कोटी रुपयाची तरतुद मंजुर करुन आणली आहे शासनाकडुन असे आपल्याला जर काही काम करायचे आहे तर संबंधीत नगरसेवकांना जसे विष्णुभाऊंनीही येथे सांगितले. संबंधीत नगरसेवकाला त्या ठिकाणी काम सुरु होतांना बोलविले पाहिजे. कारण ते आपल्याकडुन नाही ते बी ॲण्ड सीच्या मार्फत केले जाते. ते आपल्या पध्दतीने काम करतात. आता डि-मार्टच्या याचा विषय होता. त्याला सुध्दा कुठल्याच नगरसेवकाला बोलविले नाही. आणि अश्याच प्रकारे काम सुरु केले. तर असे होता कामा नये.

आणि मी आता माझी या सभागृहामध्ये येण्याची ९ वी टर्म आहे. मी आतापर्यंत अश्या प्रकारची सभा चालविलेली कधीच बघितलेली नाही. आपण कुठल्याही शिस्त नावाची वस्तुच नाही येथे. असे होऊ देऊ नका. पहिला मुद्दा तुम्ही ११.०० वाजेच्या ऐवजी ११.३० वाजता येथे आले. त्यानंतर असेच चालु आहे अजुन सभा सुरु झाली नाही. असे होता कामा नये ही आमची विनंती आहे मॅडम आपल्याला. ही टिका नाही. असे होऊ देऊ नका.

**सरिता नेरकर :-** महापौर महोदया, बहिणाबाई उद्यान जे आहे. जो हायवेकडे रस्ता जातो. तेथे क्रांतीवीर ज्योतीबा फुले यांच्या पुतळयाचे करायचे ठरले होते. आणि वर्कऑर्डर पण निघाली होती. पण त्यानंतर महानगरपालिका झाली आपली, तर तो विषय तेथेच थांबला. आणि त्यानंतर हे बदल झाले, त्याचे काय झाले मी आपल्याला लेटर पण दिलेले होते. मला त्याच्या बद्दल माहिती मिळेल तर बरे होईल. कारण आता बऱ्याच महापुरुषांच्या पुतळयांना परवानगी मिळालेली आहे. तेथे का थांबले. त्याची वर्कऑर्डर निघुन झाले होते. पेपर न्युज झाली होती सगळे झाले होते. जो हायवेला जातो तेथे जागा आहे एक अशी. बहिणाबाई ते रिंगरोड तिकडे जातांना. मी लेटर तुम्हाला पण दिलेले आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** सर्व कचरा आमच्या प्रभागातुन जातो. कचरा फॅक्टरी आमच्या प्रभागात आहे. त्याचे टेन्डर निघाले, प्रोसिजर झाली. तुम्ही सांगितले प्रमाणे १ कोटीचे ते काम आहे. अजुन ते टेन्डर कोणी भरत नाही. सगळयात मुख्य रस्ता आहे जो कचरा फॅक्टरीत जातो. धुराला तर ते लोकं कंटाळलेच आहे. पण डस्ट पासुन इतका त्रास आहे लहान मुलांना म्हणा किंवा लोकांना म्हणा आता काही काही लोकं नविन असतात. ते काढतात क्लिपा आणि टाकतात गृपवर, नगरसेवक काम करत नाही. नगरसेवक निष्काळजी,नगरसेवकांचे दुर्लक्ष. मॅडम हे सर्व नगरसेवकांना ऐकावे लागते प्रभागातल्या. म्हणुन आपल्याला हात जोडुन विनंती आहे. त्या रस्त्याचे आपण लवकरात लवकर काम करावे. नाही तर आम्ही त्या रस्त्यावर आंदोलन करु सगळे नागरीकांना तेथे बसुन एक ही गाडी जाऊ देणार नाही. जळगांव शहराचा कचरा माझ्या प्रभागातुन येऊ देणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** प्रभाग क्र.१२ अनुराग स्टेट बँक कॉलनी १२ मिटरचा डी.पी. रस्ता. त्याच्यानंतर अनुराग स्टेट बँक कॉलनी शिव रस्त्यापर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण झाले आहे. त्याची देखभाल दुरुस्तीची मुदत किती आहे.तो रस्ता खराब झालेला आहे. काँक्रीटचा रस्ता. त्याची दुरुस्तीची प्रक्रिया काय आहे. आणि त्याचे बिले किती दिलेले आहे. त्यानंतर तो मक्तेदार, संबंधीत इंजिनिअर यांच्यावर काय कार्यवाही आपण करणार.याचे उत्तर आपण द्यायचे आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** उतारचा रस्ता आहे, आणि त्या काँक्रीट रस्त्याला बराच रस्ता खराब झालेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. त्याबाबत त्या संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला आपण नोटीस बजवलेली आहे. या प्रमाणे जसे हायवेवर किंवा पुलावर वेलकोट आकारला जातो. आता आपण शिवाजी नगरचा पुल बघितले असेल त्यावर एक वेलकोट आकारला जातो. त्याप्रमाणे ट्रिटमेंट करावी आणि त्याबाबत एक महिन्याची मुदत देऊन ते काम पुर्ण करुन द्यावे. त्यानुसार त्याला सुचना वजा नोटीस बज ावुन दिलेली आहे. आणि त्यानी जर मुदतीत कार्यवाही नाही केली तर त्याला ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. आणि त्याची जी आपल्याकडे सुरक्षा अनामत आहे १०% ती जमा करण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** किती रक्कम आहे साधारणता १०%

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** १०%

**श्री.नितीन बरडे :-** बघा हे बोगस दिसत आहे तुम्हाला. तसाच एक समता नगर मधल काम आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्यालाही नोटीस दिलेली आहे. नितीन पाटील नावाचा कॉन्ट्रॅक्टर आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम काय झालेले आहे तुम्ही स्वत: बघितले आहे तुम्ही स्वत: जाऊन आलेले आहे. हे साहेब तिथे राहतात.नुसते डांबर मारुन क्रश मारलेला आहे. पडत आहे. हे साहेब स्वत: तेथे राहतात त्या रस्त्यावरुन येतात.यांनी सांगुन द्यावे. त्यानंतर काँक्रीट रस्त्यावर तुम्ही डांबरी करत आहे डांबर मारत आहे. पैसे तुम्ही ठेकेदाराला काँक्रीटचे देत आहे आणि डांबराचे काम कसे करत आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** तो रस्ता त्यानी कॉँक्रीटचा तोडुन त्यासाठी कॉँक्रीटला डांबरी करुन रिपेअर होत नाही.

**श्री.नितीन बरडे:-** पैसे पैसे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** पैसे कॉँक्रीटचेच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** रक्कम मध्ये चार पट फरक आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ काही पोरशन त्यानी केलेले होते पण काही भाग खराब झालेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तेथे गुणवत्तेला तुमचे इंजिनिअर होते ना.गुणवत्तेला तुमचे इंजिनिअर होते ना. तुमच्या इंजिनिअरांवर काय कार्यवाही करणार, त्यांच्या पगारातुन तुम्ही हा पैसा घेणार आहे का ?

**मा.आयुक्त :-** तुम्ही जे तीन रस्ते सांगितले मी स्वत: लक्ष देणार आहे त्याच्यावर.

**श्री.नितीन बरडे :-** २४ तारीख आहे, २३ तारखेला माझ पत्र येईल तुम्हाला फोटोसहीत त्या रस्त्यांच कारण त्या रस्त्यावर जळगांवातले एक नामांकित व्यक्ती आहे, ते इंजिनिअर पण आहे आर्किटेक्ट पण आहे आणि सर्वच आहे, नगरसेवकांच्या नावाने खडे फोडतात, आमदारांचे नावाने खडे फोडतात, शिवराम पाटील याच्यात कोणता नगरसेवक किंवा कोणताच पदाधिकारी तुमच्या बिलांवर सही करतो का ? चेक नगरसेवकांच्या सहीनुसार निघतो का ? मग नगरसेवक पहिलेच पैसे खाऊन जातो का ? अधिकारी खाऊन जातात का पहिलेच पैसे ? काम व्हायच्या पहिले, कडक कार्यवाही व्हायला पाहिजे मॅडम. तुमचे जे अधिकारी संबंधीत होते त्यांच्यावर ही कार्यवाही व्हायला पाहिजे. आणि त्या रस्त्याचे दुरुस्ती देखभालचे पैसे त्यांनी नाही केले तर त्या उरलेल्या पैश्यातुन दुरुस्तीच टेन्डर नविन काढायचे आहे तुम्ही तेवढया पैश्यातुन आणि बाकीचे पैसे हे आणि बाकीचे पैसे हे संबंधीत इंजिनिअरच्या पगारातुन घ्यायचे आहे तुम्ही.

**श्री.अनंत जोशी :-** शिवराम पाटील सारखे जे लोकं आहे, नगरसेवक करा त्यांना.

**श्री.नितीन बरडे :-** हो त्यांचा सत्कार.

**सौ. उज्वला बेंडाळे :-** मी तुम्हाला फोनवर पण टाकले होते आणि तुम्ही मला बोलल्या पण होत्या. तुम्ही ठेकेदारासोबत पण बोललेल्या होत्या. आज बरोबर ५ महिने झाले १५ सप्टेंबर आज आहे १५ फेब्रुवारी ५ महिने झाले अजुन ही काही झालेले नाही. दोन महिने तुमचे गेले हे मान्य आहे पण तरी ती माझ्या समोरची गोष्टी आहे, पण तुम्ही बोलल्या होत्या त्या ठेकेदारांशी ही पण अजुन पर्यंत झालेले नाही ते काम.

**मा. आयुक्त :-** त्यांनी सांगितले ना त्याचे उत्तर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो झालेली होती चर्चा या विषयावर.

(एकाच वेळेला अनेक सन्मा. सदस्य बोलत असतांना कोण काय बोलले ते समजले नाही )

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** जे.सी.बीच्या बाबतीत बोलायचे सांगितले तर वाहन विभागामार्फत कार्यवाही चालु आहे आणि आपण दोन जे.सी.बीच रु.२,३२,०००/-ची निविदा प्रक्रिया राबविलेली होती. निविदा नाशिकच्या एका एजन्सीने भरली होती. ती निविदा भरल्यानंतर वर्कऑर्डर द्यायच्या वेळेला.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मागच्या मिटींगला हा मुद्दा झाला रिपीट, त्याला आता प्रॉब्लेम का आला, तो काम करायला आला तर त्यानी एकच का केले,एक का थांबविले, याचे उत्तर हवे आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** रु.२,३२,०००/- आपण कंपनीच्या नावावर टाकलेले होते, त्यातुन ५०% ती कंपनीला गेली आणि काम सुरु झाल, ती ५०% रक्कम एकच जे.सी.बी.ला लागुन ते एक जे.सी.बी.चालु केले आपण आणि फिल्डवर पाठविले आपण आरोग्य डिपार्टमेंटला पाठविले आपण, तर आरोग्य विभागाला पाठविल्यानंतर त्याची काही पावर कमी पडत आहे तर त्याची १००% दुरुस्ती झालेली नसल्याने त्याला पुढची रक्कम दिली नाही आणि पुढची रक्कम मिळाली नाही म्हणुन त्यानी दुसऱ्या मशिनला हात लावला नाही. पहिला मशिन त्यानी १००% दुरुस्त करुन दिल तो आज आरोग्य विभागात लागलेला आहे. आणि उरलेली रक्कम त्याला देण्यासाठी बोलविले आहे. तो नाशिकहुन त्याची टिम घेऊन येऊन तो दुसरा जे.सी.बी.चालु करुन देणार आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कधी.

**सरिता नेरकर :-** तुम्ही म्हणता ते बरोबर आहे साहेब पण लोकं आमच्या घरी येऊन काही पण बोलुन जातात, आमच्या घराकडे खड्डा झालेला आहे हे झालेले आहे. तुम्ही हे नाही सांगतात की, आमच्याकडे एकच जे.सी.बी. आहे. तुम्ही सांगतात जे.सी.बी.नाही. तेव्हा नागरीकांना नाही कळत ना ते.

**मा.आयुक्त :-** आपल्याकडे दोन जे.सी.बी.आहे. एक खराब झालेले आहे. दोन अजुन घेऊन घेऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** जे आहे ते चालु करा पहिले, नविन घेऊ नका जे आहे ते सुरु करा.

**मा.आयुक्त :-** स्टेटस काय आहे. स्टेटस.

**श्री.मनोज चौधरी :-** दोन वेळा भेटलो, काय झाले, त्याची जबाबदारी घ्या तुम्ही. दोन महिने सहा महिने. जबाबदारी घेतली पाहिजे ना प्रशासनाने.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ४५ लाख रुपये तुम्ही दिले रस्त्यासाठी. आता आमच्याकडे इतकी अशुध्द हवा आहे की, सगळे तेथे चला आणि सगळा कचरा तुमच्या वार्डाकडे घेऊन जा.तेथे अशुध्द हवा नाही का ?

**श्री.मनोज चौधरी :-** तुम्ही कचरा फॅक्टरीचा जो रस्ता आहे ते सुधरु शकत नाही. लोक चालु पण शकत नाही त्याच्यावर.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** सगळा निधी येतो आहे पण आपण वेगळया प्रकारे खर्च करतो आहे. आता सांगा कोणता कोणता निधी येत आहे. पण आपला एक जे.सी.बी. सुधरत नाही. गावातले सगळे रस्ते करत आहे. आमचे रस्ते का करत नाही. ज्या ज्या भागात सांगतात त्या त्या भागात काम करतात. आमच्या भागात का करत नाही.एक वर्षापासुन तेच काम सांगतो आहे आम्ही. ४२ कोटीत माझ्या प्रभागात.

**श्री.मनोज चौधरी :-** रस्ते कमी केले, गटारी कमी केल्या. तर ते एक रस्ता तर टाकुन दिले पाहिजे होते.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, तिकडुन कैलास आप्पा हात वर करत आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौर महोदया, ४२ कोटी मध्ये जेव्हा सिमा मामी महापौर होत्या. त्यावेळेस माझ्या प्रभागात ३ कोटी ५८ लाख रुपये मिळाले होते. आणि ज्या वेळेला सत्ता बदलली तुमची आमची पण, तेव्हा मी डायरेक्ट १ कोटी ५८ लाखावर येऊन गेलो. तर आमचे २ कोटी गेले कुठे. आणि हे जात असतांना आमचे मुख्य रस्ते का करत नाही तुम्ही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एस.आय.पी.आहे एस.आय.पी. याची चौकशी करावी लागेल ना.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** भाऊ कागदावर आहे ना हे सगळे कागदावर आहे या सगळया गोष्टी. का करत नाही चौकशी. सगळया निधीतुन निधी घेऊन त्या रस्त्यात टाका. नाही तर सगळे डंम्पर तुमच्या घराकडे घेऊन जा प्रशासनाने.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, मिटींग दोन तीन घंटयासाठी तहकुब करा नाही तर अजेंडयावरचे विषय घ्या.

**मा.महापौर :-** अजेंडयावरचे विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आप्पा गावातले सगळे रस्ते झाले आमचे रस्ते बाकी आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** जळगांव शहराचा संपुर्ण कचरा तेथुन जात आहे.तुम्ही सांगा, तुम्ही सांगा ना त्यांना की, ते रस्ता करा.

(एकाच वेळेला अनेक सन्मा. सदस्य बोलत असतांना कोण काय बोलले ते समजले नाही )

**श्री.विष्णु भंगाळे :-** आप्पा, ४.०० वाजेनंतर अजेंड्यावरचे विषय सुरु होणार आहे. तुम्ही घरी जाऊन या. हळदला जाऊन या.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४४ अन्वये प्रश्न उत्तरे. प्रश्न क्र.१ सन्मा.सदस्य श्री.दिलीप बबनराव पोकळे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई मी जे प्रश्न केलेले होत त्याच उत्तर मला पुर्ण मिळालेल नाही. मी विचारलेले होते की १६/०६ पर्यंत याच्यात किती बिल्डींगांना परमिशन दिल्या पुर्ण किती झाल्या दाखला कितींना दिला आणि याची प्रोसेस काय आहे.तर याच्यामध्ये म्हंटलेले आहे मला पुर्ण माहिती अपेक्षित आहे पुढच्या सभेला.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री. दिलीपभाऊ पोकळे यांना पुर्ण माहिती देण्यात यावी.

**नगरसचिव :-** प्रश्न क्र.२ सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे

**श्री.कैलास सोनवणे :-** घेतली माहिती घेतली.

**नगरसचिव :-** प्रश्न क्र.३ सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील

**श्री.राजेंद्र पाटील :-** तीन चार महासभेपासुन मी या डी-मार्ट पासुन ते आदित्यचौकाच्या रस्त्याच्या संदर्भात मांडत आलेलो आहे.आणि सहा महिन्यापुर्वी मी अर्ज दिलेले होते. महापालिकेच्या अधिनियम कलम ४४ च्या अंतर्गत प्रश्न विचारलेला होता. तर सहा महिन्यानंतर तो विषय पटलावर आलेला आहे. मी धन्यवाद देतो की, आपण तो विषय पटलावर घेतला,आता हा जो रोड आहे. मला चार महासभेपासुन सांगितले जात आहे. जो शासकीय निधी येणार आहे त्याच्या सोबत हा रस्ता महापालिकेच्या फंडातुन याच काम केल जाणार आहे. तर त्याच्या बाबतीत अजुन ही मला खुलासा मिळणार नाही की, कुठल्या निधीतुन करणार आहे. कुठल्या स्टेजला हा निधी आहे. त्याची कमीतकमी मला तुम्ही माहिती द्या की, हा जो रस्ता दिलेला आहे महापालिका फंडातुन त्याच्या सोबत जोडलेला आहे. तर ते कुठल्या स्टेजला आहे. स्टेटस काय आहे त्याचे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** या रस्त्याची सद्यास्थिती, हा जो निधीतुन रस्ता होणार आहे. त्याची जेवढी रक्कम मंजुर होती. तेवढया रकमेचा रस्ता तेथे पुर्ण करण्यात आलेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझा प्रश्न ते झालेल्याच्या बाबतीत नाहीच आता. जो उरलेला पुढचा आहे त्या बाबतीत आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** या रस्त्याचा जो उर्वरीत पोरशन होता. त्याचे १००% मनपा निधीतुन काम करण्याचे अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीच्या स्टेजला आहे आणि तुम्हाला जे सांगण्यात आले. सगळया सभागृहाला सांगुन देतो की, शासन निधीतुन याच टेन्डर काढण्यात याव. लवकरच आता जी काही शासन निधीतुन टेन्डर प्रक्रिया होईल त्यात टेन्डर काढुन महासभेची मान्यता घेणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला पुर्वीच्या दोन चार महासभेत सांगितले गेले की, महिन्याभर मध्ये कामाला सुरुवात होईल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तुमचा असा आक्रोश होता की, एखाद्या शासन निधी सोबत जर ते काढले गेले तर त्याला कॉन्ट्रॅक्टर मिळेल. मनपा निधीतुन काढण्याचा जर प्रश्न असेल, जसे यांच्या रस्त्याला कॉन्ट्रॅक्टर मिळत नाही. कारण १००% पैसा मनपा निधीतुन आहे. जर तुमची ईच्छा असेल आणि सभागृहाने मान्यता दिली तर ते काम आपण मनपा फंडातुन टाकुन देऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मग शासकीय निधीत का नाही टाकला, त्याची अवस्था पाहिली का तुम्ही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-**शासकीय निधीत टाकणेचे काम आमचे नाही. शासकीय निधी कामाच्या नावासह येतो. त्याच्या सोबत करता येईल ते पण महासभेच्या मंजुरीने. जर शासनाचे १ कोटी २ कोटी ५ कोटी निधी असेल आणि त्याच्यात जर टाकायचे असेल तर त्याला महासभेची मंजुरी लागेल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याचे स्टेटस काय आज परिस्थिती काय आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याच्या अंदाजपत्रकाला मंजुरी झालेली आहे. कमिशनर साहेबांची मान्यता मिळालेली आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मंजुर झालेले आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** पुर्ण ओके झालेले आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बरं, तो रस्ता झाला. त्या रस्त्याची मला वाटते आपण, जे ही रस्ते आपण नविन निर्माण केले, त्याच्यासाठी एक समिती आपण गठीत केली होती गुणवत्तेबाबत तर याचीही गुणवत्ता तपासणी केली होती.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** गुणवत्ता तपासणीसाठी आपण दोन अधिकारी नियुक्त केलेले होते, एक रविंद्र जावळे आणि एक व्ही.ओ.सोनवणी आहे. व्ही.ओ.सोनवणी रिटायर झालेत, रविंद्र जावळे आहेत ड्युटीवर आहे. परंतु या रस्त्यांची गुणवत्ता त्यावेळेला त्यांच्याकडुन तपासुन घेतलेली आहे. शासकीय निधी असो किंवा मनपा निधी असो, त्या कामांची आपण गुणवत्ता तपासणी करतो त्यानंतरच आपण बिल अदायगी करतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याचे ईस्टीमेट किती कोटीचे आहे साहेब.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आता नाही सांगता येईल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** केले आहे का ?

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हो केलेले आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्या रस्त्याला ३ महिन्यामध्ये खड्डे पडलेले आहे साहेब ३ महिन्यात. तयार झाल्यानंतर ३ महिन्यात खड्डे पडलेले आहे. आज अशी अवस्था आहे तुम्ही स्वीमिंग टँकच्या समोर बघा. महापौर महोदया, मला वाटते त्या रोडने वापरतात.

**मा.महापौर :-** मी स्वत: त्यांना कंमप्लेन्ट केलेली आहे की, विद्या इंग्लिश मेडीअमच्या समोर खड्डे पडलेले आहे. मी स्वत: सांगितले आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आणि माझ्याकडे त्या पुर्ण रस्त्याची व्हिडीओ रिकॉर्डींग पण आहे. तयार करतांनाची. बनवितांना त्याची अवस्था आणि बनविल्यानंतर ३ ते ४ महिन्यात त्याला मोठमोठे खड्डे पडलेले आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** तसे जर असेल तर उद्याच मी त्या रस्त्याची पाहणी करतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नाही, मला सांगा शाखा अभियंता काय करतात.

**श्री.विष्णु भंगाळे :-** शाखा सांभाळतात.

**श्री.नितीन बरडे :-** काम करतांना इंजिनिअर तेथे पाहिजेत. आम्हाला समजते का? ;आम्ही इंजिनिअरींग शिकलेले आहे का ? आम्ही त्याच्यातले शिकलेले आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनगीरे साहेब, परिस्थिती वास्तविक तशीच आहे. सिंधी कॉलनीच्या रस्त्यावर बाबा रामदेवच मंदिर आहे. तेथे चारी पडली आहे. तेथे खड्डा आहे. सिंधी कॉलनीच्या बिल्कुल नविन बांधकाम सुरु आहे. त्याच्या फ्रंटला मोठमोठे खड्डे पडलेले आहे. अश्या पध्दतीने जर ४-४ ६-६ महिन्यामध्ये कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह निर्माण होत असतील. हा जो कोट्यावधी रुपयांचे खर्च जे आपण रस्त्यांवरती करतो. ती डिफेक्ट लायबिलिटी असेल ते भाग वेगळा आहे. परंतु त्याची परिस्थिती तुम्ही बघाल ना. कमीतकमी चार महिने झालेले आहे त्या रस्त्याला. परंतु चार महिन्यामध्येच त्या रस्त्याची अवस्था तशी आहे. म्हणजे काम होतांना आपण गुणवत्तेवर लक्ष देण्यामध्ये कुठे तरी कमी पडतो का ? डिफेक्ट लायबिलिटी केव्हा, डिफेक्ट निघाल्यानंतर लायबिलिटी येईल. परंतु काम सुरु असतांना गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. आणि मग गुणवत्तापुर्वक कामे होत नसतील. तर त्याच वेळेला त्याच्यावर ॲक्शन घ्यायला पाहिजे. म्हणजे लोक, नागरीक ज्या शिव्या घालतात ते लोकप्रतिनिधींना शिव्या घालतात.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विशेष म्हणजे गुणवत्तेसाठी समिती गठीत केली. अभियंत्यांची नेमणुक केली. म्हणजे हे काय आपली दिशाभुल करण्याचे काम चालु आहे का ? नागरीकांची दिशाभुल करण्याचे काम चालु आहे का ? आपण पेपरमध्ये मोठमोठया बातम्या वाचल्या की, गुणवत्तेसाठी अशी अशी समिती गठीत केलेली आहे. आणि त्यांच्या देखरेख खाली काम चालु आहे. मग यांनी काय केले, ३ महिन्यात जर रस्त्यात खड्डे पडले.या समितीने काय कामकाज केले.

**मा.महापौर :-** सिंधी कॉलनीचा रस्ता, पांडे चौकाचा रस्ता आणि विद्या इंग्लिश मेडीअमचा रस्ता हे तिन्ही रस्त्यांची आपण परत पाहणी करा आणि त्याचा अहवाल सादर करा. आणि योग्य कार्यवाही करा त्याच्यावर.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ज्यांनी काम केलेले आहे त्यांच्यावर कार्यवाही होईल का ?

**मा.महापौर :-** तेच सांगितले ना त्यांना, बिल्कुल बिल्कुल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तसेच महानगर विकास प्राधिकरणाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंजुर विकास योजना प्रादेशित योजनेतील रस्त्यांची आखणी प्रत्यक्ष जागेवर करणे बंधनकारक आहे. याबाबतची कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात यावी. संबंधीत रस्त्याचे पदाधिकारी, प्रभाग अधिकारी असे सर्व रस्त्यांच्या जागेवर अतिक्रमणे, अनधिकृत विकास होणार नाही या बाबतची दक्षता घ्यावी. याला अनुषंगुन दि.२३/०८/२०१८ ला मी पत्र दिलेले होते की, या शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.परंतु २०१८ ला दिलेले माझे पत्र आज २०२३ आले आहे. जवळपास ५ वर्षाचा कालावधी व्हायला आला आहे. परंतु डी.पी.रस्त्यांचे कुठलेही आराखडे झालेले नाही. कारण हे डी.पी.रस्ते हे अत्यंत महत्वाचे आहे. डी.पी.वरती त्या रस्त्याची रुंदी १८ मिटर असते. २४ मिटर रस्ते, १२ मिटर रस्ते परंतु बऱ्याचश्या रस्त्यांची आजही परिस्थिती अशी आहे की, १८ मिटरचा रस्ता कुठे कुठे १२ मिटरही पुर्ण मिळत नाही.मग याच्याने काय होते, संपुर्ण शहराच्या वाहतुक व्यवस्थेचे नियोजन भविष्यातले खोल पडतात.म्हणजे ज्या वेळेला डेव्हल्पमेंट प्लॅन झाला. त्याच वेळेला डी.पीच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व रस्त्यांची मोजणी होऊन डिमार्केटेड होऊन त्याचे रेकॉर्ड आपल्याकडे जतन व्हायला पाहिजे. आणि मग त्या अनुषंगाने त्या ले-आऊटला ज्या वेळेला मंजुरीसाठी येईल. त्याच वेळेला या जोडणीला मॅच करुन ते ले-आऊट मंजुर व्हायला पाहिजे. परंतु प्रत्यक्षात १८ मिटर दिसतो. परंतु जागेवरती गेल्यानंतर कुठे १२ मिटर असेल कुठे १४ मिटर असेल, कुठे अतिक्रमण झालेले असतील. कुठे रस्ते संक्षिप्त झ ालेले असतील. तर याच्या संदर्भात प्रशासन काय उपाययोजना आखेल. या संदर्भातली माहिती द्यावी.

**श्री.के.पी.बागुल, सहा.नगररचनाकार, नगररचना विभाग :-** मा.महापौर, मा.सभागृह लढ्ढा साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. तो स्वभाविक आहे. ॲक्चुअल जेव्हा डी.पी.मंजुर होतो. त्याच वेळेला सर्व जे डी.पी.चे रस्ते आहे. त्यावेळेला त्याचे रस्ते आपल्याला करता येईल आणि त्याचे डिमार्केशन ही होणे महत्वाचे आहे. टाऊन प्लॅनींग विभागाकडे कामाच्या बाबतीत खुप कमी मॅनपावर आहे. कर्मचारी संख्या खुप कमी आहे. त्यामुळे सेक्टरवर जे आहेत त्यामुळे आता जे आहेत त्यांच्याकडुन काम करू न घेतो आहे. माझ्या सर्व प्रभागातले जे इंजिनिअर्स आहे त्यांना त्यांचे प्रभागातले रस्ते डिमार्केशन करायला सांगतो आणि आपण करु ते काम, अलाईंमेट फिक्स करुन डिमार्केशन करुन करायला लावु ते काम.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते, जे करवंदे साहेब आहेत ना त्यांनी याबाबतचे पिंपरी चिंचवड मध्ये चागल्या पध्दतीचे काम केलेले आहे. तर करवंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली मला वाटते एक पथक तयार करुन अश्या पध्दतीने संपुर्ण जळगांव शहरातील जे मोठे रस्ते आहे, १२ मिटर, १८ मिटर, २४ मिटर याचे प्रथमिकतेने सगळयांचे डिमार्केशन करुन रेकॉर्ड व्यवस्थीत रित्या जतन केले तर जेणे करुन त्या डी.पी.रस्त्यांवरती वेगवेगळया पध्दतीचा अतिक्रमण झालेल असेल. काही कच्चे इंक्रोचमेंट असतील काही पक्के इंक्रोचमेंट असतील. ते रस्ते तातडीने मोकळे करुन घेण्यात यावे. जेणे करुन भविष्यात या रस्त्याच्या वाहतुकीच्या संदर्भातले सुनियोजित विकास कामे करण्याच्या संदर्भात अडचणी राहणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, त्याच्यावर काय निर्णय घेतलेले आहे, आता मॅडमांनी आणि त्यांनी पाहणी केली तेव्हा.

**मा.महापौर :-** सन्मा.नितीन भाऊंनी जे सांगितले की, करवंदे साहेबांच्या अधिपत्याखाली एक समिती गठीत करुन सगळया शहरातील डी.पी.रोडांचे विषय मार्गी लावु.

**मा.उपमहापौर :-** आणि याच्या फक्त एक अशी सुचना मांडायची आहे मला, ज्या शेतकऱ्यांच्या शेतीमधुन हा रस्ता गेलेला आहे. जसे आता गट नं.३३९ मधुन २४ मिटरचा रस्ता गेलेला आहे. तर त्या रस्त्यात जवळपास २२ ते २३ क्षेत्र आहे. तर त्या २२ ते २३ क्षेत्र आहे त्या २२ ते २३ क्षेत्र पैकी जवळपास १७ ते १८ लोकांना

टी.डी.आर. दिला गेलेला आहे. परंतु आजही त्यांना टी.डी.आर. दिला गेलेला आहे परंतु आज ही तो रस्ता आपल्या ताब्यात नाही. तो शेतकऱ्यांच्या ताब्यात आहे. ते शेतकरी आजही शेती करत आहे तेथे.म्हणजे आपण त्यांना भुसंपादनाचे पैसे दिलेले आहे. तरी आजही ते पुर्णच्या पुर्ण शेत त्यांच्याच ताब्यात आहे. त्याचे ही एकदा मार्गदर्शन करुन तो रस्ता ही आपण ताब्यात घेतला पाहिजे.

**श्री.के.पी.बागुल, सहा.नगररचनाकार, नगररचना विभाग :-** जेव्हा आपण त्यांच्याकडुन टी.डी.आर. घेतो तेव्हा आपण ७/१२ वर नाव लावुन घेतो. ही आपली प्रोसिजर आहे.

**मा.उपमहापौर :-** आजही त्यांच्या ताब्यात आहे ना.

**श्री.के.पी.बागुल, सहा.नगररचनाकार, नगररचना विभाग :-** त्यांचे ताब्यात असणे अपेक्षित नाही. कारण नावच महापालिकेचे लागलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** नाव लावलेले आहे महापालिकेचे पण आजही ते त्या जागवर शेती पेरत आहे ना.

**मा.आयुक्त :-** कागदावर आहे फिजीकली नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, माझे एक प्रश्न आहे तुम्हाला, त्या डी.पी.रोड वाल्यांना आपण एन.ओ.सी.दिली. तर तो डिमार्क का होत नाही. काय निर्णय, आयुक्त आले, कलेक्टर आले सगळे आले का थांबला तो. आता आपल्याला सांगितले आहे सार्वजनिक बांधकाम वाल्यांनी, तुम्ही नगरपालिका वाल्यांनी आम्हाला रोडाची मोजमाप करुन घ्यावी. मॅडम तुम्हाला हा विषय माहिती आहे. आता माझे डिमार्कचा प्रश्न मार्गी कसा लागणार. तो पहिले महत्वाचे आहे कारण आता चालु काम थांबलेल आहे ते. तुम्ही त्याला मार्गी लावा.

**मा.आयुक्त :-** ते ठिक आहे परंतु काल किंवा परवा आर्ध्या तासाच्या आत दोन निवेदन आले माझ्याकडे एक म्हणतो करा एक म्हणतो करु नका. त्यातीलच काही नागरीक पी.डब्ल्यु.डी.लाही आलेले होते. म्हणुनच त्यांनी आपल्याला पत्र दिलेले होते. आपले काही अधिकारी आणि प्रशासन मिळुन निर्णय घेऊ की, नेमके त्या जागेचे करायचे काय ? कारण अजुन ही एकमत झालेले नाही. कलेक्टर साहेबांनी ही ते बघितले होते. तेथे पी.डब्ल्यु.डी.चे ही अधिकारी होते. त्यांनी म्हटले की, तो पुर्ण विड्थ तेथे मिळत नाही. शिवाजी नगराचे पुल ज्या चौकात उतरायचे आहे त्याचे ही एक मत होत नाही. मग आपले ही काही सन्मा.पदाधिकारी आणि प्रशासन असे एकत्रीत बसुन त्याचे निर्णय घेऊ. जी.बी. समोर ठेवु मग आपण पी.डब्ल्यु.डी.ला कळवु.

**नगरसचिव :- विषय क्र. ०१ :- दि.२१/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहकूब झालेल्या महासभेचे व दि.२३/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता दि.२१/१२/२०२२ चे तहकूब महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई मला बोलायचे आहे. २२ तारखेला जी सभा झाली होती. त्यामध्ये २१,२२,२३ नंबरचे विषय होते. त्याच्यावर मला बोलायचे आहे. पेज नं.७५, २३ तारखेला जी महासभा झाली. या अगोदरचे जे जिल्हा बदली अंतर्गतचे जे विषय झालेले आहे. त्या अगोदर पण आपण महासभेमध्ये बरेच ठराव केलेले आहे. तर ते झालेले ठरावांमध्ये मला थोडीशी तफावत मी लक्षात आणुन देते. जे ठराव झालेले आहे. जर ते जिल्हा अंतर्गत बदलीचे असतील तर ते सारखेच असले पाहिजे. पण यात ३ ठराव झालेले आहे. त्यामध्ये आणि याच्यामध्ये अटीशर्ती ज्या घातल्या गेलेल्या आहे. ते वेगळया आहेत. तर त्याचे कारण काय ?

**मा.आयुक्त :-** कर्मचाऱ्यांना एन.ओ.सी.देण्याच्या संदर्भात आहे का हा विषय ? हा विषय माहित आहे. ज्या लोकांची भरती २०११-१२ च्या काळात झाली. त्यात आहे बरेच जे प्रॉपर जळगांवचे नाही बाहेर गावाचे आहे किंवा इतर शहरातले आहे. आणि त्यासाठी बरेच कर्मचारी इतर महापालिकेत जाण्यासाठी ईच्छुक असतात. आणि मंत्रालय स्तरावरुन ते पत्र आणतात की, यांना ट्रान्सफर द्या म्हणुन. तर मी आल्यानंतर असे निर्णय घेतले होते की, जो पर्यंत आपल्याला, आपले कर्मचारी पहिलेच कमी आहे, जर आपण यांना रिलीव्ह केले तर

आपल्याला माणसंच मिळणार नाही. म्हणुन याची प्रोसिजर आपण करतो. परंतु रिलीव्ह मात्र करत नाही. जो पर्यंत आकृतीबंध मंजुर होत नाही, भरती होत नाही. तो पर्यंत त्यांना रिलीव्ह नाही करायचे. कारण माणसच नाही आपल्याकडे. यांची प्रोसिजर आपण केलेली आहे पण यांना रिलीव्ह आपण आपल्या याचेनंतर करु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मान्य आहे तुम्ही जे म्हणतात त्याच्याशी मी ॲग्री आहे. पण पुर्वी जे झालेले ठराव आहे ते. आणि आताचे.मी वाचुन दाखवते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आपण जळगांव जिल्ह्यातल्या लोकांनाच प्राधान्य द्यावे. जेणे करुन बाहेरचे येतील आणि बदल्या करुन घेतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या वेळेला विषय येईल ना आपल्या समोर.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यामुळे जळगांव शहरातलेच घ्या ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** श्री.गणेश गंभीर आढे, यांचा मनपा सेवेचा कार्यकाळ १० वर्षाचा झाला आहे. उक्त बाबींचा सहानभुतीपुर्वक विचार करता, विशेष बाब म्हणुन केलेली विनंती. मा.आयुक्त सो., यांनी मान्यता दिलेली असुन शासन आदेशाने श्री.आढे यांची अंतर जिल्हा बदलीस विशेष बाब म्हणुन मान्यता दिली तरी सद्यास्थितीत जळगांव महानगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी असुन आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया झालेल्या अनुकंपातत्वावर किंवा मनपा शासनाकडुन बदली कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतरच प्रशासनाने श्री.गणेश गंभीर आढे यांना जळगांव मनपा येथुन बदलीच्या जागे हजर राहण्याकामी कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असे यात लिहिलेले आहे. आणि यापुर्वी जे झालेले ठराव आहे. त्यात ऐवढे दिलेले नाही. आता एक ठराव आहे. महासभा ठराव क्र. ७६७ हे दि.०८/०८/२०२० ला झालेला आहे. तर त्यामध्ये असे लिहलेले आहे. मात्र सद्यास्थितीत जळगांव महापालिकेतील कर्मचारी संख्या कमी असुन आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहे. आकृतीबंध मान्यनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया किंवा अनुकंप नियुक्ती झाल्यावर व मनपाला कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतरच प्रशासनाने श्रीमती शितल प्रकाश शंभरकर यांना जळगांव मनपा येथुन बदलीच्या जागी हजर होणे कामी कार्यमुक्त करावे. आता मला असे विचारायचे आहे की, प्रशासनाने अनुकंपावर आहे ठिक आहे. आणि आकृतीबंध झाल्यावर ते पण मान्य आहे. कर्मचारी मिळाल्यावर ते पण मान्य आहे. पण शासनाकडुन कर्मचारी दिल्यावरच महापालिका येथुन सोडणार. असे या प्रस्तावामध्ये दिलेले आहे. मग यापुर्वीच्या प्रस्तावात असे का देण्यात आलेले नाही. दुसरा प्रश्न असा आहे की, हे जे तिन लोकं आहे. २१,२२,२३ नंबरचे यांना एन.ओ.सी. नाहरकत प्रमाणपत्र अजुन दिले नाही. ही जी व्यक्ती आहे शंभरकर म्हणुन ते दि.०८/०८/२०२२, दि.२९/०७/२०२२ ला त्यांचा अर्ज महासभेपुढे आलेला होता. आणि त्यानंतर त्यांना नाहरकत प्रमाणपत्र दिले लगेच दि.०१/०९/२०२२ ला. मग यांना असे दिले जात असेल तर यांना का दिले नाही.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, येथे आपण जे म्हटले आहे ना बदली कर्मचारी ते किंवा मध्ये आहे मॅडम, आकृतीबंध झालेनंतर भरती प्रक्रिया झालेवर, अनुकंप तत्वावर किंवा या तीन पैकी जे अगोदर होईल त्याप्रमाणे आपण ॲक्शन घेऊ त्याचे असे अर्थ आहे. आणि यांना एन.ओ.सी. या ठरावानंतर देणे अपेक्षित आहे. मी चौकशी करते की, अजुन का दिलेली नाही. यांना ठराव झाल्यानंतर एन.ओ.सी. देणे अपेक्षित आहे. ती एन.ओ.सी. का दिलेली नाही. आज आस्थापना अधिक्षक पण नाही, आस्थापना उपायुक्त पण नाही. त्यांनाच बोलवुन आपण विचारले असते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** का नाही आहे.

**मा.आयुक्त :-** हायकोर्टात गेलेले आहे ते दोघी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मग हे त्यांना केव्हा मिळेल.

**मा.आयुक्त :-** त्यांची एन.ओ.सी. त्यांना देण्यात येईल मॅडम.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला या ठरावात , दाखविलेले नाही.

**मा.आयुक्त :-** आहे ना मॅडम किंवा शब्द आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** झालेल्या अनुकंप तत्वावर किंवा मनपाला शासनाकडुन बदली कर्मचारी,

**मा.आयुक्त :-** ३ ऑप्शन पैकी १ ऑप्शन. जे अगोदर होईल ते. म्हणजे कर्मचारी बद्दल आपल्याला तेव्हा रिलीव्ह करू किंवा याचा अर्थ एवढाच आहे त्याचे,दुसरे नाही. पण जर

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण जसे पुर्वीचे आहे तसे पाहिजे. कारण यांचे दोन वर्षापासुन अर्ज पेन्डींग होते. जे नंतरचे आहे ते पहिले केले जातात असे स्पष्ट आरोप आहे माझे.

**मा.आयुक्त :-** ते दोन वर्ष याच्यासाठी झालेले नाही. ते शासनाचे जी.आर.असल्यामुळे आयुक्तांनी विशेष बाब म्हणुन त्याला मान्यता दिलेली आहे. आता तो जी.आर.नाही माझ्याकडे नाही तर त्याची कॉपी वाचुन दाखवली असती.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण नक्की चेहरे पाहुनच कामे केले जातात.

**मा.आयुक्त :-** नाही, चेहरे बघुन काम होत नाही मॅडम.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** चेहरे बघुन काम होते कारण वेळोवेळी मला असे जाणवले आहे. सहा सहा आठ आठ महिने, हे बघा नगरसचिव साहेब हसत आहे. कारण सगळयांना माहिती आहे. ते बरोबर हसतात. आपण दाखवत असतो म्हणुन ठिक आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १ मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२१/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहकूब झालेल्या महासभेचे व दि.२३/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता दि.२१/१२/२०२२ चे तहकूब महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०२ :-** तहकुब विषय- महासभा ठराव क्र.८९४ दि.०७/१०/२०२२ - मेहरुण स.नं.४५५/१ मधील ३० मी. रस्त्याच्या संरेखनात बदल करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही सुरु करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मा.आयुक्त हा विषय आपण मागच्या मिटींगला तहकुब केलेला होता की, प्रशासनाने डिटेल्स काही सभागृहासमोर आणलेले नाही. यावेळेस डिटेल्स आणले आहे म्हणजे काय केलेले आहे. फक्त नकाशा जोडलेला आहे. पण त्या नकाश्याचे अवलोकन केल्यानंतर असे लक्षात येत आहे की, जो मुख्य रस्ता आहे ३० मिटरचा तर त्यात बदल करतांना रस्त्याचे मुख्य अलाईनमेंट बदल करायच्या वेळेला तो १८ मिटरच्या रस्त्याकडुन वळुन ९ मिटरच्या रस्त्याला जोडण्यात येत आहे. आता मला बागुल साहेब तुम्ही सांगा. एखादा मुख्य रस्ता असे झिकझॅक अवस्थेत असतो का किंवा असायला हवा का ? म्हणजे ही मागणी अर्जदाराने केली, म्हणुन आपण लगेच ठराव करुन मंजुरी द्यायची हे कितपर्यंत योग्य आहे. जो ३० मिटरचा मुख्य रस्ता आहे. तो आपण १८ मिटरच्या रस्त्यावर राईट साईडला वळवतो आहे. आणि पुन्हा त्या रस्त्याला ९ मिटरच्या रस्त्याला जोडतो आहे.

**श्री. बागुल,सहा.संचालक,नगररचना विभाग :-** जो आपला सिटीसर्वेचा हा आहे तो आपण गव्हर्नमेंटला अहवाल सादर करतो १०.०० ते २०.०० मग आपण कलम ३७ ची कार्यवाही करून प्रस्ताव शासनाला सादर करावा म्हणुन आपण हा प्रस्ताव महासभेपुढे आणलेला आहे.

**ॲड. शुचिता हाडा** :- शासनाला योग्य वाटेल तर शासन निर्णय होईल पण आपण जी मागणी करतो आहे म्हणुन महासभेसमोर असे ठराव मुख्यरस्त्याचे आणणे आणि जी जागा प्लेग्राऊंड आरक्षित दाखविली जातेय तो मुख्यरस्ता जो प्लेग्राऊंडचा ३० मिटरचा तो रस्ताच आपण शिफ्टींगच करतोय का? म्हणजे भविष्यात काय

होणार आहे आयुक्त महोदया आणि महापौरताई मी तुमच्या लक्षात आणुन देवु ईच्छिते की, ही आपण एक अलायमेंट हे चेंज करतोय ३० मिटरचा सरळ जाणारा रस्ता आपण उजवीकडे वळविणार १८ मिटरच्या रोडवर, त्यानंतर डावीकडे जो ९ मिटरचा रस्ता आहे. त्याला तो जोडुन तिथे तो ३० मिटरचा करणार आणि जो पुन्हा ३० मिटरचा रस्ता होता तो करणार आणि जो त्रिकोण जो तयार करण्यात आला तो एक्स्टेंशन झोन म्हणुन आहे. आता तिथे ३० मिटरचा रस्ता आपला पुर्वीचा होता. ते प्लेग्राऊंडचे जे आरक्षण आहे डाव्या बाजुला त्या प्लेग्राऊंडच्या आरक्षणासाठी तो रस्ता होता. त्याच ओपनिंग ही झाल म्हणजे आता भविष्यात त्याची पुढची स्टेप काय असणार की म्हणजे त्या प्लेग्राऊंडच आरक्षण ॲटोमटीक/ आपोआप होईल. आता त्या प्लेग्राऊंडला रस्ताच शिल्लक नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की हा विषय रद्द करण्यात यावा व नामंजुर करण्यात यावा.

**श्री. कैलास सोनवणे** :- साहेब ह्या ज्या चुका करतात ना त्या इकडे आणत जावु नका. हे सगळे जे धंदे चालतात ना समजत आम्हाला.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- आप्पा दोन मिनिंट

**श्री. कैलास सोनवणे** :- ताई तुमच्या लक्षात आल का की टॉवरपासुनचा रस्ता सरळ जातो. आता या ताईंनी सांगीतले आणि प्रयत्न पण केला सांगायचा पण मला वाटत नाही की तुमच्या लक्षात आल असेल. आता टॉवर पासुन ते स्वातंत्र्य चौकापर्यंतचा रस्ता आहे. तर तिथे तो पण खाऊ गल्ली ते शिवाजी पुतळ्याकडे काढायचा आहे. थोड व्यवस्थित करा रिकामे धंदे काय करतात.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- महापौरताई मला यामध्ये काही प्रश्न आहेत त्याचा खुलासापण प्रशासनाने केला पाहीजे की, डॉकेटमध्ये म्हंटलेले आहे की त्याची भुसंपादनाची प्रक्रीया सुरू आहे. खरेदी सुचना झालेली आहे मग ही जर सगळी प्रक्रीया झालेली आहे तर महासभेसमोर हा प्रस्ताव आला कसा काय ? सगळ्यात महत्वाचा प्रश्न हा आहे. हे डॉकेटमध्ये म्हंटलेले आहे नितीनभाऊ की खरेदी सुचना झालेली आहे जिल्हाधिकाऱ्यांकडुन सुध्दा मग हे भुसंपादनाची प्रक्रीया सुरू झालेली असतांना आपण तो रस्ता अलायमेंट चेंज करायचा प्रश्न कुठे आला आणि सभागृहापुढे तो ठराव आला कसा काय? हा महत्वाचा प्रश्न आहे याच उत्तर द्याव प्रशासनाने.

**श्री. कैलास सोनवणे** :- जावु द्या ना कशाला उत्तर घेताहेत.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. नितीन लढ्ढा** :- ताई हा विषय जो आहे ना

**श्री. कैलास सोनवणे** :- ठिक आहे जे काही पुर्वीचे असतील. तर ते

**मा.महापौर** :- नामंजुर विषय क्रं. २

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर** :- ठिक आहे, विषय क्रं. २ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३ :-** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अग्निशमन सेवा बळकटीकरण या लेखाशिर्ष सन २०२२-२३ अंतर्गत पिंप्राळा येथील ओपन स्पेस गट क्रमांक ०७ मध्ये अग्निशमन केंद्र, कार्यालयाची इमारत, कंपाऊंड वॉल व गेट व त्यास संलग्न विकास कामे बांधकाम करणे कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. विजय पाटील** :- महापौरताई मला बोलायचे आहे याच्यामध्ये की गट नं. ७ मधील विषय आहे हा तिथल्या लोकांची मागणी आहे आम्हाला न विचारता आपले अधिकारी गेले तिथे महानगरपालिकेचे तर तिथे आपल्याला अधिकार आहे ओपनस्पेस मध्ये हे करायचा , अग्निशमनचा प्रस्ताव टाकायचा, इंजिनियर लोकांची मिटींग झाली पाहीजे आपल्यासोबत

**सौ.प्रतिभा कापसे** :- ताई याला आमचापण विरोध आहे

**श्री. विजय पाटील** :- भरपुर प्रस्ताव आहे , आहे ना जागा आपल्याकडे शिल्लक

**श्री. कैलास सोनवणे** :- चेंज करता येईल का आपल्याला जागा

**श्री. विजय पाटील** :- भरपुर.

**सौ.प्रतिभा कापसे** :- आमचा विरोध आहे , दुसरीकडे द्या अग्निशमन ला आमचा विरोध नाही फक्त दुसरीकडे जागा द्या.

**श्री. नितीन लढ्ढा** :- ताई सन्मा. सदस्यांच्या सुचनांचा विचार करता या जागेवर न करता या प्रस्तावासाठी निविदा निघालेल्या आहेत तर त्या निविदा धारकाच अस म्हणण आहे की त्या ओपनस्पेसवर कायदेशीर अधिकार त्या परिसरातील रहिवाश्यांचा असतो. जरी ती त्या भागातील नागरीसुविधा असतील पण अग्निशमन केंद्र होण खुप गरजेच आहे या बद्दलही कुठल दुमत नाहीये. परंतू ही ओपनस्पेस ज्या परिसरात आहे. या ओपनस्पेसमध्ये तिथल्या स्थानिक नागरीकांनी स्वखर्चाने तिथे कंपाऊंड वॉलही केलेले आहे आणि तिथे मंदिराचे बांधकामही झालेले आहे आणि पुन्हा तिथे अग्निशमन केंद्र झाल्यास तिथे वाद आणि संघर्ष निर्माण होईल आणि संघर्ष निर्माण झाल्यास या कामासाठी निधीची जी उपलब्धता आहे अग्निशमन केंद्रासाठी तो निधीसुध्दा वादात पडुन ते होणार कामही थांबेल. तर यास्तव अशी सुचना करतो की अशाच पध्दतीची त्याच प्रभागामध्ये एक दुसरी ओपनस्पेस जागा आहे. कुलभुषणभाऊ त्या ओपनस्पेसचा नंबर काय आहे .

**मा.उपमहापौर** :- १९९

**श्री. नितीन लढ्ढा** :- गट नं. १९९ पिंप्राळा येथे ओपनस्पेस आहे. जवळपास हा आपला प्रस्ताव सन्मा.उपमहापौर कुलभुषणभाऊ यांनी बराचसा कालावधी मध्ये पाठपुरावा करून तो निधी उपलब्ध करून घेतलेला आहे. काम अंतिम टप्प्यामध्ये आलेले होते. परंतू स्थानिक नगरसेवकांचा म्हणा किंवा स्थानिक नागरीकांचा त्या जागेच्या संदर्भातील विरोध पाहाता. गट नं १९९ आणि तिथल्या सन्मा. नगरसेवकांनाही कुठलीही हरकत नाहीये. सन्मा. आबा कापसेंशीही मी बोललो तर त्यांचही म्हणण आहे की गट नं.१९९ वर तो प्रस्ताव मान्य करण्यात यावा. म्हणजे पुर्वी ज्याच्यावर

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ याच्यामधील ज्या तफावती आहे त्या राहु द्या आता हा विषय तुम्ही मंजुर करा आणि

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा मंजुर करण्यापेक्षा आपण काय करू.

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ अजुन बाकी दोन नगरसेवक नाहीयेत. विजयभाऊ तुमची मंजुरी आहे का भाऊ जे म्हणताहेत त्याला

**श्री. विजय पाटील** :- हो, हो

**श्री. कैलास सोनवणे** :- मग ठिक आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- त्यांची मंजुरी आहे ना मग ठिक आहे.

**मा.उपमहापौर** :- आप्पासाहेब मुद्दा फक्त हाच होता. आता सन्मा.सदस्यांनी जो मुद्दा मांडला आणि स्थानिक नगरसेवकांचा आणि नागरीकांचा विरोध असल्याकारणाने आपण ती जागा सोडुन.

**श्री. कैलास सोनवणे** :- ते म्हणताहेत ना

**श्री. विजय पाटील** :- आमचा काही त्या कामाला विरोध नाहीये भाऊ

**मा.उपमहापौर** :- गट नं.१९९ ला काही विरोध नाहीये ना.

**श्री. विजय पाटील** :- नाही काही विरोध नाहीये भाऊ

**श्री. कैलास सोनवणे** :- ठिक आहे.

**मा.उपमहापौर** :- प्रशासनाने याची नोंद घ्यावी की गट नं.७ मध्ये न करता गट नं.१९९ मध्ये अग्निशमन केंद्र तयार करण्यास मान्यता आणि ठरावामध्ये ही नोंद करून घ्यावी की

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा फक्त गट नं. ७ जो आहे तर गट नं. ७ मध्ये न करता सदरहु प्रस्ताव गट नं. १९९ मधील खुल्या जागेवर मान्य करण्यात येत आहे. येणाऱ्या पर्यायी खर्चास आणि अतिरीक्त मनपा निधीचीही मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने मार्चपुर्वी निधी व्यपगत न होता त्या

निधीचा योग्य पध्दतीने , विहीत पध्दतीचा उपयोग करून तो निधी खर्च कसा करता येईल त्या पध्दतीने प्रशासनाने त्याचे नियोजन तात्काळ कराव.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- हो पिंप्राळा शिवार पण घेवुन घ्या त्यात

**मा.उपमहापौर** :- पिंप्राळा शिवार आहे ना भाऊ

**श्री. नितीन लढ्ढा** :- म्हणजे तो निधी परत नाही जाणार.

**श्री. कैलास सोनवणे** :- ठिक आहे पुढचा विषय घ्या.

**मा.उपमहापौर** :- माझ अनुमोदन आहे या विषयाला

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना आहेत आणि प्रस्ताव आहे त्याप्रमाणे प्रशासनाने दुरूस्त्या करून घ्याव्यात आणि बदल करून घ्यावा आणि विषय क्रं.३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अग्निशमन सेवा बळकटीकरण या लेखाशिर्ष सन २०२२-२३ अंतर्गत पिंप्राळा येथील ओपन स्पेस गट क्रमांक ०७ मध्ये अग्निशमन केंद्र, कार्यालयाची इमारत, कंपाऊंड वॉल व गेट व त्यास संलग्न विकास कामे बांधकाम करणे कामी महाराष्ट्र शासन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचेकडील पत्र क्रं.जा.क्रं./नप-१/६१६/२०२२२ दि.१८/११/२०२२ अन्वये सुधारीत आदेश - २ नुसार जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षाकरीता जळगांव महानगरपालिकेस अग्निशमन सेवा बळकटीकरण करीता रक्कम रु.१.०० कोटी मात्र निधी उपलब्ध झालेला आहे.

जळगांव शहराचा वाढता विकास पाहता वाढीव भागात अग्निशमन सेवा तात्काळ पुरविता येणे करीता पिंप्राळा परीसरात एक अग्निशमन सेवा केंद्र असणे गरजेचे असल्याने मनपा महासभा ठराव क्रं.३६८ दि.०३/०२/२०२१ अन्वये पिंप्राळा भागात फायर स्टेशन उभारण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु त्या ठरावात जागेचा उल्लेख करण्यात आलेला नाही सदरचे फायर स्टेशनची पिंप्राळा गट नं.०७ येथील ले आऊट ओपनस्पेस मध्ये ही सुविधा करता येईल याबाबत डायरेक्टर ऑफ महाराष्ट्र फायर सर्विस,महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शक नकाशानुसार आपलेकडील उपलब्ध जागेनुसार दोन फायर फायटर करीता वास्तुविशारद व आर्कीटेक्ट यांचेकडुन अंदाजपत्रक राज्य दरसुची सन २०२२-२३ नुसार मागविले असता या कामास रक्कम रु.१,२८,२५,८२१/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत उपलब्ध निधी पेक्षा जास्त होणारा खर्च रक्कम रु.२८,२५,८२१/- मात्र अग्निशमन विभागास प्राप्त इतर निधीतुन (अनुज्ञेय असल्यास) किंवा मनपा निधीतुन मंजुरीनुसार करणे आवश्यक आहे. सदरचे कामास व रक्कमेस महासभेच्या मंजुरी अंती नगररचना विभागाकडुन वास्तुविशारद यांचेकडुन प्राप्त नकाशांना मंजुरी प्राप्त करुन तद्नंतर सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडेस पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार उक्त योजने अंतर्गत अग्निशमन बळकटीकरण करण्याकरीता शासनाचा रक्कम रु.१.०० कोटी निधी अनुज्ञेय असुन अनुदानापेक्षा जास्त होणारा खर्च रक्कम रु.२८,२५,८२१/- मात्रचा मनपा निधीतुन मनपा अर्थसंकल्प सन २०२२-२३ मधिल नविन ईमारत/फायर स्टेशन बांधणे व वार्ड ऑफीस या लेखाशिर्षातुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अग्निशमन सेवा बळकटीकरण या लेखाशिर्ष सन २०२२-२३ अंतर्गत पिंप्राळा येथील ओपन स्पेस गट क्रमांक ०७ ऐवजी (मध्ये न करता) पिंप्राळा शिवार मनपा ओपनस्पेस गट नं.१९९ मध्ये अग्निशमन केंद्र, कार्यालयाची इमारत, कंपाऊंड वॉल व गेट व त्यास संलग्न विकास कामे बांधकाम करणेस मान्यता प्रदान करण्यात

येत आहे. प्रशासनाने सदर निधी व्यपगत होणार नाही याची दक्षता घेवुन मुदतीत ३१ मार्च पर्यंत वेळेत पुर्तता करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ४ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील विविध प्रभागात ०१ ते १० विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- विकास कामांचा विषय आहे मान्य आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- त्याच्यात फक्त दुरूस्ती करायची आहे. त्याच्यात चुकुन प्रभाग क्रं. १६ आलेला आहे तो प्रभाग क्रं. ९ करण्यात यावा. कारण आपण तो ठराव केलेला आहे. पण त्यात दुरूस्ती करून परत तो ठराव करावा लागतोय आणि सभागृहापुढे अजुन एक विनंती अशी होती नितीनभाऊ की असे शासन जो निधी देतो आपल्याला कारण असे बरेच निधी

**श्री. नितीन लढ्ढा** :- ४ नंबरचा का

**श्री. विशाल त्रिपाठी** :- हा ४ नंबर जो आहे ना तो १६ झालेला आहे तर तो तिथे ९ करून घ्यावा कारण प्रभाग ९ मध्ये तो आहे आणि अशी एक विनंती होती सभागृहाला की असे अनेक शासकीय निधी येतात आणि निधी आल्यावर आपली महासभा १/१ महिना होत नाही किंवा दिड दिड महिना होत नाही किंवा आचारसंहिता लागण्याची शक्यता असते. तर जी PWD ला किंवा संबंधित डिपार्टमेंटला NOC द्यावी लागते ती पुर्वी आपण प्रशासनाकडुन NOC देत होतो. मग कालांतराने NOC साठी महासभेपुढे डॉकेट येवुन आपण प्रशासकीय ठराव आपण करून घेत होतो. तर माझी विनंती होती की ज्या प्रमाणे आपण संविदेला मान्यता देतो की NOC देवुन टाकायची प्रशासनाने आणि सभागृहाच्या माहितीसाठी पटलावर तो विषय ठेवण्यात यावा अशी माझी सभागृहापुढे विनंती आहे की जेणेकरून या विषयांना आपल्याला हे होणार नाही. याच्यापुढे आपल्याकडे जे शासकीय निधी येतात त्याच्यासाठीच हा विषय आहे. कारण आता पुढे विनंती आहे माझी अशी कारण आताच राजुमामांनी लाईटच्या संदर्भात त्याच डॉकेट प्रशासनाकडे तयार आहे. आता ते शिवरात्री असल्यामुळे तिथे लाईट लावणे गरजेचे आहे. परंतू ठरावामुळे आपल्याला उशिर होईल. तर ते आज जर आपण ठराव केला तर शिवरात्री पर्यंत ते लाईट लागतील.

**श्री. कैलास सोनवणे** :- तस नाही करता येणार ठराव.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- हो मी सुचना मांडतोय ठराव नाही मांडत आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो ४ नंबर फक्त दुरूस्ती करून घेण्यात यावी आणि मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं.४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(११२)/न.वि.-१६ दि.२१ डिसेंबर २०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजना अंतर्गत रक्कम रु.१०.०० कोटी (लेखा शिर्ष - ४२१७०५४१) अन्वये खालील विवरण पत्रानुसार कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत नेहरु नगर गट क्रं.१४६ मधील श्री.दिपक सोनवणे यांच्या घरापासुन ते वाघ नगर पर्यंत मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| २. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत महाबळ चौक ते संत गाडगेबाबा चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २६०.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गणपती मंदिर शिक्षक कॉलनी परमार्थ नगर ते शिंदे आव्हाने रस्त्यापर्यंत, आर कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ४. | प्रभाग क्रं.९ अंतर्गत मानवसेवा शाळेपासुन ते अष्टभुजा गेट शिवरस्ता १२ मीटर रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ५. | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत राठी शाळेपासुन ते सिंधी कॉलनीपर्यंत (टि.पाईंट) रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ६. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत श्री.गणेश डोळे ते श्री.गोपाल विलास सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९०.०० |
| ७. | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत संत चौखामेळा ते राठी शाळेपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| ८. | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत पंचमुखी हनुमान मंदिरापासुन ते नानीबाई हॉस्पीटल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८०.०० |
| ९. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर मधील माऊली नगर येथील रस्ते डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| १०. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत मायादेवी नगर गेट पासुन ते रोटरी हॉल श्री.चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६०.०० |
| | एकुण रक्कम रु. :- | १०००.०० |

सदरहु रस्ते मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(११२)/न.वि.-१६ दि.२१ डिसेंबर २०२२ अन्वये कार्यान्वयन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तुत विकास कामे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यात येणार असल्याने उक्त ०१ ते १० कामांना मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरचे कामे सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव यांच्याकडुन करणेकामी ना-हरकत दाखला देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ५ :-** राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा अंतर्गत जळगांव शहरातील हवेचे प्रदुषण कमी होणे कामी प्राप्त झालेल्या निधीतुन नियमानुसार साहित्य खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त** :- कारण आहे की आपल्याकडे निधीच खर्च होत नाही. म्हणुन आपण कंन्सलटंट लावुन मग ते ॲक्शन प्लॅन देतात आणि मग त्या ॲक्शन प्लॅन मध्ये ॲटम जे आहेत जसे त्याच्यामध्ये मॅकेनिक आणि स्विपर आहेत जे ५ लाखाच्या लोकसंख्येला कंम्पलसरी आहे. जे आपली प्रोसिजर सॅंक्शन होवुन टेंडर होवुन ते हायवेला स्ट्रीट लाईट वापरता येईल असा आहे आणि हा ॲक्शन प्लॅन सेंट्रल गर्व्हमेंटला पाठविलेला आहे. हा मंजुर झालेला आहे त्यामुळे याच्यामध्ये जे सब्मिशन आहे ते IDI ने घेवु नये कारण की माझा प्रयत्न चालु आहे अजुन निधी मागवायचा तर निधी आल्यानंतर पुन्हा त्याला मान्यता घ्यावी लागेल त्यापेक्षा ॲटम मंजुर करावे दर टाकलेले आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- म्हणजे हा ॲक्शन प्लॅन मंजुर केलेला आहे.

**मा.आयुक्त** :- हो सेंट्रल गर्व्हमेंटने

**श्री. नितीन लढ्ढा** :- म्हणजे याच्यामध्ये वजावट न करता करावे.

**मा.आयुक्त** :- सध्या नाही आणि पुन्हा निधी आल्यानंतर करूया.

**श्री. नितीन लढ्ढा** :- ठिक आहे या विषयाला मान्यता देण्यात येत आहे. जर वाढीव निधी आला आणि याच्या संदर्भात जे ॲटम नमुद केलेले आहेत. त्या ॲटमला तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आणि निधी भविष्यात जो काही येईल त्यालाही ही मान्यता राहील.

**श्री. चंद्रशेखर पाटील** :- महापौरताई मला या विषयावर बोलायच आहे. या साठी भविष्यात जे काही निधी येणार आहेत. आमच्या मागच्या मिटींग पासुन तिच मागणी करतो की चंदुआण्णा नगर कडील जो कचरा फॅक्टरीकडे जाणारा जो रस्ता आहे. याच्यात जी अमाऊंट आहे आणि येणाऱ्या पुढच्या वर्षात जी येणारी रक्कम आहे ती आपली २०२५ पर्यंत येणारच आहे. तर त्याच्या अंतर्गत मध्ये आताच आपण ही सुचना याच्यामध्ये ॲड करून घ्यावी इतिवृत्तात घ्यावी. याच्यातील उरलेला निधी आणि पुढच्या एप्रिलमध्ये येणारा निधी याच्यात तडजोड करून उरलेला खर्च त्या कचरा फॅक्टरी च्या येथे करण्यात यावा. कारण मागच्या महासभेत पण ते घेतले आहे. इतर प्रभागात रस्ते झालेले आहेत.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आता मध्यंतरी आपण वृत्तपत्रात वाचले असेल की १०० कोटींच्या रस्ते संदर्भातील या कामाच्या संदर्भातील माहिती सभागृहाला अवगत करायच औचित्य मला वाटत नाही किंवा कुठल्याही सदस्याला हे माहिती नाही की कोणते रस्ते प्रस्तावित केलेले आहेत. मग अशा पध्दतीने या शहरातील कामकाजाच्या संदर्भातील धोरण ठरवण्याचे अधिकार या सभागृहाला आहे आणि त्या सभागृहालाच विश्वासात न घेता अशा पध्दतीने B&C कडे परस्पर कसे काय जातात आणि B&C लागलीच ते प्रस्ताव शासनाकडे पाठवतात. म्हणजे ज्या सदस्यांचा अत्यंत महत्वाचा विषय आहे. आता या विषयी मनोजभाऊ सुध्दा बोलले आणि डॉ.साहेबही बोलत आहेत. जे ७५ कोटी ८५ कोटी किंवा १०० कोटी जे काही असेल. या कामांचा समावेश यामध्ये होण अत्यंत गरजेच होते आप्पा, म्हणजे हा काय प्रकार चाललाय. ठिक आहे महानगरपालिकेच्या अंतर्गत काम नाही करायचे असतील. ॲज कंन्सलटंट/ एजन्सी म्हणुन B&C कडुन करायचे. पण कामाच धोरण कोण ठरवतय. तिस तिस टक्के नगरोत्थान मधुन आलेले होते. तिस तिस टक्के महानगरपालिकेचा हिस्सा आहे आणि जिथे महानगरपालिकेचा हिस्सा असेल आणि त्या महानगरपालिकेला सुध्दा विश्वासात घेतले जात नसेल. म्हणजे ही वेगळीच परस्पर देण्याची पध्दत सुरू झालेली दिसते आहे. म्हणजे महत्वाचे काम होत नाहीत आणि मग कुणाला एकाला वाटत असेल आणि मनाला वाटत असेल त्या पध्दतीचे काम होत असतील. तर मग या सभागृहाचा उपयोग काय ? आज मला सांगा कचरा फॅक्टरी च्या रस्त्याचा विषय आहे हा गंभीर आहे आणि हे आज नाहीये हे जवळपास वर्षानुवर्षापासुन सदस्य बोलत आहेत. मग आज हे काम समाविष्ट होत नसेल आणि मग अशा राष्ट्रीय निधीमधील सुचना सदस्य जर मांडत असतील तर मला वाटत काय अर्थ आहे. तर हे प्रस्ताव जाता कोणाच्या संमतीने

**मा.महापौर** :- प्रशासनाने या संदर्भात दखल घ्यावी.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही ताई मी आता मी आयुक्त मॅडमांनाही विचारल की वृत्तपत्रांमध्ये आपल्याला वाचायला मिळत की, ७५ कोटींचा प्रस्ताव गेला, १०० कोटींचा प्रस्ताव गेला, मग याची माहिती आम्हाला मिळतच नाही प्रत्यक्ष आणि माझ्याकडेही प्रत नाहीये.

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ प्रस्ताव तसे नाहीयेत ते , B&C वाल्याला ते ईस्टिमेट बनवायला लावले आणि ते शासनाकडुन मंजुरी येवुन आणि मग ते आणि आधी ते ठराव केले होते आणि मग ते टेंडर निघणार होते. म्हणजे डायरेक्ट परवानग्या दिलेल्या आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा मला एक सांगा या सभागृहामध्ये धोरण का ठरवतो की या शहराच्या गरजा काय आहे. या चर्चेमध्ये जस आता डॉ.साहेबांचा विषय निघाला आज या रस्त्याची परिस्थिती काय आहे ती त्यांना माहिती आहे.आज त्या ८५ कोटी च्या संदर्भातील जर कधी किंवा हा १०० कोटींच्या निधीच नियोजन करायच आहे. हा विषय जर सभागृहात आला असता.

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ एवढ्या डिटेल्स सांगण्याची गरज नाही. नेमके सांगा काय म्हणायचे आहे तुम्हाला

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा मग मी तेच म्हणतोय ना की याच्या संदर्भातील प्रस्ताव परस्पर कसे काय जातात B&C कडे

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ महापालिकेकडुन गेलेलेच नाहीयेत हे प्रस्ताव

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो ना मग

**मा.महापौर** :- महापालिकेला माहिती पाहीजे की त्यात कोणकोणते रस्ते ईन्किल्युड आहेत त्या प्रस्तावात

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा B&C करते आहे परंतू मग B&C ला देतो कोण आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही नाही, भाऊ आता कस आहे माहिती आहे का ताई बोलु का

**मा.महापौर** :- हो बोला ना.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता कस आहे माहिती आहे का की , आपले जे नेते आहेत ते फार शक्तीशाली आहेत. ते गॅरेंटेड आहेत ते निधी देणारे म्हणुन डायरेक्ट परवानगी सह निधी येतो आहे. त्यांनी नगरसेवकांना विचारून आणि B&C वाले गल्लोगल्ली फिरून त्यांनी ईस्टिमेट गेलेले आहेत. त्याप्रमाणे गुलाबभाऊ पालकमंत्री असतांना शिवसेनेच्या नगरसेवकांनी ८२ कोटींच प्रकरण , शिवसेनेचे होते हे तुम्हालाही माहिती आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- सगळ त्यावेळी काही नगरसेवक तुमचे झालेले होते, त्याचप्रमाणे काही आमचे झालेले आहेत काही बाकी आहेत.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- ऐका , त्याचप्रमाणे काही त्यावेळेला तुम्ही त्यांना प्रॉयोरिटी देवुन टाकली की तुमच्या वॉर्डातील दोन दोन कोटींचे रस्ते आम्ही देवु आणि तुम्ही रस्ते बनवा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा डॉ. साहेबांचा जो हा विषय आहे.

**श्री. चंद्रशेखर पाटील** :- भाऊ माझ्या वॉर्डात रस्तेच नाहीये. हेच सांगत होतो मी ३ कोटी ५८ लाख रूपये मला दिले होते. त्यातले २ कोटी गायब केले ना

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ त्यांचही म्हणण बरोबर आहे आणि तुमचही म्हणण बरोबर आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- काय आहे आप्पा

**श्री. चंद्रशेखर पाटील** :- भाऊ मला अजुन दोन कोटी मिळाले नाही.

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ कमीत कमी नागरीकांची ओरड म्हणुन आणि आता विषय निघाला म्हणुन तुम्हाला सांगतो या ठिकाणी, ताईंची बातमी आली दिव्य मराठीला फार सुखावह करणारी बातमी आहे ती मी या निमित्ताने दिव्य मराठीच आभार मानेल मी की फक्त या विषयाची ताईंची व्यथा होती परंतू त्यांच्या रूपातुन ८० नगरसेवकांची ती व्यथा होती. ८० नगरसेवकांची आता त्यांची जी पर्सनल लाईफ आहे. ती ८० नगरसेवकांना लागू होते. ८० नगरसेवकांची बाजु मांडलेली होती दिव्य मराठीमध्ये आणि दिव्य मराठी हा पेपर पर्सनली कोणाला हे करत नाही. त्यांनी त्यांचे हे हे होते ते विशेष बाब म्हणुन आणि हि माहिती त्यांनी टाकलेली आहे तर ही परिस्थिती सगळ्या नगरसेवकांची आहे. येथे बसलेल्या सगळ्यांची आहे. तर दोन दोन कोटी का होईना थोडे तर दिले असते. नगरसेवकांना

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही नाही दोन दोन कोटी नाही पाच पाच कोटी द्याना.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही ना एवढे पैसे नाहीये ना भाऊ , शासनाने पैसे दिले पाहीजे. देता आहे ना हे पहा , ७५ कोटींची यादी आहे, १०० कोटीची यादी आहे, ८४ कोटींची यादी आहे आणि मी तुम्हाला फोन करून बोललो पण होतो नितीनभाऊ की वरिष्ठ लेव्हल वरून आणि त्यांच्या बैठकापण झाल्या. फडणवीस साहेबांनी आता मॅडम पण आहेत या ठिकाणी, मॅडम आणि कलेक्टर साहेबांनी डायरेक्ट बोलले काय बोलले काय माहित तिथ सगळ्यांना बोलावल गेल, मला वाटत तिथे कलेक्टर साहेब असतील, मॅडम असतील, B&C वाले असतील. रात्रभर बसले होते हे सगळे त्याठिकाणी त्यांनी सगळ तयार करून त्यांना पाठवल आणि दुसऱ्या दिवशी नाशिकला बैठक झाली आणि जवळजवळ ते १०० कोटींची फायनल करता आहे ते तर त्याच्यामध्ये काय आपण बसुन समजा

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही नाही या रस्त्यांच्या कामाबाबत कुणाचही दुमत नाहीये. परंतू कमीत कमी मी काय म्हणतो.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता येईल ना पुढच्या मिटींगला येईल ना ते.

**श्री. नितीन लढ्ढा** :- या विषयावर आपल्या बऱ्याचवेळा चर्चा झालेल्या आहेत.

**श्री. कैलास सोनवणे** :- येईल ना पुढच्या मिटींगला येईल ना

**श्री. नितीन लढ्ढा** :- या शहराच्या ज्या प्राथमिकता ठरल्या पाहिजे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ त्याच्यामध्ये फॉलोअप स्वत: राजुमामा , गिरीषभाऊ

**श्री. नितीन लढ्ढा** :- विशालभाऊ मी काय म्हणतो.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ एक मिनिंट ऐकुन घ्या.

**श्री. राजेंद्र पाटील** :- भाऊ

**मा.उपमहापौर** :- भाऊ विशालभाऊ नितीनभाऊंच म्हणण काय आहे की १०० नाही ५०० कोटी रूपये आणा पण कोणत्या कामाला प्राधान्य दिल पाहीजे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ एक मिनिंट तेच सांगतो आहे भाऊ

**मा.उपमहापौर** :- भाऊ हि जी आपण काम घेतली आहे ती

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ तुमचे जे काम असतील म्हणजे तुमचे काम

**मा.उपमहापौर** :- भाऊ अडीचशे कोटी मध्ये तरी कमीत कमी त्यांना द्यायला पाहीजे ना

**श्री. विशाल त्रिपाठी** :- शक्यतोवर जास्तीत जास्त १२ मिटरचे रस्ते त्याच्यात घेण्यात आलेले आहेत आणि ९ मिटरचे काही रस्ते तरी घेण्यात यावेत त्याच्यामध्ये किंवा

**श्री. नितीन लढ्ढा** :- विशालभाऊ ऐका, काय झाल आहे ताई की ती यादी मी वाचली.

**श्री. कैलास सोनवणे** :- ते बदलु शकता बर

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो , ती यादी मी वाचली, त्याच्यातील बरेचशे काम प्रस्तावित केलेले आहेत. जे पुर्ण झ ाालेले आहेत. काही प्रभागातील प्रस्तावित आहेत.

**श्री. कैलास सोनवणे** :- हो हो.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आमच म्हणण एकच आहे की ज्यावेळेला असा विषय या सभागृहासमोर येतो त्यावेळेला या विषयावर चर्चा होवू नये.

**श्री. कैलास सोनवणे** :- हो ना मग पुढच्या वेळेला येणार नाही

**श्री. नितीन लढ्ढा** :- कारण काय आहे की द्वीवृत्ती होणार नाही.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही नाही.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाहीतर काय होत मग की याच्यामध्येच वेळ वाया जातो.

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ पुढच्या मिटींगमध्ये काही विषय येणार नाही.

**श्री. राजेंद्र पाटील** :- भाऊ

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाहीतर काय होत की आपण काही का प्रस्तावित केले त्याच्यामध्ये समजा १० कोटी रूपयांची काम द्वीवृत्ती झाली आहेत. डबल झाले आहेत मग काय होत की पुर्ण प्रस्ताव प्रलंबित होत जातो.

**श्री. राजेंद्र पाटील** :- भाऊ मी एकच मिनिंट समाधान करतो आपल हे विषय सगळे सभागृहासमोर येणार होते. परंतू विधानपरिषदेची आचारसंहिता लागली आणि मग महासभा आपली लांबली आणि आपल्याकडे वेळ कमी आहे त्याच्यासाठी हे डायरेक्ट गेले आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- तर त्याच्या बाबतीत काहीच वाद नाही ना आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ पुढच्या मिटींगला येतील ना १०० टक्के येतील. आणि काही ईस्टिमेट बदलवायचे होते तर ते बदलवत आहेत पुढच्या मिटींगला येतील सगळे ते प्रस्ताव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये काय होईल वेळ वाया जाईल.

**नगरसचिव** :- भाऊ ५ नंबर

**श्री. कैलास सोनवणे** :- पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- विषय क्रं. ५ ला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ५ च्या ठरावामध्ये फक्त एवढाच बदल करण्यात / दुरूस्ती करण्यात यावी आणि ॲटम घेण्यात यावे परंतू खर्चाची आकडेवारी त्यात घेवु नये. सर्वानुमते विषय क्रं. ५ मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांचे मार्फत राज्यात राष्ट्रीय शुध्द हवा उपक्रम राबविण्यात येत असुन शहरामधील हवेचे प्रदुषण कमी होण्याच्या उद्‌देशाने कार्यक्रम राबविण्याकरीता दिनांक १०/१०/२०२२ रोजी जळगांव शहर महानगरपालिकेस रक्कम रु.२.४० कोटी रुपये तसेच दिनांक २९/११/२०२२ रोजी रक्कम रु.०.२६ रुपये असे एकत्रीत रक्कम रु.२.६६ कोटी रुपये अनुदान प्राप्त झालेले आहे. तरी शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक नियमावली नुसार शहरामधील धुळीचे प्रमाण कमी होण्याच्या उद्‌देशाने खर्च करणे आवश्यक असुन मुख्यत: १) शहरामधील मुख्य रस्त्यांवरील धुळ साफसफाई

करीता मेकॅनिकल स्वीपर मशीन खरेदी (२) इलेक्ट्रॉनिक वाहन खरेदी (३) शहरामध्ये इलेक्ट्रॉनिक व्हेईकल्सच्या चार्जिंग करीता पॉवर स्टेशन उभारणी (४) शहरामध्ये विविध चौकात कारंजे बसविणे (५) रस्त्याच्या कडेने वृक्षारोपण करणे (६) वर्दळीचे रस्ते नुतनीकरण तसेच (७) जनजागृती, विषय तज्ञांची नेमणुक व प्रशासकीय खर्च करीता इ.बाबींचा समावेश होणे आवश्यक आहे. कामाचा तपशिल खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | तपशील |
|---|---|
| १. | मेकॅनिकल स्वीपर मशीन खरेदी |
| २. | इलेक्ट्रानिक वाहन खरेदी |
| ३. | इलेक्ट्रानिक व्हेहीकल्सच्या चार्जिंग करीता पॉवर स्टेशन उभारणी |
| ४. | कारंजे बसविणे |
| ५. | रस्त्याच्या कडेने वृक्षारोपण |
| ६. | वर्दळीचे रस्ते नुतनिकरण |
| ७. | जनजागृती |

जळगांव शहराच्या प्रदुषीत शहराच्या यादीत समावेश असुन प्रदुषण कमी करण्यासाठी राष्ट्रीय शुध्दहवा कार्यक्रम (NCAP) या केंद्रशासनाच्या योजनेतुन निधी जळगांव म.न.पास देण्यात आलेला आहे व प्रदुषण कमी करण्यासाठी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार आवश्यक कार्यवाही करणे व प्राप्त निधीच्या विनीयोग करणेसाठी आयुक्त यांच्या अधिपत्याखाली दि.१८/१०/२०२२ रोजी त्यांच्या दालनात बैठक आयोजीत करण्यात आली होती व त्यास पर्यावरण विभागाचे शाखा अभियंता, शहर अभियंता, तसेच उपायुक्त, सहा.अभियंता व विषयतज्ञ उपस्थित होते. त्यावेळी प्रदुषण कमी करणे कामी प्राप्त निधीतुन मार्गदर्शक सुचने नुसार करावयाच्या कामांबाबत चर्चा होऊन आवश्यक कामे सुनिश्चित करण्यात आली होती त्या अनुषंगाने पर्यावरण विभागामार्फत या निधीतुन करण्यात येणाऱ्या खर्चास तसेच त्यानूसार पूढील आवश्यक ती कार्यवाही करणेस व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार वाढीव खर्च झाल्यास त्यास सध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ६ :-** जळगांव शहरातील सार्व.शौचालयांच्या ५१ तटांवरील एकूण-२०४२ सिट्सपैकी वापरात नसलेल्या अनावश्यक व जिर्ण झालेल्या २६ तटावरील ६६१ सिट्स निष्काशित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**ॲड. शुचिता हाडा** :- महापौरताई प्रशासनाला मला एक सुचना करायची आहे एक की शौचालयाचा विषय आलेला आहे म्हणुन , की दंगलग्रस्त कॉलनीमध्ये ६ सार्वजनिक शौचालयाचा एक विषय आहे त्यापैकी एक की दुरावस्थेत आहे किंवा काही आहे तर ते रद्द करण्यात यावे तेवढे यात ॲड करून घेण्यात यावे. ते १० चे १० आपण जसेच्या तसे अस्तित्वात ठेवतोय पण त्यापैकी एक सिट निष्काशित करायची आहे. पण दंगलग्रस्त कॉलनीचे एक सिट

**(यावेळी मा.महापौर यांना ॲड.शुचिता हाडा यांनी एक सिट निष्कासित करणेसाठी तसेच सन्मा.सदस्या सौ.गायत्री उत्तम शिंदे यांनी शिवाजी नगर, हमालवाडा येथील सार्वजनिक शौचालय निष्कासित करण्याचा प्रस्ताव (पत्र) दिले. )**

**मा.उपमहापौर** :- दंगलग्रस्त कॉलनीतील एक शौचालय

**ॲड. शुचिता हाडा** :- माझी मागणी जी आहे जे त्या कॉलनीतील एक शौचालय आहे त्यापैकी एक

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई एक मिनिंट , याच्यामध्ये आमच्या भागातील कमीत कमी अर्ध्या म्हणजे शहराच्या मानाने २५ टक्के आमच्या भागातील आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई, ताई ताई माझा विषय सुरू झालेला आहे ना, मला एकच मिनिंट द्या बोलायला.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. कैलास सोनवणे** :- ताई, ताई मी परवानगी घेतली आहे ना.

**श्री. सदाशिव ढेकळे** :- ताई माझा सुध्दा या विषयाला

**सौ.गायत्री सोनवणे** :- माझा सुध्दा ताई या विषयामध्ये सुचना होती ६ नंबरच्या विषयामध्ये आणि मला तुम्हाला एक प्रस्ताव द्यायचा आहे. मला एक की सार्वजनिक शौचालय आहे त्याच्याबद्दल प्रस्ताव आहे हा तो देत आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई आमच्या प्रभागातील जे सार्वजनिक शौचालय आहेत. तर त्या सर्व त्या सगळया नविन बांधलेल्या आहेत. त्या चांगल्या स्थितीत आहेत त्या तुम्ही कश्या तोडणार आणि तुम्हाला जर तोडायच्या असतील त्या संडाशी तर त्या तुम्ही बांधुन ठेवल्या आहेत तर ज्या चालु स्थितीत आहेत तर त्या संडाशींची तुम्ही साफसफाई करणार तेवढ्या चालु ठेवा आणि इतर असतील त्या तोडा आणि यानंतर सुरू कराकारण काय आहे की या सगळ्या नविन संडाशी आहेत. तुम्ही पाहुन घ्या लागेल तर कारण नविन तोडणे मला काही योग्य वाटत नाहीये महापालिकेचे हित पाहता, राहीले तुमचा साफसफाईचा विषय तर आपला जेवढा विषय असेल तेवढा तुम्ही चालु ठेवा नाहीतर तुम्ही बंद करा. जवळजवळ पुर्ण वॉर्डात आमच्या ५०० संडाशी आहेत.

**श्री. सदाशिव ढेकळे** :- ताई आपण जो आता सार्वजनिक शौचालयाचा विषय आहे. जे खराब झालेले आहेत ते पाडण्याचे आपण हे करतोय. परंतू जळगांव शहरामध्ये उघडयावर शौच करणारे लोकं आहेत आणि ते तिथे जातात. तर हे पाडल्यानंतर आपण काय साधणार आहेत.

**मा.उपमहापौर** :- मा. महापौर महोदया, आयुक्त मॅडम आणि सन्मा.सभागृह म्हणजे हगणदारी मुक्त शहर या योजनेअंतर्गत वैयक्तिक शौचालयासाठी किती लोकांना अनुदान दिले गेलेले आहे आणि ज्या लोकांना अनुदान दिले गेलेले आहे. त्या सर्व लोकांनी शौचालय उभारलेले आहेत का ?

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- सन्मा.सभागृह , अगोदर जो प्रश्न विचारला होता की, शासनाने ज्यावेळेला आपल्याला स्वच्छ भारत अभियांनातर्गत जळगांव शहरामध्ये एक सर्वेक्षण झाले होते. त्यामध्ये ९७५९ कुटुबांकडे वैयक्तिक शौचालय नसल्याचे आढळुन आले होते. त्यापैकी ३४२३ कुटुंब सार्वजनिक शौचालयावर अवलंबुन होते. आज आपण २०२१ मध्ये म्हणतो आहोत. २०२१ पासुन आतापर्यंत जवळपास आठ हजार लाभार्थ्यांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. म्हणजे आपण ज्यावेळेला एकही वैयक्तिक शौचालय बांधलेले नव्हते. त्यावेळी ही परिस्थिती होती आज आपण ८ हजार शौचालय शहरात बांधलेले आहेत आणि प्रभाग निहाय वॉर्डामधील प्रत्येक एरियामध्ये शौचालयाचे बांधकाम झालेले आहे. परंतू शौचालयाची संख्या जेवढी होती २०२१ मध्ये तीच संख्या आजपण आहे. त्यामुळे वापर कमी झालेला आहे त्याठिकाणी आणि शासनाचे निर्देश आहेत की एक शौचालय किती लोकांसाठी असावं. म्हणुन आपण आपल्या शहरामध्ये सर्वेक्षण करून हे जे शौचालय तोडण्याचा आपण प्रस्ताव सादर केलेला आहे. यामध्ये जवळपास ३० आता आपण मक्तेदाराला हे काम दिलेले आहे ते १५९५ चे दिलेले आहे. परंतू २०४२ सार्वजनिक शौचालय आपल्याकडे आहेत. २०४२ शौचालय सिटस त्यापैकी जवळपास ४४७ सिटस पैकी ४१७ सिटस तर काही कामाच्याच नाहीये. कारण त्या सिटस साफसफाई करण्याच्या लायकच नाहीयेत. त्या ४१७ सिटस अधिक २१४ म्हणजे आपण संपुर्ण शहरामध्ये वॉर्डनिहाय पाहाणी केली आणि त्या ठिकाणी शौचालयाचा वापर करणाऱ्या लोकांची जी संख्या आहे. कारण नसतांना दरवर्षी स्वच्छ शौचालयाची जी टिम येते ती किमान १ कोटी रूपये आपण त्या शौचालयावर खर्च करतो आणि एक महिन्यानंतर तशीच परिस्थिती विदारक परिस्थिती झालेली असते. दुसरी गोष्ट दर महिन्याला त्याचा साफसफाईचा ठेका दिला जातो. दरमहिन्याला हा कोट्यावधी रूपयांचा पैसा आपला पाण्यात जातो आणि शासनाने आपल्याला कोट्यावधी रूपये निधी दिलेला होता. त्यापैकी भाऊंच जे उत्तर आहे त्यामध्ये आतापर्यंत आपण ९ कोटी ८७ लाख ८४ हजार एवढा निधी खर्च केलेला आहे शासनाचा तरी देखील या भागामध्ये फक्त आप्पांच्या भागातील विषय होता. त्याठिकाणी भरपुर शौचालय आहेत. त्या शौचालयांचा वापर पुरूषांचा आणि स्त्रीयांचा तो देखील आप्पासाहेब , त्याठिकाणी त्या शौचालंयाचा दिवसभरात किती वापर करतात म्हणजे किती पुरूष आले आणि किती स्त्रीया आलेल्या आहेत. याच सर्वेक्षण करून आपण तिन दिवस कंन्टीन्यु करून देतो टिम येते तेव्हा , त्यावरून आपण ठरवावं की ते शौचालय तोडणे किती गरजेचे आहे. राहीला प्रश्न दुसरा उपमहापौर साहेबांनी विचारलेला आताचे अनुदान ६

हजार प्रमाणे ५ कोटी ३६ लाख २२ हजार आपण वितरीत केलेले आहे. त्यापैकी एकुण ७५५७ लाभार्थ्यांनी बांधकाम पुर्ण केलेले आहे. त्यांना देखील ६ हजार प्रमाणे ४ कोटी ५३ लाख ४२ हजार रूपये आपण वितरीत केलेले आहे आणि सद्यस्थितीत ४०० लाभार्थ्यांच बांधकाम पुर्ण झालेले असुन त्यांच्या अनुदानाचा प्रस्ताव आपण आपल्या पोर्टलवर टाकलेला आहे. एकुण ८९३७ पैकी ९८० असे वैयक्तिक कुटुंब आहेत की ज्यांनी अजुनपर्यंत बांधकाम पुर्ण केलेल नाहीये. यासंदर्भात उपमहापौरांच्या कक्षामध्ये मागच्या आठवड्यात मिटींग झ ाली होती. या ९८० लोकांकडे त्यांनी आपला निधी जो आहे तो परत द्यावा नाहीतर आपल्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल. अशा स्वरूपाची नोटीस आपण जाहीर करतोय / देतोय त्याच काम सुरू आहे.

**मा.उपमहापौर** :- आपण जे वैयक्तिक शौचालय दिले आहेत तर ते आपण सर्वे करून दिलेले आहे का. म्हणजे सर्वे करून दिले आहे किंवा ज्यांनी मागीतले त्यांना दिले आहे म्हणजे कशा पध्दतीने केले आहे.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- आपण गेल्या चार पाच वर्षात प्रत्यक्षात सर्वे केल्यानंतर त्या ठिकाणी सर्वे केल्यानंतर त्याचा प्रस्ताव आला आणि त्याच बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्याभागातील संबंधित इंजिनियरचा पुर्णत्वाचा दाखला आल्याशिवाय आपण पैसे वितरीत केलेले नाहीत.

**मा.उपमहापौर** :- मग आता आपण सांगीतले की ८९३७ लोकांना आतापर्यंत दिले आहेत जो केंद्र शासनाकडुन आपल्याला तो निधी आला होता. त्यापैकी ६ हजार लोकांनी बांधलेले आहे. म्हणजे आपण या १९०० लोकांच्या मध्ये आपण निधी वितरीत केल्यानंतर ते शौचालय पुर्ण बांधले की नाही , ते पुर्ण झाले की नाही किंवा त्याची काय प्रोसेस चालु आहे. आपण जवळपास २०२१ पासुन हा निधी वितरीत करतोय. आज २०२३ आहे.

**मा.आयुक्त** :- फर्स्ट ईन्स्टॉलमेंट आणि सेकंड ईन्स्टॉलमेंट घेतल्यानंतर काम किती झाले अस विचारत आहेत.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- आपण ९८० जे वैयक्तिक शौचालय जे आहेत.

**मा.उपमहापौर** :- आपण ८९३७ पैकी ७ हजार काहीतरी सांगीतले ना आता

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- ७५५७ लोकांनी बांधकाम पुर्ण केलेले आहे आणि ४०० लोकांचा पुर्ण झाल्याचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे परंतू आपण ते पैसे वितरीत केलेले नाहीये. कारण ते पोर्टलवर टाकलेले आहे.

**मा.उपमहापौर** :- म्हणजे ते पुर्ण झाले आहे.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- म्हणजे असे एकुण फक्त ९८० असे कुटुंब आहेत की ज्यांनी बांधकाम पुर्ण केलेले नाहीये.

**मा.उपमहापौर** :- मग आपण या ९८० लोकांना अनुदान वितरीत केलेले आहे त्याची तारीख काय आहे.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- तारखा वेगवेगळ्या असतील आता मला एक्झट सांगता नाही येणार.

**मा.उपमहापौर** :- मला फक्त प्रशासनाच्या हेच लक्षात आणुन द्यायच आहे आयुक्त मॅडम की, याच्यामध्ये आपल्याकडे केंद्र शासनाकडुन आणि राज्य शासनाकडुन हा निधी आपल्या शहरासाठी जो निधी मिळालेला आहे. याचा योग्य उपयोग झालेला नाहीये हा कुठेतरी अपहार झालेला आहे. तर माझी महापौरांना विनंती आहे की, याची चौकशी लावावी व ज्याने याचा गैरवापर केलेला असेल किंवा संबंधित अधिकारी असेल किंवा लाभार्थी असेल या सर्वांवर फौजदारी स्वरूपात कारवाई करावी. आता ज्यांनी शौचालय बांधलेले नसतील किंवा वेळेत बांधले नसतील तर आपण त्यांच्याकडुन ती वसुली करायची आहे. राहीला दुसरा विषय आपण त्यांचा सर्वे करून वैयक्तिक शौचालय जे काही होते की ढेकळे साहेबांचा जो प्रश्न होता की आपण जे सार्वजनिक शौचालय जर तोडल्या तर लोक कुठे शौचास जातील किंवा उघड्यावर शौचास जातील. तर मला अस वाटत की त्या शौचालयांची गरजच नाहीये कारण आपल्या शासनाच्या, प्रशासनाच्या सर्वेनुसार ९ हजार लोकांना वैयक्तिक शौचालये दिलेले आहेत आणि त्याच्यापैकी ८ हजार लोकांनी जर ते पुर्ण बांधलेले आहेत. तर सार्वजनिक शौचालयांची वापर करण्याची गरजच नाहीये. दुसरा विषय असा की आता आरोग्य विभागाचे प्रमुख जे आहेत उदय पाटील यांनी सांगीतले की याच्या साफसफाई वर दरमहिन्याला ६ लक्ष रूपये खर्च केला जातो. तर आपल्या सर्वांच्या प्रभागात असलेल्या सार्वजनिक शौचालयांची साफसफाई होते आहे का ? याच्यासंदर्भामध्ये महापौरताई असतील, मी असेल किंवा सन्मा.सदस्य असतील यांनी वेळोवेळी सभागृहामध्ये सार्वजनिक शौचालयांच्या बाबतीमध्ये विविध प्रश्न उपस्थित केलेले आहेत. परंतू मी तो पत्रव्यवहार बघितला कंत्राटदाराचा त्याच्यामध्ये वेळोवेळी आणि त्याच्या मध्ये असे लिहीलेले आहे की महानगरपालिका प्रशासनानेच

आम्हाला वेळेत पाणी दिले नाही. वेळेवर जी किंवा जे पाहीजे ते दिले जात नाही किंवा जे साहीत्य पाहीजे वेळेवर ते मिळत नाही. हेच त्यांच म्हणण आहे. त्याच्यानंतर आपण त्यांना आतापर्यंत मनपा फंडामधुन दरमहिन्याला ६ लाख रूपयांची अदायगी करतो आहे आणि साफसफाई पण होत नाहीये. ते मेंन्टेंन पण होत नाहीये आणि आपण त्यांना पैसे पण देतोय.

**श्री. सदाशिव ढेकळे** :- आता लोक उघड्यावर बसतील अस म्हणण आहे तोडल्यावर अजुन तोडण्याचे बाकी आहे. त्याच्याआधी उघड्यावर बसणारे लोक , कस आहे की जे लोक

**मा.उपमहापौर** :- ढेकळे साहेब सार्वजनिक शौचालयांचा वापर किती होतो हे आपल्या सर्वांना माहिती आहे आणि आपण या सार्वजनिक शौचालयांची परिस्थिती जर तिथे जावुन बघितली तर तुम्हाला प्रत्यक्ष कळेल. तिथे एकही शौचालय असे नाहीये. एक दोन जर सोडले तर सार्वजनिक शौचालय आज रोजी कुठेच वापर दिसत नाहीये.

**श्री. सदाशिव ढेकळे** :- माझ्या प्रभागामध्ये ५२ सिटस आता एक दोन वर्षापुर्वी बांधले आहे.

**मा.उपमहापौर** :- नाही ते मेंन्टेंन असतील तर तोडणार नाही आपण

**श्री. सदाशिव ढेकळे** :- आता रेकॉर्डला तुमचे २६ दाखवता आहे. तर २६ दाखवता आहे तर आता २६ कुठे आहे ज्या २६ आहेत. त्यांचे ६ दरवाजे चोरुन नेले आहे. मी २ महिन्यांपासुन आपल्या अधिकाऱ्यांना सांगतो आहे. आधी २ गेले मग २ गेले नंतर २ गेले. हे दरवाजे चोरुन नेले हे त्याचा कमीत कमी फिडबॅक घ्या. ते म्हणतात आमची प्रोसिजर चालु आहे. आम्ही अजुन परवानगी घेतली नाही असे प्रकारचे उत्तरं मिळतात. तर त्याच काय आहे ? आज लोक तिथ संडासला बसत आहेत आणि दरवाजे तोडुन नेल्यामुळे तिथे कोणी बसत नाही आणि उघड्यावर बसतात आणि ५२ सिट बांधले २६ चेच रेकॉर्ड आहे आपल्याकडे मग कुठे पैसे दिले संडाशींचे वगैरे वगैरे, मला तिन चार वेळा सांगीतले की मी आता कंम्पलेंट देतो मग मी परत त्याची परवानगी मिळाल्यानंतर मग पुन्हा असे सांगीतले की अजुन मंजुरी मिळालेली नाही. काय आहे कंम्प्लेंट करण्यासाठी मंजुरी लागते एवढी मोठी, दोन महिने प्रोसिजर लागते त्याला अस का होत. तर त्या ठिकाणी आपण रखवाला ठेवत नाही. कमीत कमी त्यावेळेला जर फिर्याद दिली असती तर पोलीसांच्या धाकाने दुसरे कोणी गेले नसते. मग गेले जावु द्या. मग आपला जो उद्देश्य आहे की त्या शौचालयामध्ये शौचाला बसले पाहीजे. तर दरवाजे नसल्यामुळे ते लोक तिथे बसत नाही. मग ते आपले उघड्यावर बसतात आणि एकीकडे दुसरे आपण म्हणतो की निष्कासित करा आणि शासनाने इतके पैसे दिले आहे हे केले आहे. आपण शौचालय दिले आहे आणि मग ते तिथे बसतील. नाहीये वो प्रक्टिकली नाहीये.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- आपण कुठल म्हणत आहेत साहेब तांबापुरातील का

**श्री. सदाशिव ढेकळे** :- हो तांबापुरा मधील शौचालय बघा त्याचे दोन दरवाजे गेले होते. त्याच्या

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- माझ्यापर्यंत त्याचा रिपोर्ट आलेला नाही अजुनपर्यंत

**श्री. सदाशिव ढेकळे** :- येणार नाही ना , कारण काम करण्याची वृत्ती नाहीये आपल्या लोकांची

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- ढेकळे साहेब

**श्री. सदाशिव ढेकळे** :- आपल्या कर्मचारी धांडेंना विचारा, बाकीचे आहेत त्यांना विचारा, निदान ते तरी गेले असते पोलिस स्टेशनला मंजुरी नाहीये अस म्हणतात.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- ढेकळे साहेब तुम्ही एक फोन करून मला सांगीतले असते ना तर आम्ही

**श्री. सदाशिव ढेकळे** :- त्यांना विचारा ना मी बोललो की नाही, धांडे आहेत ना विचारा त्यांना

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- धांडे आहेत का

**श्री. सदाशिव ढेकळे** :- दुसरे हे आहेत विचारा ना त्यांना

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- विचारतो मी त्यांना

**श्री. सदाशिव ढेकळे** :- नाही नाही मी जर असं खोट बोलत असेल तर

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- ढेकळे साहेब आता माझ्याकडे जे विविध प्रभागातील शौचालयांचे तक्ते आलेले आहेत. तर आता तांबापुरामध्ये ज्या सिटस आहेत.

**श्री. सदाशिव ढेकळे** :- आता २६ चा आकडा कुठे आहे.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- नाही नाही तांबापुराचा तक्ता सभा संपली की आपल्याला दाखवुन देतो आणि आपली संमती असेल तर काढु आपण बर का, आपल्याला शौचालय काढण्यामध्ये काही हे नाहीये. आपण त्या त्या भागातील नगरसेवकांची लेखी संमती घेतल्याशिवाय आपण एकही शौचालय काढणार नाही. आपण त्या शौचालयांचा पुर्ण तिन दिवस सर्वे करून ते शौचालयात किती पुरुष आले किती स्त्रीया आल्यात , शासन निर्देशानुसार तिथे किती सिटस पाहीजे आहेत आणि जरी आपण सांगीतले की राहु द्या तर आपण काढणार नाही.

**श्री. सदाशिव ढेकळे** :- नाही माझा प्रश्न हा आहे की हे कधी होणार मग

**मा.आयुक्त** :- नाही महापौरताई या ज्या संस्था स्थापन झाल्या त्यानंतर स्वच्छ भारत अभियान राबविण्यात आले. तर जेव्हा स्वच्छ भारत अभियान तर तेव्हा गाईडलाईन अश्या होत्या की जेव्हा सुरूवात झाली तेव्हा सर्वे करून ईंडिव्हिजीली टॉयलेटची संख्या आपली दिसते आहे. आणि जोपर्यंत बांधुन होत नाही तोपर्यंत आपण पब्लिक टॉयलेटचा पर्याय आपण त्यांना दिलेला होता. पण आता हे आता बऱ्यापैकी ईंडिव्हिजीली टॉयलेट बांधुन झालेले आहेत. त्यामुळे आता पब्लिक टॉयलेटचा डिपेंडेंसी कमी करा हा त्यामागचा हेतू आहे आणि जे खराब आहेत तेच आपण काढणार आहोत आणि आताच उदय पाटील सरांनी सांगीतले की तुमची कोणाचीही NOC भेटल्याशिवाय ते काढणार नाही. जे घाण आहेत ते घाणच राहुन त्याची अजुन दुर्गंधी पसरते. तर तो त्या मागचा उद्देश्य आहे. तर मला अस वाटते की आपला हा जो विषय चाललेला आहे तो मान्य करावा अशी माझ ी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे.

**सौ.गायत्री शिंदे** :- महापौरताई मी आताच तुम्हाला सार्वजनिक शौचालयांचा एक प्रस्ताव दिलेला आहे. तर तो या विषयामध्ये ॲड करण्यात यावा.

**सौ.पार्वताबाई भिल** :- माझ्या वॉर्डात समता नगरमध्ये शौचालय आहेत साहेब , तिथे रोज साफसफाई होत नाही आणि हरिविठ्ठल नगरमध्ये शौचालय करणे गरजेचे आहे. जस आता आपण सांगीतले की आवास योजनेमध्ये संडाशी बांधलेल्या आहेत. ज्या भागामध्ये शौचालय आहेत त्याभागामध्ये पाणी जात नाही तर त्या भागामध्ये त्याला कुलुप लावुन ठेवलेले आहे. तर त्या संडाशींमध्ये वापर करत आहेत लोक , ज्या भागामध्ये शौचालय आहे त्या भागामध्ये पाणी जायला बिल्कुल जागा नाहीये. त्याच्या साठी त्या संडाशींना कुलुप लावुन ठेवलेले आहे.

**श्री.उदय पाटील,सहा.आयुक्त (आरोग्य)** :- आता आपल्या जळगांव शहरातील जेवढे सार्वजनिक शौचालये आहेत. त्यांच काम समाधानकारक आहे किंवा नाहीये. याच सर्वे करून ते काम समाधानकारक आहे किंवा नाही याचे मुल्यमापन करूनच आपण त्यानंतरच याला कन्टिन्यु करत असतो. आता काय झाले आहे की ठेका देतांना त्याठिकाणचे पाणी नक्की पुरवायचे आहे जंतुनाशके आपण पुरवायचे आहे आणि त्याची दोन वेळा स्वच्छता करायची आहे. आता विषय असा आहे की बऱ्याच ठिकाणच्या बोरींग बंद आहेत आणि बऱ्याच ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाहीये आणि एक टँकर आपल पुर्ण गावभर फिरत आणि जे आपण त्याला दिलेले आहे. परंतू त्या टँकरचा फायदा आपल्या त्या मक्तेदाराला होतो आणि मक्तेदार ते कारणे सांगुन ते सांगतो की या बाबी निर्माण झाल्या आहेत. परंतू मी सभागृहाला अवगत करू ईच्छितो की या बरोबर शौचालयांच्या ज्या ज्या त्रुट्या आहेत. त्या या तिन चार दिवसांमध्ये पुर्तता करून काही ठिकाणी ज्या मुख्य सुविधा ज्या आहेत म्हणजे पाणी जर २४ तास उपलब्ध असले तरच शौचालय राहतील. पाणी एकदा टँकरने पाणी भरून देवु आणि ते डब्याने पाणी भरतील.

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौरताई हा विषय मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. परंतू सन्मा.सदस्या सौ. गायत्रीताई शिंदे यांच्या लेखी मागणीनुसार शिवाजी नगरमधील हमाल वाडा येथील २० सिटस व शुचितातार्इ हाडा यांच्या मागणी प्रमाणे दंगलग्रस्त कॉलनी येथील १ सिट निष्कासित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- महापौरताई व्यक्तिगत पाहणी करून ते निष्कासित करण्यात यावे.

**मा.आयुक्त** :- आपलीही NOC घेण्यात येईल.

**मा.महापौर** :- नगरसेवकांचीही NOC लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- हो , पण अधिकाऱ्यांनीही पाहणी करावी.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ७ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत हगणदारी मुक्त शहर करणेसाठी वैयक्तीक शौचालय बांधकाम करणेसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला होता. त्यानुसार जणगणना २०११ च्या अहवालानुसार जळगांव शहर मनपा हद्दीत एकूण ९९२२ कुटुंबांकडे वैयक्तीक शौचालय नसल्याचे आढळून आले. तसेच जशमनपाने दि.३०/०९/२०१५ रोजी केलेल्या सर्वेक्षणानुसार एकुण ९७५९ कुटूंबांकडे वैयक्तीक शौचालय नसल्याचे आढळून आले. त्यापैकी ३४२३ कुटूंबे सार्व.शौचालयांवर अवलंबुन होती.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एकूण ८००० लाभार्थींनी वैयक्तीक शौचालयाचे (IHHL) बांधकाम पुर्ण केलेले आहे. त्यानुसार सार्व.शौचालयांचा वापर करणाऱ्या कुटूंबांची संख्येत घट झालेली आहे. त्याअनुषंगाने जा.क्र./जशमनपा/आ.वि./६७८/२०२२-२३ दि.२२/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये जळगांव महानगरपालिकेच्या सार्व. शौचालयाच्या वापरात नसलेल्या अनावश्यक सिट्स निष्काशीत करणे बाबतचा अहवाल सर्व स्वच्छता निरीक्षक व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचेकडुन मागविण्यात आलेला होता.

प्रभाग समिती क्रं.०१ ते ४ मधील वार्ड निहाय कॉंझरवंशी इन्स्पेक्टर, आरोग्य निरिक्षक/ युनिट प्रमुख व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेल्या रिपोर्टनुसार सार्व.शौचालयांच्या ५१ तटांवरील एकुण-२०४२ सिट्स पैकी वापरात नसलेल्या अनावश्यक व जिर्ण झालेल्या २६ तटावरील ६६१ सिट्स निष्काशित करणे कामी खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

सदर वापरात नसलेल्या जिर्ण व खराब सिट्समुळे स्वच्छतेवर व देखभालीवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे सदर सिट्स निष्काशित करणे कामी संबंधीत भागातील सन्मा.नगरसेवक यांनी देखील लेखी स्वरुपात सहमती दिलेली आहे.

त्यानुसार प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावातील यादीमधील जळगांव शहरातील सार्व.शौचालयांच्या ५१ तटांवरील एकूण-२०४२ सिट्सपैकी वापरात नसलेल्या अनावश्यक व जिर्ण झालेल्या २६ तटावरील ६६१ सिट्स निष्काशित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांचे प्रस्तावानूसार प्रभाग क्रं.६ दंगलग्रस्त कॉलनी मधील श्री.नाजीम शेख यांचे घरासमोर असलेल्या मनपा सार्वजनिक शौचालयातील १० पैकी वापरात नसलेले १ शौचालय सिट्स तसेच सन्मा.सदस्या, सौ.गायत्री उत्तम शिंदे यांचे प्रस्तावानूसार प्रभाग क्रं.२ मधील शिवाजी नगर हमालवाडा येथील २० सार्वजनिक शौचालय निष्कासित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक शौचालयातील वरील सिट्स निष्कासित करण्यापूर्वी प्रशासनाने संबंधीत प्रभागातील सन्मानीय महानगरपालिका सदस्यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुनच पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ७ :-** मे.औदयोगिक न्यायालय तक्रार यु.एल.पी.नं.१०/२०१८ म.न.पा. कामगार युनियन विरुध्द म.न.पा. जळगांव निर्णया विरुध्द मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद वरीष्ठ विधी तज्ञ यांची नेमणूक करणे व त्यांना अदा करावयाची फी तसेच इतर अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि विधी तज्ञांचे नियुक्त करण्याचे अधिकार जे आहेत ना ते मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. कारण काय होत की काही वेळेला आपले अत्यंत महत्वाचे असे मॅटर्स असतात आणि मग आपली महासभा झालेली असते. मुलेपंकडे गेल्यावर ते म्हणतात की वकीलांच पत्र मागवाव की ते काय फी चार्ज करतील. जे ज्येष्ठ विधीतज्ञ असतात. ते अशा पध्दतीने पत्र वगैरे देत नाहीत आणि काही मॅटर्समध्ये अर्जन्सी असते की आता जसे ब्रम्हे साहेब आहेत. आता ब्रम्हे साहेबांना आपण काही मॅटरमध्ये त्यांना चार चार / पाच पाच लाख रूपये फी अदा करतोय. कारण काय आहे आता कस आहे की काही मटर्समध्ये १५/१५ , २०/२० कोटी रूपयांचे आपले हे न्यायालयीन जे मॅटर आहे

ते ४६ कोटी रूपयांची खालच्या कोर्टाने डिक्री केलेली होती. त्याला स्टे मिळवण अत्यंत गरजेचे होत. त्याला स्टे मिळाला नसता तर मनपा प्रशासनाच्या आयुक्तांची खुर्ची ही जप्त झाली असती. तर अशा पध्दतीने ज्यावेळेला मोठ्या रकमेचे मॅटर्स येतात आणि त्यावेळेला जो विलंब होतो. तो विलंब टाळण्याच्या दृष्टीकोनातुन मा.आयुक्तांना फी ठरविण्याच्या संदर्भातील अधिकार त्यांना देण्यात यावे आणि त्यांना प्राधिकृत करण्यात यावे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे आणि या विषयात सन्मा.सदस्य नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनांच प्रशासनाने पालन कराव / प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा.कामगार युनियन जळगांव यांनी जळगांव म.न.पा. विरुध्द रेफरन्स आय टी.नं.१/०७ दाखल केली होती. सदर रेफरन्स मधील ६४५ सफाई कामगारांना मे.कोर्टाने कायम करुन त्यांना कर्मचाऱ्यांप्रमाणे फायदे देण्याचे आदेश मे.औदयोगिक न्यायालयाने केले होते. सदर हुकूमाविरुध्द जशमनपाने ना.हायकोर्ट औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल केलेले आहे.

परंतू त्या रिट पिटीशन मध्ये अदयाप पावेतो कोणतेही आदेश अथवा स्थगिती नसलेने तक्रारदार युनियन यांनी मे.औदयागिक न्यायालयात सदरच्या हुकुमाची अंमलबजावणी करावी व रक्कम मे.कोर्टात जमा करावी असा अंतरीम अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज मे.कोर्टाने अंशत: मंजूर केलेला आहे व म.न.पा.ला रु.४८ कोटी (अर्धी रक्कम) दोन महिन्यात मे.कोर्टात जमा करण्याचे आदेश पारीत केले आहे. सदर प्रकरणी तातडीने पुढील कार्यवाही करणे तसेच ताबडतोब वरीष्ठ न्यायालयात दाद मागणे बाबत अॅड.आनंदा रा. सरोदे विधी सल्लागार म.न.पा.जळगांव यांनी विनंती केली आहे.

त्यानुसार सदर प्रकरणी मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे खटला चालविणेकामी ज्येष्ठ विधी तज्ञ यांची नेमणूक करणेस व त्यांना अदा करावयाची फी तसेच इतर अनुषंगीक खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकरणी व यापूढे येणाऱ्या महत्वाच्या न्यायालयीन प्रकरणातील विलंब टाळण्यासाठी आणि वेळेत मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे खटला चालविणेकामी ज्येष्ठ विधी तज्ञ यांची फी ठरविणेस व नियुक्ती करणेस आयुक्त,महानगरपालिका,जळगांव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ८ :-** गिरणा पाणी पुरवठा अंतर्गत गिरणा पंपींग, जलशुध्दीकरण कैंद्र (सावखेडा), दापोरा पंपींग व उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथील स्थापत्य व यांत्रिकी उपयोगात नसलेली कालबाह्य व स्क्रॅप झालेल्या साहित्याचा निविदा प्रक्रियेव्दारे लिलाव करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, गिरणा पाणी पुरवठा अंतर्गत गिरणा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा) व दापोरा पंपींग येथून शहरास पाणी पुरवठा केला जात होता. सन २००९ पासून वाघुर पाणी पुरवठा योजना सुरळीत झाल्याने तसेच गिरणा पाणी पुरवठा योजनेत गिरणा नदीवरुन पाणी साठा आरक्षण शासनाने बंद केल्यामुळे सदर योजना बंद आहे. सदर योजनेवरुन पाणी पुरवठा बंद जरी असला तरी तेथील मनपा इमारती, मशिनरी, गोडावून इ.मालमत्तेचे देखभाल करणे कामी मनपाचे कायम कर्मचारी नेमण्यात आले आहेत. गिरणा पंपींग, सावखेडा पंपींग येथिल मशिनरी व जागेचे संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेकामी पत्र क्रं.२९१ दि.१८/०१/२०१९ अन्वये प्रस्ताव महासभेपुढे पाठविण्यांत आलेला होता. त्या प्रस्तावाची प्रत सोबत जोडलेली

आहे. तथापि या प्रस्तावानुसार सदयस्थितीत असलेली मशिनरी कॉलेजचे विदयार्थ्यांना पाहणे करीता ठेवणे व या जागेचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करणे बाबत महासभा ठराव क्रं.८६ दि.२१/०२/२०१९ अन्वये धोरण मंजूर झालेले आहे. जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडील पत्र क्रं.१५०४ दि.०१/०७/२०१९ अन्वये गिरणा पंपींग येथे पर्यटन स्थळ विकसीत करणेबाबत अंदाजपत्रक सादर करणे कामी सुचना प्राप्त आहेत. गिरणा पंपींग येथील जागेचे सातबारा उताऱ्यावर गिरणा वॉटर वर्क्स नांव आहे. सावखेडा जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेच्या उताऱ्यावर परिसर अभियांत्रिकी विभागाचे नांव असून दापोरा पंपींग येथील जागा ही कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी विभाग यांचे नांव ७/१२ चे उताऱ्यावर आहे. या संदर्भात या पुर्वीचे प्रस्तावाचे अवलोकन करुन जागेबाबत व निकामी स्क्रॅप मशिनरी साहित्याबाबत धोरणात्मक निर्णय होणे कामी प्रस्तावानुसार मा.महासभा ठराव क्रं.२१६ दि.१५/०१/२०१९ अन्वये निकामी मशिनरीचा निविदेव्दारे लिलाव प्रक्रिया करणेस मान्यता प्रदान केलेली आहे.

वाघुर योजने अंतर्गत असलेल्या उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथे अमृत योजनेच्या निधीतून नुतनीकरणाचे काम सुरु असुन तेथील निघालेले जुने साहित्य उदा.व्हॉल्स, मोटर्स, कॉम्प्रेसर इत्यादी साहित्याची देखील लिलाव प्रक्रिया करणे आदेशित आहे. तसेच शहर अभियंता यांनी सुचित केले नुसार सदर कामी मनपास प्राप्त होणारी रक्कम बाजारभावानुसार रु.३१,६२,७९०/- मात्र इतकी आहे. सदर ठिकाणावरील स्थापत्य व यांत्रिकी साहित्य उपयोगात नसलेली कालबाह्य व स्क्रॅप झालेल्या साहित्याचा व उक्त ठरावानुसार निकामी साहित्याचा बाजारभावानुसार विक्री करणेकामी निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ९ :-** जळगांव शहर महानगरपालिका, हद्दीत प्रभाग क्रं.०४ विठ्ठलपेठ, मुंजोबा मंदिर (पांझरापोळ) ते महाकाली अॅग्रो एजन्सी पर्यंतचा रस्ता कॉक्रीटींग करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री. किशोर बाविस्कर** :- महापौरताई, सन्मा.सभागृह प्रशासनाने जो प्रस्ताव दिला आहे त्या प्रस्तावाला धरून जी निविदा प्रक्रीया काढणार आहे. त्या निविदा प्रकीयेमध्ये माझ्या प्रभाग क्रं. २ मध्ये कालंका माता मदिंरापासुन ते सदगुरू किराणा पर्यंतचा रस्ता व उज्ज्वल चौक ते भागवतभाऊ सोनवणे यांच्या घरापर्यंत व प्रशांत चौक चौकापर्यंत रस्ता कॉक्रींटीकरण करणे सदर अतिरीक्त खर्च हा मनपा निधीतुन करण्यात यावा व त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

**(यावेळी मा.महापौर यांना सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी प्रभाग क्र.२ मधील एक काम विषय क्र.०९ मध्ये समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव (पत्र) दिले. )**

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई , किशोर भाऊंनी जे आता मांडले तर प्रशासनाचा विषय आपण मान्य करतोय. परंतू मी तुम्हाला बोललो होतो की ३ कोटीचा जो निधी आहे. तो आमचा कमीत कमी दिड कोटी मनपा फंड निधी मंजुर केलेला आहे. तसे रस्ते तुम्ही केव्हाही तिथे येवुन पाहणी करा. तुम्ही वाटल्यास तिथे येवुन पाहणी करा.

**मा.आयुक्त** :- चेक करून घेते.

**श्री. कैलास सोनवणे** :- हो, दिड कोटी तुम्ही मनपा फंडाचे त्याच्यात जोडायला पाहीजे. आम्ही तुम्हाला ईस्टिमेट देतोय ना

**श्री. किशोर बाविस्कर** :- महापौरताई याला मान्यता द्यावी.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. त्यात सन्मा.सदस्य किशोरभाऊ बाविस्कर यांनी मांडलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि त्यांनी सुचविलेल्या कामांचे त्यामध्ये ईक्लियुड करावीत / समाविष्ट करावीत.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका, हद्दीत प्रभाग क्रं.०४ विठ्ठलपेठ, मुंजोबा मंदिर (पांझरापोळ) ते महाकाली अॅग्रो एजन्सी पर्यंतचा रस्ता कॉक्रीटींग करणे या कामाचे जिल्हादरसुचि सन २०२२-२३ अन्वये रक्कम रु.७८,४२,१२६/- मात्रचे तयार करण्यांत आले असुन सदर परीसरातील जुना रस्ता अमृतयोजना व अंडरग्राऊंड ड्रेनेजमुळे पुर्ण खराब झालेला असुन नविन रस्ता तयार करणे आवश्यक असल्याने मनपा निधी अंतर्गत सदरचे काम प्रस्तावीत करण्यात आलेले होते. मात्र याच रस्त्याच्या काही भागाकरीता कॉंक्रीटीकरणाच्या कामसाठी रक्कम रु.९,९०,०००/- मात्रचे मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत मा.आमदार श्री.सुरेश (राजुमामा) दामु भोळे यांनी त्यांच्या निधी देण्याबाबत दि.०६/०२/२०२३ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती जळगांव यांना पत्रान्वये कळविले असुन एकुण प्रस्ताव रक्कम रु.७८,४२,१२६/- मात्र रक्कमेपैकी रक्कम रु.९,९०,०००/- मात्र आमदार निधीतुन प्राप्त करणे कामी आवश्यक कार्यवाही करणेस व सदर रक्कम रु.९,९०,०००/- मात्र वगळुन या कामासाठी उर्वरीत रक्कम रु.६८,५२,१२६/- मात्र मनपा निधीतुन मनपा अर्थसंकल्प सन २०२२-२३ या मधिल नविन रस्ते या लेखाशिर्षाअंतर्गत खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या प्रस्तावानूसार प्रभाग क्रं.२ मध्ये कालंका माता मंदीरा पासुन ते सदगुरु किराणा पर्यंत व उज्वल चौक श्री.भागवत सोनवणे यांचे घरापासुन ते प्रशांत चौक पर्यंत रस्ता क्रॉंक्रीटीकरण व डांबरीकरण मनपा निधी अंतर्गत अर्थ संकल्प सन २०२२-२३ मधील नविन रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री. नितीन बरडे** :- महापौरताई , आमच्याकडे तर काही काम नाहीत तुमच्याकडे जोडण्याला पण त्या पडलेल्या पुलाला तुम्ही पाच दहा लाख रूपये तरी द्या. तुम्ही पाहीला आहे तिथे लोकांना रस्ता नाहीये येण्या जाण्याला नंदनवन कॉलनीतील , फाईल तुमच्याकडे आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल** :- महापौर महोदया, विषय क्रं.८

**श्री. अनंत जोशी** :- महापौरताई आम्हाला दिड दोन कोटी नको फक्त दहा दहा लाख द्या.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. नितीन लढ्ढा** :- महापौरताई याच्यामध्ये आमची एक सुचना होती की आमच्या प्रभागासाठी ईस्टॅबलिशमेंट मधुन सुखसुविधांसाठी दोन कोटी निधी मंजुर झालेला आहे. दोन कोटींची काम जी आहेत ती ललीतभाऊंच्या वॉर्डातील आहे आणि ८० लाख रूपयांचे जिल्हा परिषद पासुन ते भुसारी वकीलांच्या चौकापर्यंतचा रस्ता, त्यावेळेला प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेसाठी विभागीय आयुक्तांकडे २५ टक्के निधीचे रस्ते मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले होते सोबत परंतू त्यांनी ते प्रस्तावित केलेले मनपा निधीचे काम अमान्य केली. त्यामुळे ती काम मनपा निधीतुन करण्याच्या संदर्भात एक स्वतंत्र ठराव घेणे क्रमप्राप्त आहे. तर तशा पध्दतीच प्रशासनाने म्हणजे सोनगिरे साहेब प्रस्ताव देतील आपल्याला तो याच्यासोबत अॅडीशन करून घ्यायचा.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता कोणते नविन तुम्ही अॅड करायला लावत आहेत.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नविन नाहीये. आपण यापुर्वी पाठविलेले होते अॅडीशन करून पण काय झाल

**श्री. कैलास सोनवणे** :- मग नविन नाहीये तर

**श्री. नितीन लढ्ढा** :- विभागीय आयुक्तांनी मान्य केलेले नाहीत.

**श्री. कैलास सोनवणे** :- मान्य केलेले नाहीत बरोबर आहे. का केले नाही त्याचे कारण पण सांगतो मी तुम्हाला , महापौरताई आता हा जो आपला विषय आहे किती ९ नंबरचा आहे का हा

**मा.महापौर** :- ९ नंबर आहे

**श्री. कैलास सोनवणे** :- हा ९ नंबरचा विषय असाचा असा सर्वानुमते मंजुर करा आणि राहीला आमचा जो विषय आहे तर तो निधी आल्यानंतर म्हणजे आमचा भाग / परिसर आहे तो , तर ३ कोटी जे आहेत तर आमच म्हणण आहे की शासकीय निधीला मनपा फंड जोडता येत असेल तर त्याठिकाणी मनपा फंडाचे काम व्हावे. म्हणजे कारण की ते गरजेचे आहेत कारण ते रस्ते पाहा तुम्ही या आणि तुम्ही येणारच आहे साईट व्हिजीटला तिथे तर ते पाहुन आपण करू.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- याबाबतीत मी सभागृहाला थोडीशी माहिती देवु ईच्छितो की, आता भाऊंनी जे सभागृहाला सांगीतले की २.८० लाखाचा जो प्रस्ताव मंजुर झाला आहे तर त्याच्यासोबत आपण मनपा निधीच्या १०० टक्के कामांचे २५ टक्के मनपा निधीचे म्हणजे समजा आता कस २.८० मध्ये २५ टक्के मनपाचा निधी आहे आणि ७५ टक्के शासनाचा निधी आहे असा तो जिआर आहे. तर त्याच्या अनुषंगाने ७० लाख रूपये आपल्याला त्याच्यात टाकायचे आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- हा निधी जो आहे त्यात का

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- नाही ७० लाखांचा जो निधी आहे त्याचा ठराव असा झालेला आहे की आपण २.८० मध्ये जी कामांची यादी आपण दिली होती आणि ते त्याची रक्कम मिळुन जी काम आपण २.८० ची काम आपण मनपा निधीमध्ये टाकलेली होती आणि प्लस २५ लाख म्हणजे आपण २५ लाख आपण देणार आहे आणि २.६६ शासन देणार आहे. म्हणुन आपण २.८० चा ठराव आपण केलेला होता. म्हणजे २.८० प्लस ७० असा तो ठराव होता. तर भाऊंनी आता जे सभागृहाला सांगीतले तर तो ठराव आपण असा एकत्रितरित्या केलेला होता. तर तसा विषय असा झाला की २.८० ची जी काम आहेत ती आपण ७० टक्के वगळुन म्हणजे ३० टक्के आपले असे शासन देणार आहे आणि २५ टक्के आपल्यालास दाखवावे लागणार आहे. म्हणजे आपल्याला त्याच्यामध्ये ७० लाख रूपये आपल्याला टाकायचे आहेत.

**श्री. कैलास सोनवणे** :- बरोबर आहे ना मग

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- तसा

**श्री. कैलास सोनवणे** :- हा झाला तुम्ही सांगीतलेला विषय बरोबर आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- नाही नाही आप्पासाहेब तुम्ही जे

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही नाही साहेब यांनी सांगीतलेल्या कामांचा निधी वेगळा आलेला आहे. तर त्याच्यामध्ये त्याची मंजुरी होवुनच आलेली आहे. तर आपण करतोय ते.

**मा.महापौर** :- आप्पासाहेब ते समोर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- नाही नाही भाऊंचा आपला मागचा ठराव झालेला आहे. त्या ठरावामध्ये आपण

**मा.आयुक्त** :- नाही नाही सोगगिरे साहेब विषय कसा आहे की समजा आता २.८० मध्ये आपला जो फंड होता १० टक्क्यांची काम करणार होते MC फंडामध्ये बरोबर आहे आणि त्या जिआरमध्ये असे होते की २.८० शासन देणार आणि आपण काय केले की २.८० ची शासनाच्या निधीची नांव दिली की १०० टक्के हा निधी तुम्ही देणार आणि १० टक्के आपले.परंतू प्रमाण दाखवतांना असे टाकले की प्रत्येक कामाला ७५ - २५ लावा त्यामुळे जी ७० लाख रूपये द्यायचे आहेत. तिच काम आहेत फक्त त्याचा पॅटर्न चेंज होतोय म्हणजे शासनाचा अस सांगत आहेत ते कामांची नांव चेंज होत नाहीयेत

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- कामांची नांव चेंज होत नाही आणि दुसरा मुद्दा असा आहे की त्या ठरावामध्ये जी आपण वेगवेगळी काम टाकलेली होती.

**मा.आयुक्त** :- त्यांच म्हणण अस आहे की आता नको घेवुयात सेप्रेट प्रस्ताव पुढच्या मिटींगमध्ये घेवु आता नको.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही नाही पुढच्या मिटींगमध्ये नको.

**श्री. नितीन लढ्ढा**:- आप्पासाहेब मी काय म्हणतो.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आपण या कामांचे टेंडर पब्लिश करायचे थांबवले का थांबवले की सुधारीत ठराव आला नाही. परंतू आपण त्याच्यामध्ये काही नांव बदल केले नाही.

**श्री. कैलास सोनवणे** :- ठिक आहे ना

**मा.उपमहापौर** :- आप्पासाहेब नितीनभाऊ जो विषय सांगत आहेत तो विषय एकदमच वेगळा आहे. तो या तुमच्या विषयाशी काही सबंध नाहीये. फक्त काय आहे की बांधकाम विभागाशी संबंधित असल्याच्या कारणामुळे तो याच्यामध्ये ईक्लियुड करून घेत आहेत.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- बरोबर आहे.

**मा.उपमहापौर** :- विषय नाहीये निधीचा.

**श्री. नितीन लढ्ढा**:- हो ना मग टेंडर ला वेळ लागणार नाही.

**मा.उपमहापौर** :- टेंडरला वेळ वाया नाही जाणार आपला

**मा.आयुक्त** :- गोराणेसाहेब ॲड करणार आहेत की सेप्रेट पाहीजे आहेत तुम्हाला

**मा.उपमहापौर** :- नाही आपण

**नगरसचिव** :- हा विषय जो आहे.

**मा.उपमहापौर** :- नाही आपण हा विषय आयत्यावेळेचा थोडी घेतोय. ऑलरेडी मान्यता मिळालेली आहे याला शासनाकडुन

**(सभागृहामध्ये व्यासपिठावर मा.महापौर,मा.उपमहापौर,मा.आयुक्त तसेच नगरसचिव आपआपसांत तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. ईब्राहीम पटेल** :- महापौर महोदया, विषय क्रं.८ वर बोलायचे आहे.

**नगरसचिव** :- विषय क्रं. ८ हा मंजुर झालेला आहे आणि विषय क्रं. ९ हा मंजुर झालेला आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल** :- विषय क्रं.९ जो आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १० घेण्यात यावा.

**नगरसचिव :- विषय क्रं. १० :-**

**श्री. ईब्राहीम पटेल** :- महापौर महोदया, विषय क्रं.८ वर बोलायचे आहे.

**मा.महापौर** :- नाही ना पण विषय चालु असतांना तुम्ही सुचना मांडायला पाहीजे होती. आता नाही करू शकत.

**मा.उपमहापौर** :- चला घ्या १० नंबरचा विषय घ्या. ईबाभाऊ आपण महासभा झाल्यानंतर चर्चा करून घ्या.

**नगरसचिव विषय क्रं. १० :-**

**श्री. ईब्राहीम पटेल** :- गोराणेसाहेब

**श्री. कैलास सोनवणे** :- अहो ईबाभाई

**मा.महापौर** :- ईबाभाऊ आपण बसुन घ्या कारण विषय क्रं. ८ झालेला आहे.

**नगरसचिव :-** सन्मा.सभागृह, मा.महापौर महोदया यांच्या निर्देशानुसार मी बोलतोय की सन्मा.सभागृहाला विनंती आहे की एकदा विषय मंजुर झाल्यानंतर आणि पुढचा विषय सुरू झाल्यानंतर त्या मागच्या विषयासंदर्भात चर्चा करू नये ही माझी विनंती आहे. त्या गोष्टी नियमबाह्य होतील. ज्यावेळेस तो विषय सुरू असेल त्यावेळेस आपले म्हणणे मा.पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने आपण मांडु शकतात. परंतू एकदा विषय मंजुर झाला तर त्यानंतर मात्र आपण त्याच्यावर बोलु नये ही विनंती.

**नगरसचिव विषय क्रं. १० :-** अमृत अभियान अंतर्गत जळगांव मल:निस्सारण योजना येथे विदयुत पुरवठा उपलब्ध करणेसाठी उच्च दाब विदयुत लाईनची उभारणी करणेकामी प्राप्त निविदा दरास व अतिरिक्त खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई मला बोलायचे आहे.अमृतचा विषय आहे.

**मा.**उपमहापौर :- बोला ना, बोला.

**श्री. नितीन लढ्ढा** :- सुरेशभाऊ लाईटच्या संदर्भातला विषय आहे का ?

**श्री.सुरेश सोनवणे :-** हो भाऊ पाण्याच्या आणि लाईटचा विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाण्याचे पण आहे लाईटचे पण आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई ज्यावेळेस आपले पिंप्राळा घरकुल हा प्रकल्प बांधण्यात आलेला होता व शिवाजी नगरचे जे आपले ५ वॉर्ड आहेत ते तर हा जो आपला विषय आहे नळ कनेक्शनचा, तर ज्यावेळेस हे घरकुल तयार झाले होते. त्यावेळेस नळ कनेक्शन त्यांना देण्यात आले होते.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौर ताई

**मा.महापौर** :- बोला सुरेशभाऊ बोला.

**श्री.सुरेश सोनवणे :-** ज्यावेळेस घरकुल तयार झाले जसे गेंदालाल मिल परिसर आहे, ख्वॉजानगरी आहे. त्यावेळेस त्यांना घरकुल पुर्ण केल्यानंतर त्या रहिवाश्यांना नळ कनेक्शन पण देण्यात आलेले होते. दुसरा विषय असा आहे की त्या लोकांना ज्यावेळी शौचालय देण्यात आले त्या शौचालयाचे आऊटलेट आणि त्यांचे सेप्टीक टँक नाही आणि त्यामुळे ते लोक आज पण उघड्यावर संडास करायला जातात. त्यावेळेस आपण जे विद्युत खांब बसविले तर ते खांब अक्षरश: सडुन गेले आहे. मी मागच्या मिटींगमध्येच नाही तर मागच्या आपल्या जेवढ्याही मिटींगा झाल्या त्या सर्वांमध्ये हाच विषय बोलतो आहे की तिथे आज पाच ते सहा लोक , लहान मुल वारले आहे. ते खांब सडुन गेले आहे. तर हुडकोमधील ख्वॉजनगरी आणि गेंदालाल मिलच्या विषयात काहीतरी धोरणात्मक निर्णय घ्यावा. आता निधीमधुन दोन कोटींचे काम मंजुर झालेले आहेत पिंप्राळा घरकुलला , आता पुढच्या महिन्यामध्ये चालु होतील. पण अमृत कनेक्शनमुळे ते काम थांबलेले आहेत. १० मिटींगा झाल्या मॅडम मी हाच विषय लावलेला आहे. अजुनही हा विषय मार्गी लागत नाहीये. ज्यावेळेस ते खांब खाली पडतील त्यावेळेस १०/५ लोक मरतील तेव्हा हे काम होईल का केव्हा होणार आहे. ५ मुल मेलेले आहेत मॅडम तिथे

**मा.आयुक्त** :- सर आपण जे काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ते आपल्याला फायनल करायचे आहेत. आपण दरवर्षी तो रेट डिस्कस करतो पुन्हा तो रेट वाढतो त्यामुळे आता तर माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की आपण सर्व नागरीकांना विनंती करावी कारण की आपल्यालाही काही ऑडीट प्रॉब्लेम आहे. त्यामुळे जितका मॅक्सिमम कमी करता येईल स्लम एरियाला तितका आपण कमी करू. त्याला कन्व्हेंस करू तरच आपला नळ कनेक्शनचा मुद्दा मार्गी निघेल आणि दुसरे आपण सांगताहेत की पोल अजिर्ण झालेले आहेत. तर ते मी तपासुन पाहाते आधी की घरकुलच्या काय अटी-शर्ती होत्या आणि आपले मेंन्टेंनन्स किती दिवस होते ते मी तपासुन सांगेन कारण मी ते वाचलेले नाही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मग त्यांना आपण नळ कनेक्शन दिलेले आहेत ना मॅडम आपण

**मा.आयुक्त** :- हो ना मी सांगीतले ना सर आपण बसुन रेट फायनल करू. आपण त्याचे दोनदा रेट फायनल केले आपण अगोदर जे सांगिते तर म्हणे हे नको, दुसरे सांगितले तर म्हणे आम्हाला मागचे मान्य आहे. तर आम्ही जो आकडा देतो ना पुर्ण ऑडीट वगैरे तपासुन तो फिक्स करून आपण त्यांना कन्व्हेंस करू की तुम्ही इतके भरा म्हणुन आणि याच्या खाली आपल्याला जाता येत नाही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** तिनच महिने बाकी आहे मॅडम आता निवडणुकीला.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- सुरेशभाऊ प्रशासनाशी संबंधित विषय आहे तो

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कुलभुषणभाऊ ज्या लोकांना तुम्ही ताबा पावत्या दिलेल्या आहेत त्याच लोकांना तुम्ही नळ कनेक्शन देणार, जे लोक तिथे राहत नाहीत ज्यांच्याकडे ताबा पावत्या नाहीत त्यांचे कसे काय करणार तुम्ही

**मा.आयुक्त** :- सर आपला त्यावेळेस हस्तांतरणाचा ठराव झाला होता.

**मा.उपमहापौर** :- नवनाथभाऊ मागच्या मिटींगलाच झालेला आहे हा विषय

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्याच्यावर काही निर्णय झाला आहे का ? नाही तो सन २०००, १९९९ चा ठराव होता कॅन्सल केला आहे तो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपण रु.११०० घेऊन त्यांना नळ कनेक्शन देणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ११०० होते ते आता १८०० केले. नळ कनेक्शन कोणाला देणार कोणाच्या नावाने देणार

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता विषय क्र.१० मंजुर करा.

**मा.महापौर :-** त्याची सेपरेट मिटींग घ्यावी लागेल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जर कोणाची थकबाकी आहे आणि त्यानी भरली.

**मा.आयुक्त :-** विषय वेगळा आहे, दुसरं घ्या.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत जळगांव मल:निस्सारण योजनेस शासन निर्णय क्र.अमृत २०१८/प्र.क्र.१२८/नवि-३३ दिनांक १२/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या अंतर्गतची मल:निस्सारण योजने अंतर्गत पंपींग मशिनरी करीता विदयुत पुरवठा उपलब्ध

करणेकामी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडे पत्र व्यवहार करुन व विज वितरण कंपनीकडून १.३% सुपरव्हीजन योजने अंतर्गत रक्कम रु.१,५७,०६,४२६/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे.

सदर अंदाजपत्रकीय कामाची निविदा प्रक्रिया करणेकामी निविदा नमुना तयार करणेकरीता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,जळगांव यांचे कडेस शहर अभियंता,मनपा जळगांव यांचे कडील पत्र जा.क्रं./पापुवि/१०४/ दि.२७/०७/२०२१ नुसार पाठविण्यांत आले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,जळगांव यांचे कडील पत्र क्रं./लेखा/अमृत/जळगांव/यांत्रिकी/२२४०/२०२१ दि.२३/०९/२०२१ नुसार अमृत अभियाना अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या मल:निस्सारण योजनेतील ४८ द.ल.लि.क्षमतेच्या मल:निस्सारण प्रकल्प केंद्राच्या ठिकाणी विदयुत पुरवठा उपलब्ध करणेसाठी आवश्यक विदयुत लाईनची उभारणी करणे या कामाच्या प्रारुप निविदा प्रपत्रे रक्कम रु.१,३१,७३,९८८/- (GST व्यतिरिक्त) इतक्या रक्कमेस प्रारुप निविदा प्रपत्रांना मान्यता प्राप्त झालेली आहे.

कामानिहाय येणारा एकूण खर्च रु.१,३१,७३,९८८/- + १८ % GST रक्कम रु.२३,७१,३१८/- असे एकत्रित रु.१,५५,४५,३०६/- मात्र रक्कमेच्या अंदाजपत्रकीय खर्चास अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई, यांनी पत्र क्र.मजीप्रा/मनिसंवसकक्ष/अमृत/सीआर-७५/५६७/ दि.३१/१२/२०२१ अन्वये नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे कडेस सादर केले असता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.बैठक-२०२२/प्र.क्रं.१९१/नवि-३३/दि.१९ सप्टेंबर २०२२ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक मान्यता समितीने मान्यता दिलेली आहे.

उक्त कामी पाच वेळा ई निविदा सुचना प्रसिध्द करुनही निविदा प्रक्रियेत निविदाधारक पात्र ठरत नसल्याने निविदेच्या पुर्व अर्हता अटीपैकी ३ व ४ मध्ये शिथिलता दिल्यास निविदेस योग्य प्रतिसाद मिळून काम लवकर होणेस मदत होईल. त्याकरीता कार्यकारी अभियंता मजीप्रा,जळगांव यांच्या अभिप्राय नुसार अट क्रं.०४ वगळुन नविन निविदा मागणी करण्यात यावी याबाबत त्यांनी सुचित केले.

त्यानुसार अट क्र.०४ वगळुन ३ वेळा ई-निविदा मागणी केली असता एकही निविदाकार यांचेकडुन प्रतिसाद मिळाला नाही. तद्नंतर चौथी ई निविदा मागणी केली असता, दोन निविदाकार यांनी निविदेत सहभाग घेतला आहे. याबाबतची प्राप्त तांत्रिक कागदपत्रे तपासणीकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे पाठविणेत आली होती. मजिप्रा विभागाने कागदपत्रांची तपासणी केली असून मे.लक्ष्मीछाया इले., जळगांव यांची प्राप्त निविदा तांत्रिक तपासणीत एकच निविदा पात्र ठरत असल्याने त्याची आर्थिक लिफाफा उघडण्याची शिफारस केली होती. त्यानुसार वित्तीय लिफाफा क्रं.२ उघडण्यांत आला असून त्यात प्राप्त दर पुढील प्रमाणे-
१. मे.लक्ष्मीछाया इले., जळगांव-निविदा रक्कमेवर ४७.००% जास्त

तद्नंतर दर जास्त वाटत असल्याने मक्तेदारास शहर अभियंता यांचे समक्ष वाटाघाटी अंती, निविदाकार यांनी दि.१७/११/२०२२ पत्रानुसार सदर कामाचे दर हे मराविवि कंपनीकडील सन २०१८-१९ च्या कास्ट डेटा प्रमाणे असुन फारच जुने व कमीचे आहे. आजच्या बाजार भावानुसार अंदाजपत्रकात नमुद साहित्याचे दर उदा. स्टील, कॉपर, ॲल्युमिनीय यांचे दरात प्रचंड वाढ झाल्याने भरुन दिलेल्या निविदा दरापेक्षा १% कमी करुन अंदाजपत्रकीय रक्कमेवर ४६% जास्तने काम करण्यास लेखी सहमती दर्शविली आहे.

त्यानुसार प्राप्त दरांचे विश्लेषण करणेकामी मजीप्रा.कडे प्रस्ताव पाठविण्यांत आला. त्याप्रमाणे अधिक्षक अभियंता मजीप्रा,जळगांव यांचे पत्र क्रं.मजीप्राविज/लेशा/१०८५/२०२२ दि.०७/१२/२०२२ नुसार महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या, विभागाची नोव्हेंबर २०२२ ची कॉस्ट डाटा सिट व सा.बा. विभागाची (स्थापत्य) सन २०२२-२३ च्या चालु दर सुची नुसार किंमत रु.१,६०,८३,५२८/- ऐवढी येत असुन मुल्यांकीत किमतीस तुलना करता ठेकेदार यांचे देकार १९.५९ टक्के जादा दराने येत आहे. तरी तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यतेच्या सर्व अटी व शर्तीच्या विषयाकींत निविदाबाबतची पुढील कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे.

जळगांव शहराचे दुषीत पाणी शुध्दीकरण न केल्याने पाटबंधारे विभागाचे पाणीपट्टी मध्ये साधारण प्रति माह रु.१६,८१,६४३/- इतकी दंड रक्कम आकारणी सुरु केलेली आहे. वॉटर रिसोर्स रेग्युलेटरी ॲथारिटी यांचे दि.२९/०३/२०२२ चे सुधारीत पाणी वापराचे दराबाबत आदेश मधील नमुद मुद्दा क्रं.६ नुसार सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प (एस.टी.पी.) ने दुषीत पाणी शुध्दीकरण करीत नसल्यास पाणी पट्टीचे दुप्पट दराने पाणी

चार्जेस आकारणी करणेत येत आहे. तरी तातडीने विदयुत पुरवठा होवून दुषीत पाणी शुध्दीकरण प्रकल्प चालु होणे आवश्यक आहे.

निविदाधारक मे.लक्ष्मीछाया इलेक्ट्रीकल,जळगांव यांना उक्त कामी दिलेले दर जास्त वाटत असल्याने पुन्हा वाटाघाटी करीता कळविले असता मक्तेदार यांचे पत्रातील नमुद मुद्दे पाहता उक्त कामी लागणारे इलेक्ट्रीक साहित्य यांची म.रा.वि.मं.कडील दरसुची व मार्केट दरात तफावत पाहता, व कामाची निकड लक्षात घेता. सदरचे मल निस्सारण प्रकल्प तात्काळ कार्यान्वित करणेकामी प्राप्त निविदा दर स्विकृतीस व निविदा दरानुसार येणारा खर्च म.जी.प्रा.ने केलेल्या मुल्यांकन नुसार निविदा स्विकारणेस व प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक मान्यता समितीच्या निर्णयासाठी पाठविणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,३१,७३,९८८/- (GST व्यतिरिक्त) दरावर ४६% जास्त म्हणजे रक्कम रु.१,९२,३४,०२२/- तसेच (त्यावर १८% GST) रु.३४,६२,१२४/- सह एकुण खर्च रु.२,२६,९६,१४६/-मात्रच्या खर्चास (वाढीव खर्च अमृत योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमे पैकी होणाऱ्या बचतीतून / मनपा निधीतून उभारण्यासह) मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच मे.लक्ष्मी छाया इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे दर स्विकृत करुन संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-** जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील चौकात तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये स्वयंचलीत वाहतुक नियंत्रक बसविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रं.५३ (नागपूरकडे जाणारा महामार्ग) तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रं.७५३ F (औरंगाबादकडे जाणारा महामार्ग) चे चौपद्रीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय विकास महामार्ग प्राधिकरण विभागामार्फत करण्यात आल्याने या महामार्गावरील पुर्वीचे बसविण्यात आलेले वाहतुक नियंत्रक निष्कासीत करण्यात आलेले आहे. शहरातील रस्त्याच्या विकास कामा अंतर्गत चौकाच्या रुंदीकरणा कामी वाहतुक नियत्रंकाचे पोल निष्कासीत करण्यात आल्याने वाहतुक नियंत्रक बंद आहे. तसेच ज्या चौकांमध्ये वाहतुक नियंत्रक आहे त्यांना बसविण्यास २० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असून ते निष्कासीत करुन त्या जागी नविन स्वयंचलीत वाहतुक नियंत्रक बसविणे गरजेचे आहे.

एकंदरीत जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील प्रमुख चौकांमध्ये तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये नवीन तांत्रिक प्रणालीचे सौर ऊर्जेवर चालणारे (पर्यायी विज पुरवठा व्यवस्थेसह) तसेच पादचारी करिता व्यवस्था असलेले काऊंट डाऊन टायमरसह नवीन विकसीत तांत्रिक प्रणालीचे स्वयंचलीत वाहतुक नियंत्रक बसविणे गरजेचे आहे. तसेच ज्या चौकांमध्ये वाहतुक नियंत्रक बसविणे शक्य नाही त्या चौकांमध्ये सौर ब्लिंकर बसविणे आवश्यक आहे.

शहर वाहतुक नियंत्रण शाखा पोलीस विभाग प्रतिनिधी यांचेशी झालेल्या प्राथमिक चर्चेनुसार स्वयंचलित वाहतुक नियंत्रक बसविणेच्या चौकाची यादी :-

| अ.क्र. | राष्ट्रीय महामार्गावरील चौकांचे नाव | अ.क्रं. | शहरातील चौकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | गोदावरी इंजिनियरींग कॉलेज चौक | १ | शास्त्री टॉवर चौक |
| २ | कालंका माता मंदिर चौक | २ | चित्रा टॉकीज चौक |
| ३ | नेल्सन मंडेला चौक (अजिंठा चौक) | ३ | कै.पुष्पालता बेंडाळे चौक |
| ४ | के के कॅन फॅक्टरी चौक | ४ | नेरी नाका चौक |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | रेमंड चौक | ५ | एसटी वर्कशॉप चौक |
| ६ | एमआयडीसी फायर स्टेशन चौक | ६ | पांडे डेअरी चौक |
| ७ | ईच्छादेवी चौक | ७ | गोविंदा रिक्षा स्टॉप |
| ८ | बॅ.अरुण वैदय चौक | ८ | कोर्ट चौक |
| ९ | खोटे नगर चौक | ९ | काव्यरत्नावली चौक |
| | | १० | स्टेट बँक-नंदिनी बाई हायस्कुल चौक |
| | | ११ | स्वातंत्र्य चौक |
| | | १२ | आकाशवाणी चौक रिंगरोड |
| | | १३ | पंचम हॉस्पीटल चौक (रिंगरोड) |
| | | १४ | टागोर नगर रिंगरोड चौक |
| | | १५ | खॉजामिया चौक |
| | | १६ | मोहाडी रोड शिरसोली रोड क्रॉसिंग चौक |

स्वयंचलित वाहतुक ब्लिंकर बसविणेच्या चौकाची यादी :-

| अ.क्र. | राष्ट्रीय महामार्गावरील चौकांचे नांव | अ.क्र. | शहरातील चौकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | लिलापार्क चौक (राष्ट्रिय महामार्ग) | १ | डी.मार्ट चौक |
| २ | सुप्रीम कॉलनी चौक | २ | खॉजामिया दर्गा चौक |
| ३ | प्रभात कॉलनी चौक | | |
| ४ | राष्ट्रीय महामार्ग जिल्हा उदयोग केंद्र आय.एम.आर.चौक | | |
| ५ | राष्ट्रीय महामार्ग विदयुत कॉलनी चौक | | |
| ६ | मानराज पार्क चौक | | |
| ७ | गुजराल पेट्रोलपंप चौक | | |

शहर वाहतुक नियंत्रण शाखा पोलिस विभाग व भारतीय राष्ट्रिय महामार्ग विकास प्राधिकरण विभाग यांचे अंतिम शिफारशी नुसार शहरात आावश्यक त्याठिकाणी चौकामध्ये स्वयंचलित वाहतुक नियंत्रक तसेच ब्लिंकर बसविणे आवश्यक आहे.

उक्त नमुद चौकामध्ये स्वयंचलित वाहतुक नियंत्रक यंत्रणा बसविणे तसेच काही चौकामध्ये ब्लिंकर बसविणे आवश्यक असुन याकामी साधारण रु.४.७५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

सुप्रिम इंडस्ट्रीजचे प्रतिनिधी यांचेशी झालेल्या प्राथमिक चर्चेनुसार त्यांनी लोकसहभागातुन राष्ट्रीय महामार्गावरील बॅ.अरुण वैदय चौकामध्ये तसेच नेल्सन मंडेला चौकामध्ये वाहतुक नियंत्रक बसवून देण्याची तयारी दर्शवीलेली आहे.

जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील चौकात तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये स्वयंचलीत वाहतुक नियंत्रक बसविणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु. ४.७५/- कोटी मात्र खर्च लोकसहभागातुन काम करणेस, शासकीय निधी उपलब्ध करुन घेवुन, शासकीय निधीतुन, तसेच शासकीय निधी उपलब्ध न झाल्यास मनपा निधीतुन काम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १२ (तहकुब) :-** तहकूब विषय- महासभा ठराव क्रं.९५२ दि.२३/१२/२०२२ - मनपा सिटी सर्वे नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) या जागेत वाहनतळवर तात्पुरत्या स्वरूपातील किरकोळ खाद्यपदार्थ विक्रीचे फिरते वाहन करीता परवानगी मिळणेबाबत अर्जदार श्री.किरण शंकर भालोदकर यांना परवानगी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- गोराणेसाहेब विषय क्रं. १२ हा सर्वानुमते नामंजुर करण्यात यावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नामंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे. आप्पांच्या भावनांचा विचार करून सर्वानुमते नामंजुर करण्यात यावा.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही सर्वानुमतेच आहे ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** परत आणु नये.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १२ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ५७**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करुन मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ९५ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**(सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी विषय क्र.१३ मध्ये दुरूस्ती करणेबाबत मा.महापौर यांचेकडेस पत्र दिले.)**

**मा.महापौर** :- प्रभाग क्र.९ मधील हनुमान नगर येथील ओपनस्पेस मध्ये ब्लॉक बसविणेबाबत ८ लक्ष निधी मिळावा असे सुचविलेले आहे. परंतू यादीमध्ये ते ८० लक्ष असे झालेले आहे तरी ती दुरूस्ती करून ती ८ लक्ष रूपये करण्यात यावे. विषय क्र.१३ मध्ये.

**मा.उपमहापौर :-** मोठया मनाने ७० लक्ष रुपये कमी करुन घेतले त्यांनी मोठया मनाने.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना, शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी या सोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते ९५ या विकास कामांच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या लेखी प्रस्तावानुसार सोबतच्या यादीतील अ.क्रं.५८ मध्ये नमूद कामासाठी अपेक्षित खर्च रक्कम रुपये ८० लक्ष दर्शविण्यात आलेला आहे त्याऐवजी सदर खर्च रक्कम रुपये ०८ लक्ष अशी दुरुस्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. नवनाथ दारकुंडे | 2 | प्रभाग क्रं. 2 मधील धनाजी काळे विहीरी पासुन ते कान्हाकाई रोडापर्यंत मेन रस्ता डांबरी करण करणे. | 10000000 |
| 2 | 18,55,00,000 | | प्रभाग क्रं. 2 मधील स.नं. 342/6 ब मधील मेन रस्ता डांबरी करण करणे | 5000000 |
| 3 | | | प्रभाग क्रं. 2 मधील उस्मानिया पार्क येथील स.नं.418 मधील मेन रस्ते डांबरी करण करणे | 20000000 |
| 4 | | | प्रभाग क्रं. 2 मधील अमन पार्क येथील मेन रस्ते डांबरी करण करणे. | 15000000 |
| 5 | | | प्रभाग क्रं. 2 मधील उमर कॉलनी येथील मेन रस्ते डांबरी करण करणे. | 10000000 |
| 6 | | | प्रभाग क्रं. 2 मधील बाबा कॉलनी येथील मेन रस्ता डांबरी करण करणे. | 3000000 |
| 7 | | | प्रभाग क्रं. 2 मधील बारसे कॉलनी येथील मेन रस्ते डांबरी करण करणे. | 5000000 |
| 8 | | | प्रभाग क्रं. 2 मधील शिवशक्ती नगर मधील मेन रस्ता डांबरी करण करणे. | 2000000 |
| 9 | | | प्रभाग क्रं. 2 मधील मकरा अपार्टमेन्ट पासुन ते कान्हाकाई रोड पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 5000000 |
| 10 | | | प्रभाग क्रं. 2 मधील शिस्तीया पार्क मधील मेन रस्ते डांबरी करण करणे. | 10000000 |
| 11 | | | प्रभाग क्रं. 2 मधील जाफर चौक येथील झोपडपट्टी मधील ठिकठिकाणचे रस्त कॉक्रीटी करण करणे. | 5000000 |
| 12 | | | प्रभाग क्रं. 2 मधील स.नं. 337 शिवाजी नगर हुडको येथील 6 मीटरच्या सर्व गल्ल्यां कॉक्रीटी करण करणे | 15000000 |
| 13 | | | प्रभाग क्रं. 2 मधील महाराष्ट्र दाल मिल पासुन ते हुडकोच्या रस्त्यापर्यंत मोठी गटार बांधणे व क्रॉसींग कल्व्हेट बांधणे. | 5000000 |
| 14 | | | प्रभाग क्रं. 2 मधील शिवाजी नगर ख्रिस्ती स्मशान कब्रस्थानला लागुन असलेली नविन आर.सी.सी. गटार व कल्व्हेट बांधणे. | 1000000 |
| 15 | | | प्रभाग क्रं. 2 मधील शिवाजी नगर मेन रस्त्याला जोडत असलेल्या गल्ल्या तेथील रस्ते कॉक्रीटी करण करणे. | 10000000 |
| 16 | | | प्रभाग क्रं. 2 मधील श्री मोटर्स ते स्मशानभुमीच्या नाल्यापर्यंत मेन रस्ता डांबरी करण करणे | 15000000 |
| 17 | | | प्रभाग क्रं. 2 मधील श्री मोटर्स ते स्मशानभुमीच्या नाल्यापर्यंत आर.सी.सी. गटार व क्रॉसींग कल्व्हेट टाकणे | 10000000 |
| 18 | | | प्रभाग क्रं. 2 मधील स्मशानभुमीला तार कंपाऊड करणे | 2500000 |
| 19 | | | प्रभाग क्रं. 2 मधील एफ.सी.आय. गोडाऊन पासुन ते मलनिस्सारण प्लॅन्ट पर्यंत मेन मोठा रस्ता डांबरी करण करणे | 25000000 |
| 20 | | | प्रभाग क्रं. 2 मधील कंक यांचे घरापासुन ते इब्राईम कसाई यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे. | 2000000 |
| 21 | | | प्रभाग क्रं. 1 मधील काळे नगर स.नं. 342 अ,ब,क,ड मधील मेन रस्ते वरील गल्ल्यांमधील नविन आर.सी.सी. गटार व क्रॉसींग कल्व्हेट करणे | 2500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | | | प्रभाग क्रं. 1 मधील पुष्पांजली कॉलनी स.नं. 342 अ,ब,क,ड मधील मेन रस्ते वरील गल्ल्यांमधील नविन आर.सी.सी. गटार व क्रॉसींग कल्व्हेट करणे | 2500000 |
| 23 | | | प्रभाग क्रं. 1 मधील स.नं. 342/2 तानाजी मालुसरे नगर बाळु लेडंवे यांचे घरापासुन ते दिलीप माळी यांचे घरापर्यंत नविन आर.सी.सी. गटार व क्रॉसींग कल्व्हेट करणे | 2500000 |
| 24 | | | प्रभाग क्रं. 1 मधील स.नं. 342/2 कंडारे यांचे घरापासुन ते मनोज सोनवणे व उपाध्ये यांचे घरापर्यंत नविन आर.सी.सी. गटार व क्रॉसींग कल्व्हेट करणे | 2500000 |
| 25 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्रभाग क्र. 3 दिनकर नगर येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 20000000 |
| 26 | 7,25,00,000 | | प्रभाग क्र. 3 तानाजी मालुसरे नगर येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 27 | | | प्रभाग क्र. 3 विलास हॉटेल ते मराठी शाळेपर्यतरस्ता कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 28 | | | प्रभाग क्र. 3 खेडी पाटीलवाडा येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 29 | | | प्र.क्र.3 मधील खेडी शिवार गट नं. 2/1 मध्ये रस्ते डांबरी करण करणे. | 8000000 |
| 30 | | | प्र.क्र.3 मधील समर्थ कॉलनी गट नं. 83/3/2 जुना असोदा रोड येथे आर.सी.सी. गटार बांधणे. | 2500000 |
| 31 | | | प्र.क्र.3 मधील खेडी शिवार गट नं. 62 भगवान नगर येथे आर.सी.सी. गटार बांधणे. | 4000000 |
| 32 | | | प्र.क्र.3 मधील विनायक नगर खेडी शिवार गट नं. 75 येथे आर.सी.सी. गटार बांधणे. | 4000000 |
| 33 | | | प्र.क्र.3 मधील दिनकर नगर येथे आर.सी.सी. गटार बांधणे. | 2500000 |
| 34 | | | प्र.क्र.3 मधील जुना आसोदा रोड दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे. | 9000000 |
| 35 | | | प्र.क्र.3 मधील खेडी शिवार समर्थ नगर येथे आर.सी.सी. गटार बांधणे. | 2500000 |
| 36 | श्री. चेतन सनकत | 4 | प्रभाग क्र. 4 बागवान वाडा येथे ठिकठिकाणी रस्ते डांबरी करण करणे. | 5000000 |
| 37 | 1,75,00,000 | | प्रभाग क्र. 4 बागवान वाडा येथे ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटी करण करणे. | 5000000 |
| 38 | | | प्रभाग क्र. 4 अंतर्गत चौघुले प्लॉट येथे ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटी करण करणे | 3000000 |
| 39 | | | प्रभाग क्र. 4 गुरुनानक नगर लगत असलेल्या लेंडी नाल्याला बाकी असलेली संरक्षण भिंत बांधणे तसेच स्लॅब कल्व्हेट बांधणे | 2500000 |
| 40 | | | प्रभाग क्र. 4 अंतर्गत ठिकठिकाणी (6 मीटर, 9 मीटर, ) चे हायमस्ट पोल उभारणे | 2000000 |
| 41 | डॉ.श्री.सचिन पाटील | 7 | शिव कॉलनी गट नं. 60 येथील रस्ते डांबरीकरण करणे | 7000000 |
| 42 | 3,20,00,000 | | शिव कॉलनी गट नं. 54 येथील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 43 | | | शामराव नगर व पंडितराव कॉलनी येथील रस्ते डांबरीकरण करणे | 7000000 |
| 44 | | | श्रीकृष्ण येथील रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 45 | | | भगीरथ कॉलनी येथील रस्ते डांबरीकरण करणे | 4000000 |
| 46 | | | गंधर्व कॉलनी येथील रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 47 | सौ.प्रतिभा देशमुख | 9 | प्र.क्र. 9 अंतर्गत प्रा.घुघे यांचे घरापासुन ते मराठा सेवा संघ हॉल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 990000 |
| 48 | 4,79,30,000 | | प्र.क्र. 9 अंतर्गत आसाराम बापु आश्रम मागील रस्ता ते टेलिफोन ऑफिस ते मंदाताई सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 5000000 |
| 49 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत द्रोपदी नगर मुख्य रस्ता डांबरीकरण करणे | 3500000 |
| 50 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत केरळी मंदीर ते चव्हाण यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 2400000 |
| 51 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत मुक्ताई नगर मुख्य रस्ता गट नं. 28, 29,30 सामाईक असलेला रस्ता डांबरीकरण करणे | 5000000 |
| 52 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत मानराज पार्क मधील ६ मिटर रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 53 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत मोमाई कॉर्नर ते प्रकाश पाटील ते जुना हायवे पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1500000 |
| 54 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत सुभाष सनेर यांचे घरापासुन ते नाल्यापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 990000 |
| 55 | | | प्र.क्र. 8 अंतर्गत हायवे दर्शन कॉलनी अभिमन्यु पाटील यांचे घरापासुन ते पवार यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 990000 |
| 56 | | | प्र.क्र. 8 अंतर्गत हायवे दर्शन कॉलनी बंगाली साहेब यांचे घरापासुन ते राजपुत यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 990000 |
| 57 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत गट नं. 36/1 मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सीग करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे (जॉगिंग ट्रॅक) | 990000 |
| 58 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत मुक्ताई नगर हनुमान मंदीर गट नं. 29 ओपन स्पेसमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | 8000000 |
| 59 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत चौधरीवाडा गट नं. 24 निवृत्ती नगर मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सीग करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे (जॉगिंग ट्रॅक) | 800000 |
| 60 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत गट नं. 28 मुक्ताई नगर नानानानी पार्क येथे पेव्हर ब्लॉक बसविणे (जॉगिंग ट्रॅक) व खेळणी बसविणे | 990000 |
| 61 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत गट नं. 29 मुक्ताई नगर मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सीग करणे | 800000 |
| 62 | | | प्र.क्र. 9 अंतर्गत प्रेम नगर मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सीग करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे (जॉगिंग ट्रॅक) | 990000 |
| 63 | | | प्र.क्र.09 दांडेकर नगर परिसरात आरसीसी गटार तयार करणे | 3000000 |
| 64 | | | प्र.क्र.09 विद्या नगर परिसरात पाण्याच्या टाकीजवळ व मुदडा शाळेच्या जवळ आरसीसी गटार तयार करणे | 3000000 |
| 65 | | | प्र.क्र.09 अंतर्गत शंकर आप्पा नगर येथे आरसीसी गटार तयार करणे | 3000000 |
| 66 | | | प्र.क्र.09 श्रीरत्न कॉलनी, ओम शांती नगर येथे आरसीसी गटार तयार करणे | 2000000 |
| 67 | श्री. विजय पाटील | 9 | प्र.क्र.09 अंतर्गत जिल्हा बँक कॉलनी येथे आरसीसी गटार बांधणे | 2000000 |
| 68 | 1,25,00,000 | | प्र.क्र.09 अंतर्गत कृष्णा क्लासेस ते शालिनी नगर पर्यत नाला बांधकाम करणे | 6500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 69 | | | प्र.क्र.09 अंतर्गत अष्टभुजा मंदिर ते शिंदे नगर पर्यंत नाला बांधाकाम करणे | 2000000 |
| 70 | | | प्र.क्र.09 अंतर्गत इंद्रनिल सोसायटी परिसरात गटार बांधकाम करणे | 2000000 |
| 71 | श्री. मयुर कापसे | 9 | प्र.क्र.09 अंतर्गत संत आसाराम बापु आश्रम परिसरात आरसीसी गटार बांधणे | 3000000 |
| 72 | 1,40,00,000 | | प्र.क्र.09 अंतर्गत पिंप्राळा गट नं. 22,23,24 व 25 पंचायत मंदिर, केरळी मंदिर परिसरात, स्वामी समर्थ केंद्र परिसरात आरसीसी गटार बांधणे | 3500000 |
| 73 | | | प्र.क्र.09 अंतर्गत मानराज पार्क परिसर, नवजीवन सुपर शॉप मागील परिसर, चेतना व्यसनमुक्ती केंद्र परिसर इ. भागात आरसीसी गटार बांधणे | 3500000 |
| 74 | | | प्र.क्र.09 अंतर्गत शिक्षक कॉलनी गणपती मंदिर शिवराणा नगर आर.आल कॉलनी शिंदे नगर ते आव्हाणे रोड पर्यंत आरसीसी गटार बांधणे | 4000000 |
| 75 | श्री. ललित कोल्हे | 11 | प्रभाग क्र. 11 पिंप्राळा गट क्र. 104/01 ब मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करुन पेव्हर ब्लॉक बसविणे | 3156153 |
| 76 | 1,48,00,608 | | प्रभाग क्र. 11 मधील 102 मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करुन पेव्हर ब्लॉक बसविणे | 937652 |
| 77 | | | प्रभाग क्र. 14 मधील स.नं. 274 ब मधील रस्ते डांबरीकरण करणे | 3500000 |
| 78 | | | प्रभाग क्र. 05 मधील आर्किड हॉस्पीटल ते बी.जे. मार्केट ते खंडवा कटपीस सेंटर पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 4940016 |
| 79 | | | प्रभाग क्र. 05 प्रभुदेसाई चौक ते रेल्वे लाईन पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 2266787 |
| 80 | सौ. उज्ज्वला बेंडाळे | 12 | प्र.क्र.12 अंतर्गत लंडन शेक कॅफे ते विद्युत विभाग इमारत ते गुरुनानक सोसायटी तसेच स्वाध्याय भवनच्या दक्षिणेकडील रस्ते कॉक्रीट करणे | 20000000 |
| | 2,00,00,000 | | | |
| 81 | श्री. सुनिल महाजन | 15 | प्र.क्र. 17 अंतर्गत झिपरु आण्णा नगर येथे श्री.विजय नारखेडे यांचे घरापासून ते श्री.सोपान काळे यांच्या घरापर्यत पेव्हर ब्लॉक बसविणे | 1000000 |
| 82 | | | प्र.क्र. 17 लक्ष्मीभाऊ नगर बाजुतील हनुमान मंदीर ते जुना असोदा मटन हॉटेल पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 1000000 |
| 83 | 1,50,00,000 | | प्र.क्र. 17 अयोध्या नगर मधील सोपानदेव नगर लक्ष्मी ॲटो गॅरेज पासून श्री.प्रविण पाटील यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1000000 |
| 84 | | | प्र.क्र.17 तरुण कुढापा मित्र मंडळा समोरील मुंजोबा मंदीर पासुन ते हेमंत त्र्यंबक खडके यांच्या घरपर्यत सिध्दीविनाय मंदीरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 85 | | | प्र.क्र.17 अयोध्या नगर मधील श्री.सोपानदेव नगर (लक्ष्मी ॲटो गॅरेज पासुन) श्री.प्रविण पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 86 | | | प्र.क्र.17 श्री. लिलाधर कावळे यांच्या घरापासुन ते श्री.सुभाष नारखेडे यांच्या घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1000000 |
| 87 | | | प्र.क्र.17 श्रीराम पार्क दत्त मंदीरापासुन ते श्री.सोपान चौधरी यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 88 | | | श्री विठ्ठल मंदीर येथील परिसरात सुशोभीकरण करणे (श्रीराम पार्क) | 1000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 89 | | | प्र.क्र.17 अयोध्या नगर जवळील सोपानदेव नगर श्री.गौरव येवले यांच्या घरापासून ते श्री. विलास भोळे यांच्या घरापर्यंत बाजुने रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 90 | | | प्र.क्र.3 मधील जमुना नगर येथिल श्री.सुकदेव पाटील यांच्या घराजवळील परिसर कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 91 | | | प्र.क्र.17 मधील सुदर्शन नगर मधील श्री.जयेश पाटील यांच्या घरापासून ते श्री.विलास न्हावकर यांच्या घरापर्यंत कॉलनी डांबरीकरण करणे | 1000000 |
| 92 | | | प्र.क्र.17 लिलापार्क येथील मनुदेवी मंदीरा समोरील गल्ली कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 93 | | | प्र.क्र. 17 येथील निर्मला भोळे यांच्या घरापासून ते रायसोनी हायस्कुल पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 94 | | | प्र.क्र.17 मधील परिश्रम वेल्डींग जवळील स्वामीनारायण मंदीर समोरील गल्लीत कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 95 | | | प्र.क्र. 17 श्रीकृष्ण नगर येथील मनपा अंतर्गत विहीरीचा दुरुस्ती करणे | 1000000 |
| | 43,17,30,608 | | | 431730608 |

पिठासिन अधिकारी तथा महापौर
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव.

**नगरसचिव विषय क्रं. १४ :-** प्रभाग क्र.३ जुना आसोदा रस्त्यावरील स.नं.१००, १०१ (आरक्षण क्र.४३) जागा लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांना देणेकामी भाडे आकारणी करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरसाहेब या विषयामध्ये बोलायचे आहे. तर त्या भागातील नागरीकांची जी परिस्थिती आहे की ती काही एवढी बरोबर नाहीये. आपण आता पाहीले कि त्याठिकाणी घाण होत होती. तर त्या रस्त्यावर तर आम्ही त्यावर आंदोलने करण्याचा प्रयत्न केला. मनपा वेळोवेळी त्याठिकाणी खर्च करते आणि म्हणुन आणि त्यांची परिस्थिती तशी नाहीये म्हणुन आपण त्यांना दोन पर्याय दिलेले आहेत.परंतू त्यांची परिस्थितीच नाहीये. त्यांनी त्यांची २ हजार रूपये डिपॉझिट ठेवायची आणि त्यांनी त्याची साफसफाई व्हावी या उद्देशाने आणि साफसफाई झाल्यांनतर ते २ हजार रूपये त्यांना परत करावे आणि त्याभागात आपले दोन ओपनस्पेस असे आहेत की २५/२५ हजार स्क्वेअर फुटच्या त्या डेव्हलप व्हाव्यात आणि त्याठिकाणी विवाह लागतात ज्या काही पध्दत असतील आणि त्याठिकाणी अतिक्रमण सुध्दा झालेले आहेत काही ठिकाणी तर त्या जागा आपण आपल्या ताब्यात घ्यायला पाहीजे आपले नांव त्याठिकाणी लावले पाहीजे. तर त्याची पुढची कार्यवाही जागा ताब्यात घेण्यासंदर्भात तर हा किरकोळ प्रॉब्लेम आहे आणि त्याठिकाणी वॉलकंपाऊंड करणे २०/२० हजारांच्या जागा आहे त्या तर थोडेसे असे रोड सारखे हे बांधणे असा किरकोळ खर्च

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा आमदार निधीमधुन

**श्री. कैलास सोनवणे** :- आमदार निधी राजुमामांनी दिलेले आहे पैसे तर आमदार निधी आणि आपला मनपा फंड असे मिळुन हे सुत्र ठरले आहे आता वेळ कमी आहे. तर माझी अशी विनंती आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा ते आमदार आणि खासदार हे स्वत: निधी

**श्री. कैलास सोनवणे** :- आमदार आणि खासदार निधी दोन्ही आहेत बोलणे झालेले आहे माझे स्वत: आणि तो जो विषय करताहेत ना तुम्ही तो रथ मार्ग आहे त्यामुळे तिथे कॉम्प्रमाईज करता येणार नाही. बराचसा झाला आहे थोडा बाकी आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- करून घेवु ना मग .

**श्री. कैलास सोनवणे** :- तर २ हजार डिपॉझिट घ्यावी आणि त्यांनी साफसफाई केली की मग

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा ते २ हजार जे तुम्ही म्हणताहेत ना तेही नका घेवु.

**श्री. कैलास सोनवणे** :- ठिक आहे ना कॅन्सल करा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा ते २ हजार आपण त्यांच्याकडुन डिपॉझिट म्हणुन घ्यायचे आणि स्वच्छता झाल्यानंतर परत द्यायचे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. ईब्राहीम पटेल** :- ओपनस्पेस वर सदरील रहिवाश्यांचा अधिकार असतो.

**श्री. कैलास सोनवणे** :- साफसफाईच काय आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा ज्यांच्या घरचे लग्न असतील तसे तिथे स्पष्ट बोर्ड लावुन टाकायचे आपण

**श्री. कैलास सोनवणे** :- त्या जागेवर

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो की या कंडीशनवर तुम्हाला या जागेची परवानगी देण्यात आलेली आहे. येथे जर कधी स्वच्छता न आढळुन आल्यास ज्याच्या कुटुंबाच लग्न असेल त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**श्री. कैलास सोनवणे** :- आता भाऊ जो विषय आपण मांडला तो विषय काय आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो ना

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ ते सगळे गरीब लोक आहेत सगळे

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो ना मग म्हणुन सांगतोय आणि तो प्रॉब्लेम सॉल होवुन जाईल.

**श्री. कैलास सोनवणे** :- चालेल , चालेल

**श्री. नितीन लढ्ढा** :- म्हणजे थोडक्यात विषय नामंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १४ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- भाऊ कस आहे साफसफाईचा विषय आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही कस आहे आप्पा

**मा.उपमहापौर** :- नाही भाऊ त्यांच म्हणण बरोबर आहे साफसफाई होण पण गरजेच आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रभाग क्र.३ जुना आसोदा रस्त्यावरील स.नं.१००, १०१ (आरक्षण क्र.४३) जागा लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांना देणेकामी भाडे आकारणी करणेबाबतचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

उपरोक्त जागेवर स्थानिक रहिवाशी यांनी काही कार्यक्रम आयोजित केल्यास त्यांचेकडून प्रशासनाने सदर जागेची साफसफाई करुन घ्यावी व ज्या रहिवाश्यांनी कार्यक्रम घेवुन साफसफाई केलेली नसेल त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १५ :-** जळगांव मनपा हद्दीत मेलेली जनावरांचे शास्त्रीय दृष्टया योग्य पध्दतीने अंत्यविधी होणेकामी Animal crematory system कार्यान्वयीत करणेबाबत सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**ॲड. शुचिता हाडा :-** तर या निमित्ताने आपल्या महापालिकेमध्ये उभा आहे. महापौरताई आणि आयुक्त महोदया आपल्याला तिच माहिती देते की २ ऑगस्ट २०२२ ला ॲनिमल बोर्डाने पत्र काढले आहे की त्यांनी सगळ्यांनाच निर्देश दिलेले आहे सगळ्या राज्यांमधील महापालिकेंना की मेलेल्या जनावरांची शास्त्रोक्त पध्दतीने त्यांची विल्हेवाट लावायची यंत्रणा ही प्रत्येक महापालिकेमध्ये कार्यरत असण हे आवश्यक आहे. हे प्रायोरिटीने अत्यावश्यक करण्यात आलेले आहे आणि अशा बऱ्याच म्हणजे पुणे महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका आणि इतर काही महानगरपालिकांमध्ये कार्यान्वित आहे. भविष्यात जळगांव महापालिकेलासुध्दा पेंडींग असल्यामुळे हे करावाच लागणार आहे आणि तर आजच आपण सभागृहात हा निर्णय घ्यावा की ही यंत्रणा जळगांव महापालिकेला कार्यान्वित करणार आहोत आणि निधी जो आहे तो आपल्याला १५ व्या वित्त आयोगातुन मिळु शकते. तर प्रशासनाने सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव मंजुर करावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर करण्यात यावा.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई अजुन एक विनंती करेल मी की, काही प्रकल्प आपण उभारतो आहेत तर ते प्रकल्प विभागाकडे जाणार आहेत. तर आपले प्रकल्प विभागाचे योगेश बोरोले साहेब आहे का? योगेशदादा आमची मुदत संपते आहे आणि ईन्वोव्हेटी प्रोजेक्ट जो आपला आहे सभागृह त्याला सर्वानुमते मंजुरी देते आहे. तर आमची मुदत संपण्याच्या आत पुढची जी प्रशासकीय कार्यवाही आहे ती पुर्णत्वास न्याल ना.

**श्री.यागेश बोरोले, प्रकल्प अभियंता:-** हो मॅडम.

**ॲड. शुचिता हाडा :-** योगेशदादांनी सुध्दा आपल्याला शब्द दिलेला आहे तर मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिका हद्दीत असलेल्या पाळीव व मोकाट जनावरांचे मृत्युनंतर त्यांच्या अंत्यविधीसाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या शवाची केवळ अवहेलनाच होत नाही तर शास्त्रीय दृष्टया योग्य पध्दतीने त्या मृतदेहाची विल्हेवाट वेळेत न लावल्या गेल्याने त्यापासून आसपासच्या नागरिकांना त्रास सहन करावा लागतोच आणि हवेचे व पाण्याचे प्रदूषण होतेच ते वेगळे.

यासाठी अनेक मोठया शहरांमध्ये (महापालिकांमध्ये) ॲनिमल क्रिमेंटरी सिस्टीम लावली जात आहे. जेणेकरुन मेलेली जनावरांची त्वरित या गॅस दाहिनीत अंत्यसंस्कार करुन होणारे सर्व प्रकारचे प्रदूषण थांबवता येणे सहज साध्य होते.

यासंदर्भात ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने यापूर्वीच सर्व राज्यातील महानगरपालिकांना दि.०२/०८/२०२२ रोजी निर्देश दिलेले असल्याने जळगांव शहर महापालिकेत देखील जळगांव मनपा हद्दीत मेलेली जनावरांची शास्त्रीय दृष्टया योग्य पध्दतीने अंत्यविधी होणेकामी Animal crematory system कार्यान्वयीत करणेस तसेच या कामी येणारा खर्च १५ व्या वित्त आयोगातून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने प्रकरणात मुदतीच्या आंत प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक - पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १६ :-** प्रभाग क्रं.४ अंतर्गत शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा जिल्हा नियोजन समिती निधी अंतर्गत ०२ कामे व राष्ट्रीय शुध्द हवा उपक्रमा अंतर्गत निधीतुन ०१ कामे असे एकूण ०३ कामे करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्रीचेतन गणेश सनकत यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही काय आहे माहिती आहे का की आमच्या वॉर्डातील जे ठराव झालेले आहेत. आता चेतनभाऊंनी जे मांडले आहे तर हा एक ठराव आहे , हा एक ठराव आहे, हा एक ठराव आहे हे सगळे झ ाले आहे तर कितीक वेळा मांडणार आहे तेच तेच ठराव आहे. म्हणजे ज्या ज्या ठिकाणी आता उस्मानिया पार्कमध्ये म्हणजे मुस्लिम भागातीलच काम आहे ते मुस्लिम भागात टाकायला काही हरकत नाहीये आणि काय प्रस्ताव आहे तुमचा तो त्याचा काही विषयच नाहीये काही ते जावु द्या ना. दुसरा काही विषयच नाहीये ना शुध्द हवेचा दुसऱ्या याच्यामध्ये द्या ना आणि त्या ८४ कोटीमध्ये १३ कोटी रस्त्यांचे काम आहेत नितीनभाऊ आता ते करायचे कोणत्या ठिकाणचे आहे असे, दुसरे आजुबाजुचे कोणकोणते रस्ते आहेत करायचे आजुबाजुचे ते सांगा मला तुम्ही.

**मा.उपमहापौर** :- आप्पासाहेब ऑलरेडी पुर्वीच्या प्रस्तावामध्ये हे प्रस्ताव जे आहेत ना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर** :- आप्पासाहेब आपण ठराव करणार नाही अस कुठे

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही आपण ठराव करू ना, काय आहे की काय होते की कैलासआप्पांनी विरोध केला कारण की काय आहे की ठराव केलेले आहेत ना आपण हे पाहा. तो जो ठराव अपण करतोय तो हा ठराव आहे. त्याच्यामध्ये काहीच गरज नाहीये आणि काहीच नाही आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. कैलास सोनवणे** :- तुम्हाला जिकडे टाकायचे आहे ते टाकुन घ्या तुम्ही

**श्री. नितीन लढ्ढा** :- या पंचवार्षिकमध्ये ठराव करण्याची गरज पडणार नाहीये आप्पा

**श्री. कैलास सोनवणे** :- हो ना ठराव झालेले आहेत.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ यामध्ये जो शिवाजी महाराजांचा जो चौक आहे तर तो घेण्यात यावा आणि त्यांच्या अहवालात किंवा प्रकल्पात म्हंटलेले आहे की वर्दळीच्या ठिकाणचे रस्ते घेण्यात यावे. नितीनभाऊ आपण शिवाजी नगरचा पुल जेव्हा केला तेव्हा आपल बोलण झाल होत की याच्या शिल्लक निधीतुन जिल्हा परिषद ते बळीराम पेठ चौकापर्यंतचा रस्ता त्याच्यातुन घेण्यात येईल म्हणुन आपण तो घेतला नाही. तर तो या शुध्द हवा कार्यक्रमामध्ये तो रस्ता घेण्यात यावा कारण तो रस्ता झाला नाही आणि वर्दळीचा रस्ता तुमचाच प्रभाग आहे आणि बळीराम पेठेतील जे चौक आहे शिवाजी महाराजांचे तर तो घेण्यात यावा.

**श्री. नितीन लढ्ढा** :- ऑलरेडी काय झालेले आहे की तो रस्ता घेतला गेला आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. नितीन लढ्ढा** :- एक काम करा ना आप्पा हा जो रस्ता आहे ना आणि हा प्रस्ताव मान्य करून घ्या.

**श्री. कैलास सोनवणे** :- हे काम तुम्ही चेंज करून टाका , ऐका ना चेंज करून टाका आणि आमच्या प्रभागातील भिलपुराकडे जो रस्ता जातो. तो एक

**श्री. विशाल त्रिपाठी** :- तो रस्ता विश्वास लुकंड ज्वेलर्स ते भिलपुरा चौक इन्क्ल्युड करण्यात यावा.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- भाऊ याच्यापुर्वी प्रशासनाने हा प्रस्ताव

**श्री. विशाल त्रिपाठी** :- नाही ना तो रस्ता याच्यात घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**मा.उपमहापौर** :- विशालभाऊ याच्यापुर्वीचा जो प्रस्ताव होता ना तो आपल्या प्रशासनाने २ कोटी ८० लाखांचा तो आपण करून टाकलेला आहे. मागील जे प्रस्ताव आले होते ना त्यात पाहुन घ्या तुम्ही.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- या प्रस्तावात म्हंटलेले आहे ना

**श्री. नितीन लढ्ढा** :- ठराव काय म्हणतो आणि प्रशासन काही

**मा.महापौर** :- एक मिनिंट विशालभाऊ हा प्रस्ताव जो आहे तो पुर्ण

**श्री. कैलास सोनवणे** :- महापौरताई हा ठराव करणे हा नॉमिनल प्रश्न आहे दुसरा काहीच प्रश्न नाहीये. हे ठराव झालेले आहेत काय कामाचे आहेत ते.

**श्री. नितीन लढ्ढा** :- निधी संपतील.

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ मॅडमांना बोलु द्या. त्यांना माहिती आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- ताई प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ माहिती घेवु द्या ना आम्हाला.

**श्री. नितीन लढ्ढा** :- ऐका ना आप्पा अहो प्रशासन काय

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ मला एक सांगा दुसरा काय विषय ठेवला आहे मला हे सांगा ना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ त्याच्याविषयी आम्हाला आमचे नागरीक आम्हाला बोलतात. अहो मॅडमांनाही माहिती आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा माहिती आहे . ऐका ना शिवाजी महाराजांचा पुतळा बळीराम पेठमधील माझ्या प्रभागात आहे. तर तो ४ मध्ये ओढुन घेतला आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- नितीनभाऊ आता हे चुकीचे आहे ना.

**मा.उपमहापौर** :- आप्पासाहेब काय होत की नंतर आपल्याला चुक दुरूस्ती करावी लागते म्हणुन सांगत आहेत ते.

**श्री. कैलास सोनवणे** :- करा ना तुम्ही मॅडमांना माहिती द्यायला लावा मला काही प्रॉब्लेम नाही. कशाला तुम्ही हे करता आहे जो निधी मागतो आहे त्याला द्या ना.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आप्पा हे मान्यच होणार नाही या सगळ्या मागण्या तुम्ही केलेल्या आहेत आणि या DPDC मध्ये मागण्या केलेल्या आहेत.

**श्री. कैलास सोनवणे** :- वेळोवेळी

**श्री. नितीन लढ्ढा** :- अहो DPDC त येणार नाही ना आप्पा मॅडमही सांगतील.

**श्री. कैलास सोनवणे** :- तुम्ही आधीच नाही म्हणत आहेत ना कस काय येणार नाही.

**श्री. नितीन लढ्ढा** :- अहो जी काम झालेली असतील तीच काम डबल डबल येतील तर मॅडमही प्रस्ताव पाठवणार नाही.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ DPDC च नाहीये शुध्द अंतकरणाने मान्य केलेले आहे आपण ते

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ तुमच्या लक्षात नाही आलं की तुम्ही त्याच नियोजन नाही केले तर आणि तुम्ही त्या पॉलीसीला मंजुरी दिली तर तो ईच्छादेवी चौकापासुनचा रस्ता

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही नाही आपण संपुर्ण कामांना मंजुरी दिलेली आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ नाही ना , चौक कारंजा बसविणे कोणता कारंजा घेणार तुम्ही त्याच्यात, बरोबर आहे का मॅडम फक्त कारंजा बसविणे म्हणजे कोणता कारंजा आहे. किंवा वर्दळीचा रस्ता आहे तर कोणता रस्ता मंजुर करणार आपण नाही केले आहे. तो प्रस्ताव हायवेचा सुध्दा जो आहे तो आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. विशाल त्रिपाठी** :- भाऊ आता कारंजा बसविणे तर त्या अनुषंगोन हा प्रस्ताव दिला आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही मी काय म्हणतोय की मग रद्द करा ना.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. नितीन लढ्ढा** :- हा प्रस्ताव नामंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं. १६

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६

**मा.उपमहापौर** :- आप्पा १६ विषयी काही

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६ हा सर्वानुमते

**नगरसचिव** :- अनुमोदक कोण

**मा.उपमहापौर** :- आप्पांनी सुचना मांडली नितीनभाऊंनी अनुमोदन दिले आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री. कैलास सोनवणे** :- नाही नाही मी सुचक नाहीये.

**मा.उपमहापौर** :- नाहीये का ठिक आहे माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६ हा सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १७ :-** मनपा आयुक्त कार्यालयाकडील प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.३२,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री. कैलास सोनवणे** :- मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) हे वाहन प्रशासकीय कामकाजाकरिता आयुक्त कार्यालयाकडे कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा क्रं.एम एच १९ एम ७४७४ (स्विप्ट डिझायर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Coolant (SG) No Amine - 3 Nos | 18 | Super Cleaner (480)-1 Nos |
| 2 | Bolt - 1 Nos | 19 | Screen Wash 50 -4 Nos |
| 3 | Bulb - 1 Nos | 20 | Microfiber Cloth -1 Nos |
| 4 | Bulb W 16 W - 1 Nos | 21 | MGDO (15W40) -MOBIL -3 Nos |
| 5 | Gasket - 1 Nos | 22 | Pipe, EXH Center -1 Nos |
| 6 | Gasket, TC Oil DR OCLR Side - 1 Nos | 23 | Mount Muffler (Swift) -4 Nos |
| 7 | Gasket, TC Oil DR TC Side - 1 Nos | 24 | Bolt, EXH Pipe -2 Nos |
| 8 | Bolt, Stud TC on EXH Manf - 1 Nos | 25 | Spring Pipe Exhaust -2 Nos |
| 9 | Plug Assy, Oil Drain - 1 Nos | 26 | Mounting Comp, Eng RH -1 Nos |
| 10 | Weight, Wheel Balance (15 Gram) -3 | 27 | Mounting Comp, Eng LH -1 Nos |
| 11 | Weight, Wheel Balance (30 Gram) - 3 | 28 | Regulator Assy, Front -1 Nos |
| 12 | Door Guard -4 Nos | 29 | Regulator Assy, Front -1 Nos |
| 13 | AC Dis-Infection -1 Nos | 30 | Run, Front Door Glass, R -1 Nos |
| 14 | Brake Fluid GC1500AA (500 ML Pack) -1 Nos | 31 | Run, Front Door Glass, L -1 Nos |
| 15 | Service Kit, OLD Swift Diesel -1 Nos | 32 | Channel Comp, FR Glas -2 Nos |
| 16 | Paper Floor Mat (20X15) -4 | 33 | Rubber, FR Glass Bottom Channel -2 Nos |
| 17 | Grease, Caliper Assy -2 Nos | 34 | All Labour Charges |

वर नमुद वाहनाचे वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट नं.२६७३ दि.०७/१२/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.३२,१४०/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.३२,१४०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १८ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१००१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०६/०१/२०२३ रोजी चे अखेर डिझेल साठा शिल्लक ४६०५ लिटर असुन सदर साठा ०३ ते ०४ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.१०/०१/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.१०४.१५७६४५/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१२,४९,८९१.७५/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,२०,५७१.७५/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,२०,५७१.७५/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,२०,५७१.७५/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| एकूण रक्कम रुपये - | | | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय

सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणी नुसार दि.१०/०१/२०२३ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

तरी इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविली असता मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव |
| २ | मे.अमल ऑटो जळगांव |
| ३ | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो,चिंचोली,जळगांव |

वर नमुद तीन्ही निविदाधारकांचे लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) उघडण्यात आले असुन ०३ निविदाकारांपैकी अनुक्रमांक १,२ यांनी पुर्ण दस्ताऐवज सादर केलेले असल्यामुळे अ.क्र.१ व २ हे निविदाधारक पात्र आहे. परंतु अनुक्रमांक ३ निविदाधारकाचे दस्ताऐवज अपुर्ण असल्यामुळे अ.क्र.३ हे निविदाधारक अपात्र आहेत. त्यामुळे सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/१६ दि.०९/०१/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १९ :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १.श्री.नंदु शहादु नाडे २.श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणेस व याकामी येणारा एकूण रक्कम रु.२,०३,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मॅडम यांना सहा/ सहा महिन्यांचा खंड देण्यात येतो का

**मा.आयुक्त** :- हो ना सहा महिन्यांचीच अट आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मॅडम कस आहे की सहा सहा महिन्यांचा खंड दिला ना तर दोन तिन दिवसांचा हे होतो. म्हणुन

**मा.आयुक्त** :- बर

**मा.उपमहापौर** :- अकरा महिने करण्यात यावे.

**मा.आयुक्त** :- ठिक आहे आपण कंटिन्यु करत जावु.

**श्री. नितीन लढ्ढा** :- अकरा महिने करण्यात यावे.

**मा.उपमहापौर** :- अकरा महिने करण्यात यावे.

**मा.आयुक्त** :- ठिक आहे मी एकदा चेक करते कायदेशीर बाब आणि रोजंदारीचे आहेत.

**मा.उपमहापौर** :- पण मॅडम काही काही वेळेस काय होत की त्यांचा याच्यामध्ये खंड पडला तर ते कामाला येत नाहीत.

**मा.आयुक्त** :- करतो आपण माणस मॅनेज

**श्री. नितीन लढ्ढा** :- मॅडम काय आहे की त्यांच एक दोन दिवसांच नुकसान होत.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**नगरसचिव :-** आता यांना मुदतवाढ देवुन आयुक्त मॅडमांना प्राधिकृत करून द्यायचे म्हणजे ठरावच येणार नाही.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो, हो.

**मा.आयुक्त** :- हो.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- याविषयी आपली सभागृहापुढे नेहमी चर्चा होत असते. आपण मागच्या गेल्या चार वर्षांपासुन चर्चा सुरू आहे की ते दोन माणस जळगांव शहरासाठी पुर्ण पडत नाहीत. तर आपण प्रत्येक प्रभाग समिती निहाय दोन दोन माणस वाढविण्याचा विषय झालेला होता. ते कंत्राटीत द्या किंवा कशात द्या. मागे एक पोरगा आलेला होता तो भाजीपाला विकतो पण तो मेलेले जनावरे उचलायला तयार आहे तर त्यात मी आणले होते तर असे बरेच असतील. तर आपण प्रत्येक प्रभाग समितीला दोन दोन माणस दिले. तर आपण हा विषय आता घेतोय आणि त्याच्यात अनुषंगाने हे माणस वाढविणे पण खुप गरजेचे आहे कारण काही नागरीक काय करतात की त्यांच्या घरासमोर पडलेला असतो तो पुढच्या गल्लीत जावुन टाकुन देतो आणि हा सगळा विषय होतो आणि तो तातडीने उचलला जात नाही तर याच्यावर काहीतरी उपाययोजना करा.

**मा.आयुक्त** :- विषय असा आहे की आकृतीबंधात दोन पद वाढविली होती ती मंजुर झाली तर त्यावेळेला आपल्याला ती पद भरता येईल.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- माझ म्हणणे हे आहे की कंत्राटी घ्या किंवा कसे घ्या.

**मा.आयुक्त** :- मंजुर झाल्याशिवाय कसे काय घेणार आपण

**श्री. विशाल त्रिपाठी** :- मंजुर होईल तेव्हा होईल आकृतीबंध मॅडम

**मा.आयुक्त** :- त्याच्याशिवाय नाही करता येत ना.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- आपले एक काम करू शकतो आपण आपल्या मंजुर ठेक्यातुन करता येईल तर ते मंजुर याच्यातुन करून टाकावे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

**ॲड. शुचिता हाडा** :- महापौर महोदया, आयुक्त मॅडम आपण याबाबत काही विशेष बाबीमध्ये घेवु शकणार असेल तर याबाबत पत्रव्यवहार शासन दरबारी होण प्रशासनाकडुन अपेक्षित आहे.

**मा.आयुक्त** :- आपण आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर प्रस्ताव पाठवु

**ॲड. शुचिता हाडा** :- कारण काय आहे की हे काम कोणीच करायला तयार नाहीये आणि ही फार महत्वाची बाब आहे त्यामुळे आपल एक विशेष सहकार्य असायला हवं.

**मा.उपमहापौर** :- भाऊ सहा महिन्यांची मुदतवाढ दिल्यानंतर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पंरतू त्यात आयुक्तांना प्राधिकृत करण्याअगोदर सर्व कायदेशीर बाबी तपासुन त्यांना प्राधिकृत करण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.०१/१२/२०२२ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करीत असून स्थायी समिती ठराव क्रं.८८२ दि.०८/०८/२०२२ चे मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत ६ महिने दि.३१/०१/२०२३ रोजी संपत असल्याने पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.०३/०२/२०२३ ते दि.०२/०८/२०२३ पर्यंत (६ महिने) तात्पुरती नियुक्ती देवुन रु.१६,९२०/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरीता दोन्ही मानसेवी कामगारांचा एकूण रु.२,०३,०४०/- खर्च नुसार मेलेले जनावरांची विल्हेवाटीचे काम दैनंदिन सुरु आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना सहा महिन्याचा मुदतवाढीच्या येणाऱ्या रु.२,०३,०४०/- खर्चास व तात्पुरती नियुक्ती देणेस स्थायी समिती ठराव क्र.८८२ दि.०८/०८/२०२२ मंजूरी अन्वये दोन्ही मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.१२ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती दि.०३/०२/२०२३ ते दि.०२/०८/२०२३ पर्यंत कामाची मुदत आहे. सदर मुदत संपल्यानंतर दोन्ही मानसेवी कामगार १.नंदु शहादु नाडे २.अशोक रामा सोनवणे यांना दोन दिवसांचा खंड देवून पुन्हा ६ महिने (दि.०३/०२/२०२३ ते दि.०२/०८/२०२३) अशा मुदतीस व प्रती मानसेवी कामगार प्रत्येकास रु.१६,९२०/- X २ कामगार रु.३३,८४०/- प्रतीमहा प्रमाणे ६ महिने कालावधीसाठी येणारा एकूण रक्कम रु.२,०३,०४०/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच यापूढे सदर प्रकरणात नेमणूकीस मुदतवाढ देण्यासाठी आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५७

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २० :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी**:- तो एक प्रशासनाचा प्रस्ताव आहे की काही मंदिरांच्या ठिकाणी आलेला आहे ना प्रस्ताव आहे तर सभागृहाला सांगावे आणि जर तो प्रस्ताव आयत्यावेळेच्या याच्यामध्ये मंजुर करण्यात आला तर बर होईल. कारण काय आहे की महाशिवरात्रीच्या हिशोबाने लाईट लावायचे आहेत आपल्याला त्याठिकाणी तर तेवढा हा एक विषय आहे तो प्रस्ताव तयार आहे. मंदिराचा विषय आहे शिवरात्री जवळ येते आहे.

**श्री. चंद्रकांत सोनगिरे** :- सन्मा.सभागृह, आता मी माहिती दिली की त्याठिकाणी एलईडी लाईट लावणेबाबतच NOC देणेबाबतच पत्र आपल्याकडे प्राप्त झालेले होते. त्यावर विभागाचा अभिप्राय घेवुन माझ्याकडे काल आला. परंतू आपल्या महासभेने ठरवुन दिलेल्या कुठल्याही कामाची NOC देण्यासाठी महासभेची मान्यता घेण्याची नियमावली आहे तर त्यानुसार महासभेपुढे येण्यासाठी किमान पुढच्या महासभेपर्यंत थांबाव लागणार होत. मा.आमदार साहेबांचाही काल फोन आलेला होता आणि त्यांनी सांगीतले की महासभेत माझ्यावतीने विनंती करण्यात यावी की आणि महाशिवरात्री पुर्वी हे पोलची व्यवस्था करायची असल्याने हे सर्व सन्मा. सदस्यांच्या संमती ने एक विशेष बाब म्हणुन याबाबत महासभेने NOC देण्याबाबत

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौरताई एक काम करा ना या प्रस्तावाला मंजुरी देण्यात यावी आणि आपण कार्योत्तर मान्यता पुढच्या मिटींगला देवुन टाकु.

**मा.उपमहापौर** :- आयुक्तांना अधिकार दिलेले आहे आपण तर पुढच्या मिटींग मध्ये देवुन टाकु मान्यता.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. शासकीय आदेश क्र.सा.बां./१२५ दि.०७/०२/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०५ मधील बळीरामपेठ मध्ये श्री.डेअरी ते मलीक अपार्टमेंन्टपर्यंतचा रस्ता, श्याम एजेंसी ते लेले संकुल व केळकर मार्केट मागील पुर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर २०% जास्तीचे दरानुसार रक्कम रु.११,९६,८३२/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५७**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**